# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतील दलितेत्तर सहकारी
## भाग-१

प्रा.डॉ. दशरथ रसाळ

Dr. Babasaheb Ambedkar Yanchya Chalvalitil Dalitetar Sahakari

Dr. Dashrath Rasal

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतील दलितेत्तर सहकारी

डॉ. दशरथ रसाळ
मो. : ९९२२७३६८७२

© **सर्व हक्क सुरक्षित**
सौ. जयश्री दशरथ रसाळ

**प्रकाशक :**
वेदिका प्रकाशन
पत्की निवास, धनगर बावडी,
हावगीस्वामी मठ, उदगीर, जि. लातूर
पिन.-४१३५१७ मो. ९७३०७०६१६०

**प्रथमावृत्ती :** १४ एप्रिल २०२३

**ISBN : ९७८-८१-९५३१०३-७-१**

**मुद्रक :**
गणेश, प्रिंट-ओ-ग्राफिक्स, Plot No.1328/23,
वाय.पी. पोवार नगर, कोल्हापूर

**स्वागत मूल्य : १५० रूपये**

# अर्पणपत्रिका

दिवगंत आजी-आजोबा

सासरे- कै.भानुदास कांबळे,

कै.बबन कांबळे, बंधु कै.भारत रसाळ

व आंबेडकरी चळवळीतील सर्व कार्यकर्ते...

यांच्या चरणी व त्यांच्या क्रांतिकारी कार्यास

कृतज्ञतापूर्वक अर्पण....

आई-वडीलांचा आशिर्वाद

# ऋणनिर्देश

रयत शिक्षण संस्थेचे, संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या स्मृतिला अर्पण. रयत शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी व महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी अधिष्ठाता प्रा.डॉ. विकास कदम, माझे पीएच.डी चे मार्गदर्शक आदरणीय प्रा.डॉ. विष्णु वाघमारे श्री. शिवाजी महाविद्यालय बार्शी तसेच सेवानिवृत्त प्राचार्य मा.श्री.डॉ. प्रकाश थोरात, प्राचार्य मा.बी.एच. चौधरी, उपप्राचार्या डॉ. भारती रेवडकर, प्रा.डॉ. सदाशिव दंदे (लातूर) माजी प्राचार्य प्रा.डॉ. माधवराव गादेकर सौ.वंदना गादेकर, प्रा.डॉ. शिवाजीराव जवळगेकर, प्रा.डॉ. रमेश पारवे, प्रा.डॉ. सोमनाथ रोडे, प्रा.डॉ. भगवानराव वाघमारे, श्री. नरसिंग घोडके (गुरूजी) श्री. राजकुमार नामवाड, प्रा.डॉ. संजय शिंदे, प्रा. राम गव्हाणे, प्रा.डॉ. किशोर जोगदंड, प्रा.डॉ. दिगंबर झोंबाडे, प्रा.डॉ. मारूती घटेंवाड, प्रा.डॉ. धनजंय मोगले, प्रा.डॉ. भगवान लोकडे, प्रा.डॉ. मल्हारी रास्ते, प्रा.डॉ. राजकुमार मस्के, मा.प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, माजी उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण, आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सूरेश ढेरे, माजी प्राचार्य डॉ. दादासाहेब सांळुखे, उपप्राचार्य प्रा. देवराव मुंडे, आदरणीय प्रा.डॉ. सोमनाथ कदम, प्रा.डॉ. राज ताडेराव, प्रा.डॉ. मारोती चव्हाण, प्रा.डॉ. मारूती कसाब, प्रा.डॉ. संभाजी बिरांजे, प्रा.डॉ. मच्छिंद्र सकटे, मा. दिंगबर नेटके, श्री. उत्तम दोरवे, मा. शिरीष दिवेकर, मा. पाडुरंग गालफाडे, मा. सुधाकर आडगळे, प्रा. दिलीप कांबळे, प्रा.डॉ. सहदेव रसाळ, प्रा. शरद लोंढे, व सामाजिक-शैक्षणिक चळवळीतील कार्यकर्ते श्री. सुनिल क्षिरसागर, श्री. सुरेश पाटोळे, मा. युवराज पवार, श्री. सुरेश खंदारे, श्री. अभिमान पेठे, श्री. भीमा रसाळ, प्राचार्य डॉ. राजभाऊ लोखंडे, प्रा.डॉ. नभा काकडे, प्रा.डॉ. प्रभाकर गायकवाड, प्रा.डॉ. विजय रेवजे, प्रा.डॉ. सारीपूत्र तुपेरे, प्रा. के.एस. शिंदे, मोठी बहीण सौ. सुमन मगर, भाऊजी श्री. रमेश मगर, लहान बहीण सौ. कमल तुरे, व आई-वडील पत्नी सौ. जयश्री रसाळ, चि. वैभव रसाळ, कु. साक्षी रसाळ व इ. वरील सर्व सर्व स्नेही व कार्यकर्ते व नातेवाईक यांचे सहकार्य मिळाले. त्यांचे शतशः आभार.

# अनुक्रमणिका

| **प्रकरणे** | **पृ.क्र.** |
| --- | --- |
| प्रकरण पहिले- | ०६ |
| **पार्श्वभूमी व पूर्व संशोधन** | |
| प्रकरण दुसरे – | २२ |
| **डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन परिचय** | |
| प्रकरण तिसरे – | ३४ |
| **डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणविषयक विचार** | |
| प्रकरण चौथे – | ६५ |
| **डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक चळवळी** | |
| प्रकरण पाचवे- | ९१ |
| **डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक चळवळी, भाग- १** | |
| प्रकरण सहावे- | ११९ |
| **डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक चळवळी, भाग-२** | |
| ☆ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक चळवळीतील दलितेत्तर सहकारी यांचे दुर्मिळ छायाचित्र - | १३९ |

# प्रकरण पहिले
# पार्श्वभूमी व पूर्व संशोधन

## १.१ प्रस्तावना :

भारतात धर्माधिष्ठित समाजव्यवस्थेने सामाजिक गुलामगिरी लादली, सामाजिक विषमता लादली, विषमतेवर आधारित ही समाजव्यवस्था वर्णयुक्त आहे. बहुजन आणि अभिजन अशी समाजाची विभागणी वर्णव्यवस्थेमुळे झालेली आहे. अभिजन वर्गाने धर्माचा आश्रय घेऊन बहुजन वर्गाला मानवी हक्कांपासून सुद्धा वंचित ठेवले. शतकानुशतके त्यांच्यावर सामाजिक गुलामगिरी लादली. १९ व्या शतकामध्ये ब्रिटिशांनी भारतावर राजकीय गुलामगिरी लादली. यामध्ये त्यांनी मानसिक गुलामगिरीही लादण्याचा प्रयत्न केला होता. परंतु राजकीय गुलामगिरीपेक्षाही सामाजिक गुलामगिरी भयंकर आहे, असा विचारप्रवाह पुढे आला आणि भारतात सामाजिक समतेसाठी आणि आर्थिक समतेसाठी वैचारिक प्रबोधन सुरू झाले, आणि सामाजिक व आर्थिक उतरंड नष्ट झाल्याशिवाय राजकीय हक्कांना आणि स्वातंत्र्याला अर्थ उरणार नाही, असा प्रखर व न्यायधिष्ठित विचार अधिक प्रतिष्ठित होऊ लागला. या सामाजिक वास्तवतेचे भान समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचवणे आणि त्यांना सामाजिक व आर्थिक हक्काची जाणीव व भान करून देणे यासाठी समाजाला जागृत करण्यास म्हणजेच समाज प्रबोधनास चालना मिळाली. यामध्ये समाजव्यवस्थेत परिवर्तन हे तत्व होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक व सामाजिक चळवळीचा दलित्तेतर समाजावर पडलेला प्रभाव विचारात घेत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वर्णव्यवस्थेच्या विरोधात जाऊन तत्कालीन समाजाची मानसिकता समानतेच्या विचारांमध्ये परिवर्तीत करणे आवश्यक वाटले होते. कारण वर्णव्यवस्थेमध्ये चौथा वर्ण हा बहुसंख्येने भारतीय समाजाचा भाग होता. परंतु कोणत्याही मानवी हक्कांपासून पूर्णपणे वंचित होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाज व्यवस्थेविषयी, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय व्यवस्थेविषयी शास्त्रीय आणि तत्वज्ञानिक विचार मांडले. समाजाला पटवून दिले त्यातूनच

त्यांचे तत्त्वज्ञान सिद्ध झाले. आणि चौथ्या वर्णाच्या उत्थानासाठी त्यांनी उभ्या केलेल्या सामाजिक, शैक्षणिक चळवळीमध्ये त्यांच्या विचारांनी आणि तत्वज्ञानाने प्रभावित होऊन दलितेत्तर समाजानेही साथ दिली व त्यांच्या कार्यात सक्रिय सहभाग नोंदवला. अन्यायाच्या विरोधात लढून वंचित समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी संपूर्ण समाजालाच विधायक दृष्टी देणा-या थोर व्यक्तींनाच महापुरुष संबोधले जाते. एका अर्थाने ते त्या समाजाचे महानायकच असतात. म्हणून मानवतेच्या प्रस्थापनेसाठीचा त्यांचा सतत चालू असलेला लढा त्यांच्या जीवनाच्या अखेरपर्यंत चालूच होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भगवान बुद्धांचे तत्वज्ञान विचारपूर्वक व विवेकाने स्विकारले. आणि अर्थातच शांतीचा संदेशही स्विकारला. परंतु कोणत्याही समाजामध्ये एखादा वर्ग मानवी हक्कांपासून वंचित असेल तर त्या समाजात शांती राहू शकत नाही. अशांतीने धगधगणारा हा समाज केव्हा तरी आपल्या हक्कांची जाणीव होऊन उफाळून येणार. म्हणजेच समाजक्रांती होणार. पण फक्त त्यासाठी त्यांना त्यांच्या गुलामीची जाणीव होणे आवश्यक असते.

समाजक्रांती याचा अर्थ त्यांच्या दृष्टीने असा होता की, धर्माधिष्ठित चार्तुर्वण्यावर आधारीत समाजव्यवस्था आमुलाग्र बदलणे, त्यासाठी शैक्षणिक व सामाजिक पररिवर्तन, सामाजिक जागृती होणे. म्हणजेच जातीचे मजले संपवून समानतेवर आधारित समाजव्यवस्थेचा मनोरा उभा करणे भारतातील विषमता जातीव्यवस्थेने पोसलेली असल्यामुळे दलितांवर गुलामगिरी आणि दारिद्र्य या विषमतेने लादले होते. या दास्य व दारिद्र्यातून बहिष्कृत वर्गाची मुक्ती हे त्यांचे ध्येय होते. केवळ राजकीय लोकशाहीने हे तत्वज्ञान सिद्ध होणारे नव्हते. सामाजिक लोकशाहीच्या तत्त्वावर आधारलेली एक समर्थ समाजव्यवस्था त्यांच्या डोळयासमोर उभी होती. त्यासाठी वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, सामाजिक विषमतेचे विध्वंसन हे साधन आणि सामाजिक लोकशाही हे साध्य व त्यासाठी सामाजिक व शैक्षणिक परिर्वतन सुधारणा हा मार्ग त्यांना प्रस्थापित करावयाचा होता. म्हणूनच त्यांचा लढा विविध स्तरांवर होता. एकतर वंचितांचा उद्धार, स्वावलंबन व स्वाभिमानाची जाणीव व प्रेरणा, दुसरे म्हणजे त्यांचे दैन्य संपुष्टात आणणे. त्याद्वारे त्यांना भौतिक सांस्कृतिक लाभ मिळवून देणे. पण यासाठी

संपूर्ण समाजाचे सहकार्य आवश्यक होते. सामाजिक लोकशाहीमध्ये प्रत्येक भारतीयाला लोकशाहीचे हक्क मिळाले पाहिजेत हा विचार समाजाच्या अभिजन वर्गामध्ये सुद्धा रुजवणे त्यांना आवश्यक वाटले. त्यासाठी ते म्हणतात "भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळण्यानेच कार्यभाग साधेल असे नाही. भारत हे असे राष्ट्र पाहिजे की, ज्यामध्ये प्रत्येक नागरिकाला धार्मिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय हक्क समान असून प्रत्येक नागरिकाला व्यक्ती विकासाला वाव मिळेल.' राष्ट्राची उन्नती ही समाजाच्या उन्नतीवर अवलंबून असते आणि समाजाची उन्नतीही व्यक्तीच्या उन्नतीवर अवलंबून असते म्हणून सामाजिक लोकशाहीचे अधिष्ठान आवश्यक आहे असे त्यांचे प्रतिपादन होते. मूकनायक या पाक्षिकामध्ये ते म्हणतात," हिंदुस्थान हा देश केवळ विषमतेचे माहेरघर आहे. हिंदु समाज हा एक मनोरा आहे व एक जात म्हणजे एक मजला. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की, या मनो-यास शिडी नाही. एका मजल्यावरून दुस-या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. ज्या मजल्यावर ज्यांनी जन्मावे त्याच मजल्यावर मरावे. खालच्या मजल्यावरील इसम कितीही लायक असला तरी त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही. वरच्या मजल्यातील माणूस कितीही नालायक असो त्याला खालच्या मजल्यावर लोटून देण्याची कुणाची छाती नाही.[१]

## १.२ विषय निवड :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याबद्दल अनेकांनी संशोधन केलेले आहे. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजव्यवस्थेच्या संदर्भातील मांडणीतून वर्णव्यवस्था व जातीव्यवस्थेचे वास्तव समोर आले. याच विचारातून अनेकांनी या विषयावर संशोधन केले. मात्र अलिकडील काळात या विषयावरील वेगळी मांडणी श्रीमती नलिनी पंडित, श्रीमती गेल ऑमव्हेट तसेच कॉ.शरद पाटील, डॉ.भारत पाटणकर, डॉ.आ.ह.साळुंके, डॉ.उमेश बगाडे, डॉ. सदा क-हाडे, डॉ.प्रल्हाद लुलेकर, डॉ.सी.एच.निकुंबे, डॉ.गंगाधर पानतावणे, डॉ.य.दि.फडके, डॉ. रावसाहेब कसबे इत्यादी विद्वानांनी या विषयावर अनेक नवीन मुद्दयांचे विवेचन केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक प्रेरणेतून आणि कृतीशील चळवळीतून निर्माण होणा-या प्रेरणा, चळवळीचे तत्त्वज्ञान, नेतृत्त्वातील व्यापकता

या सर्वांचा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो. चळवळीचे यशपायश व व्यापकता ही संपूर्ण समाजाच्या विविध घटकांच्या सहभागातून ठरते. त्यांना मिळालेल्या संधीचा उपयोग नेहमीच शासन व समाजाचे लक्ष मागसवर्गीय व दलित यांची शैक्षणिक स्थिती व शैक्षणिक प्रगती या बाबीकडे वेधण्याकडे केला.[२] आणि सर्व समावेशकता आणण्याचा प्रयत्न केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमध्ये असा सहभाग महत्वपूर्ण ठरला. तसेच शैक्षणिक व सामाजिक चळवळीची दिशा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक प्रेरणेतून मार्गदर्शक ठरली व यापुढेही ती प्रेरणादायी होण्यासाठी मदत होऊ शकेल म्हणून संशोधन कार्यासाठी हा विषय निवडला.

**१.३ संशोधन विषयाचे महत्त्व :**

सामाजिक शास्त्रातील संशोधन मोठे परिणामकारक असते. सामाजिक शास्त्रातील संशोधन असल्यामुळे भौतिक फायदा ही गोष्ट विज्ञानाप्रमाणे निदर्शनास येत नसली तरी हे शास्त्रीय संशोधन असते. भौतिक फायदा ही बाब यामध्ये नसली तरी ज्ञान व जिज्ञासा यांची साध्यता नक्कीच आहे. सामाजिक संशोधनाचे अंतिम उद्दिष्ट ज्ञान संपादन हे असते. आणि हे ज्ञान समाजहित व मानवाच्या कल्याणासाठी आवश्यक असते. प्रत्येक संशोधनाचे स्वतंत्र्यदृष्ट्या महत्व असते. कारण संशोधनामध्ये त्या विषयाच्या अतिशय खोलात जावून तथ्ये गोळा करावी लागतात. संशोधनाचे नियोजन करावे लागते. संशोधनातील त्या-त्या क्षेत्रातील सखोल माहितीमुळे समाजामध्ये परिवर्तन घडवून आणणे हे अत्यंत महत्वाचे कार्ये साध्य होते. ज्ञानक्षेत्रे विकसित होत जातात.

१. 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर' या महामानवाबद्दल अनेक प्रकारचे संशोधन झालेले आहे. परंतु आंबेडकर ही व्यक्ती नसून विचार आहे असा विचार केल्यानंतर असे लक्षात येते. की, अनेक पैलूंवर संशोधन झालेले आहे, तसेच अनेक पैलू संशोधनाची वाट पाहत आहेत.

२. भारतीय समाजकारण, राजकारण, अर्थकारण, धर्मकारण, शिक्षण असे कोणतेही क्षेत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. अनेक वर्षे हे संशोधन होत आहे व होत राहील. म्हणूनच प्रस्तुत संशोधन विषयामध्ये याचे महत्व अधिक आहे.

३. भारतीय समाजात जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था अस्तित्वात आहे. परंतु त्याचा सखोल अभ्यास करून त्याचे मूळ शोधून वंचित समाजाला सामाजिक प्रवाहात आणण्यासाठी प्रश्नांचा क्रम व सुधारणांचा क्रम समजणे आजच्या पिढीसाठी आवश्यक आहे.

४. शिक्षण ही ज्ञानाची जननी आहे असे म्हटले जाते. ब्रिटिश काळात तर त्यास वाघिणीचे दूध म्हटले आहे. आज शिक्षणाशिवाय पर्याय नाही. याचे ज्ञान सर्वांना झाले आहे. परंतु सर्वांसाठी शिक्षण ही संकल्पनाच अस्तित्वात नसताना ती रुजविणे व समाजापर्यंत पोहोचवणे यासाठी जे करावे लागले त्या कष्टाची जाणीव व्हावी म्हणून आवश्यक आहे.

५. समाजमन तयार करणे, वंचित, शोषितांवर होणा-या अन्यायाला वाचा फोडणे व दलितेत्तरांना यामध्ये सामावून घेणे ही अत्यंत अवघड गोष्ट होती. तिचीही जाणीव होणे आवश्यक होते.

६. कोणतीही घटना विचाराने घडत असते. या विचारातूनच इतिहास निर्मिती करणा-या महामानवाचे विचार समाजाच्या तळागळापर्यंत आणि उच्च वर्गापर्यंत पोहोचवून त्यांना कृतीशिल बनवणे या टप्प्यांमध्ये घडणा-या घटना समाजासमोर आणणे गरजेचे आहे.

७. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून सामाजिक तेढ कमी करणे, प्रबळ धर्मनिरपेक्ष राष्ट्र निर्माण करणे, सामाजिक समता, हे महत्वाचे तत्व समाजात रुजवणे यासाठी त्यांनी वैचारिक प्रवास कसा केला आणि कृतीशील स्वरूप कसे आणले या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी हा अभ्यास महत्त्वाचा आहे.

८. भारतीय समाजातील निद्रीस्त वर्ग जागा करणे, संघटित करणे व त्यांना शिकण्याचा संदेश देणे यासाठी त्यांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय विचारांचा व कार्यांचा आढावा घेवून तसेच दलितेत्तरांनी त्यांना जी साथ दिली त्यांच्या कार्याचा व विचारांचा आढावा घेवून आजची प्रासंगिकता तपासणे हा या संशोधनाचा महत्त्वाचा हेतू आहे. आणि तो विश्वसनीय साधनांच्या आधारे प्रस्तुत शोधप्रबंधात मांडण्यात येत आहे.

आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये आधी सामाजिक की आधी राजकीय हा सातत्याने सामाजिक व राजकीय पटलावर असणारा विषय होता. सामाजिक

सुधारणांच्या संदर्भात अस्पृश्यता निवारण, रुढी-परंपरांना विरोध, जातीभेद विरोध आणि जातीव्यवस्थेचा अंत अशा विविध टप्प्यातून विचार व सुधारणांचा प्रयत्न झाला. समाजसुधारकाने आपापल्या कालखंडामध्ये अनेक सामाजिक संस्था सुरू केल्या. अनेक कार्यक्रम त्या माध्यमातून राबविले. वंचितांना शैक्षणिक सुविधा, सहभोजन, मंदिर प्रवेश, अनिष्ट रुढीपरंपरांच्या विरोधात आवाज उठवणे, ईश्वर व प्रार्थना या संदर्भात समानतेच्या तत्त्वाला चालना देणे, सार्वजनिक ठिकाणी सर्वांना प्रवेश यासारखे परिवर्तनवादी कार्यक्रम राबवण्यात येऊन समाज जागृतीचा प्रयत्न झाला. अनेक वर्षे अशा संस्थांनी संपूर्ण देशामध्ये आणि विशेषतः महाराष्ट्रामध्ये भरीव कार्य केले. या कार्याबरोबरच दुस-या बाजूला मनुस्मृतीचे दहन करणे, आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देणे. धार्मिक गोष्टींना विरोध करणे असे कार्यक्रमही काही लढाऊ विचारवंतांनी व समाजसुधारकांनी केले. तसेच स्त्रीयांच्या हक्कांबाबत आवाज उठवणे, त्यांच्यावर होणा-या अन्यायाच्या विरोधात लढा उभा करणे, त्यांच्यावर अन्यायकारक असणा-या रुढींना कडाडून विरोध करणे असेही कार्यक्रम प्रकर्षाने राबविले. यामध्ये सर्व जातीधर्माच्या समाजसुधारकांचा समावेश होता. त्यामध्ये मनुस्मृतीचे दहन, हिंदू कोड बिल, धर्मांतर, शिक्षणाचा हक्क, जाती व्यवस्थेच्या विरोधात नेतृत्त्वाला आव्हान करून समर्थ व वैचारिक वारसा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला. यामध्ये घटनात्मक विकासामध्ये कायद्यानुसार हक्क देण्यासाठी त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत प्रयत्न केला. दलितांना आपल्या हक्काची जाणीव करून देऊन वैचारिकते बरोबरच राज्यघटनेमध्ये सुद्धा हजारो वर्षे अस्तित्त्वात असलेल्या अस्पृश्यतेचे कायद्याने उच्चाटन केले. सामाजिक समता निर्माण करण्यासाठी घटनात्मक तरतूदी केल्या. आरक्षण व अस्पृश्यतेच्या विरोधात कायद्याने सुरक्षितता, वंचितांना विकासाच्या संधी इत्यादी गोष्टी उपलब्ध करून दिल्या.

अस्पृश्यता आणि जातीभेद या दोन्ही गोष्टींचा हिंदू असण्याशी अंगभूत संबंध आहे ही गोष्ट समाजशास्त्रज्ञ म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरेपूर जाणून होते. २५ डिसेंबर १९२७ रोजी आपल्या भाषणात ते म्हणाले होते, बेटीबंदीपासून रोटीबंदीपर्यंत वर्णाश्रमाच्या चौकटीचे खिळे उडवून हिंदू समाजाचा

एक वर्ण केला पाहिजे. त्याशिवाय अस्पृश्यता जाणार नाही व समताही प्रस्थापित होणार नाही. हिंदुसमाज समर्थच करायचा असेल तर चातुर्वर्ण्य व असमानता यांचे उच्चाटन करून हिंदू समाजाची रचना एक वर्णत्व व समता या दोन तत्त्वांच्या पायावर केली पाहिजे. अस्पृश्यता निवारणाचा मार्ग हा हिंदू समाज समर्थ करण्याच्या मार्गापासून भिन्न नाही. म्हणून मी म्हणतो की, आपले कार्य जितके स्वहिताचे आहे तितकेच ते राष्ट्रहिताचे आहे, यात काही किंतू नाही.'[३]

वर्णजाती समाजातील शास्त्या वर्णजातींना राजकीय-आर्थिक आणि धार्मिक-सांस्कृतिक, क्षेत्रातील स्वतःची अल्पजनसत्ता शूद्रातिशूद्र वर्णजातींवर लादण्यासाठी वर्गसमाजातील शास्त्या, वर्गापेक्षा गुणात्मकदृष्ट्या भिन्न अशा नियंत्रण क्षमतेच्या विचार प्रणालींचा वापर करावा लागतो. वर्णजाती व्यवस्था तिच्या जन्मसिद्धतेमुळे बंदिस्त असते, त्यातून राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील बंदिस्त एकाधिकारशाहीचा पाया तयार होतो. या एकाधिकारशाहीत बदलत्या पिढ्यांबरोबर सातत्य राखले जायचे असेल, एकाधिकारशाहीच्या विरोधात ज्यांचे हितसंबंध आहेत अशा शूद्रातिशूद्र वर्णजातींना अशा ईश्वराच्या सतत अंकित ठेवणे की, जो त्यांचे दास्य, त्यांची अंकितता यांचे धार्मिक समर्थन त्यांना देईल. त्यांच्यावर लादल्या गेलेल्या दडपणुकीला आणि शोषणाला 'ईश्वरकृपा' मानेल. आपल्या शोषण शासनाची कारणमीमांसा द्विज वर्णजातींच्या भौतिक स्वार्थात, हितसंबंधात शोधणार नाही. म्हणून पुनर्जन्मवाद, अवतारवाद, कर्मवाद यांचे सिद्धांत रचले गेले.[४] अशा पद्धतीने त्यांच्या विचारांचा आढावा घेऊन वैचारिक साधन म्हणून समाजाला आजही दिशा देण्याची गरज आहे. म्हणून हा संशोधन विषय निवडला आहे. या महामानवाने तळागळापासून समाजपरिर्वतन करण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या विचाराने कार्याची सुरुवात कशी केली याचा आढावा घेणे आवश्यक वाटले म्हणूनही हा विषय निवडला आहे.

**१.४ संशोधनाची व्याप्ती :**

प्रस्तुत संशोधनासाठी "डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक व सामाजिक चळवळीचा दलितेत्तर समाजावर पडलेला प्रभाव" (इ.स.१९०० ते २०००) हा

विषय निवडलेला आहे. या शंभर वर्षाच्या काळात (१९०० ते २०००) भारतीय राजकीय व सामाजिक पटलावर तसेच महाराष्ट्रामध्ये असंख्य घडामोडी झाल्या. एकीकडे ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी राजकिय स्वातंत्र्यासाठी टप्प्याटप्प्याने सुधारणांच्या मागण्या व चळवळी तर दुसरीकडे सामाजिक सुधारणांशिवाय राजकीय स्वातंत्र्याला अर्थ नाही असा जोर धरणारी सामाजिक सुधारणा चळवळ होती. परंतु दोन्ही चळवळी अत्यंत महत्वाच्या होत्या. सामाजिक सुधारणांना अग्रक्रम देणा-या समाजसुधारक व चळवळी यांचा ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्याला म्हणजेच स्वातंत्र्याला विरोध नव्हताच फक्त प्रश्न होता तो आधी सामाजिक की आधी राजकिय! यासाठी 'शिका संघटित व्हा व संघर्ष करा' हा संदेशच प्रभावी ठरणारा आहे याचे भान डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी वैयक्तिकदृष्ट्या स्वतःहा उच्च शिक्षण घेऊन उत्तम पगाराची नोकरी मिळवली असती. आर्थिक दृष्ट्या ते समृद्ध होऊ शकले असते. परंतु त्यांनी वैचारिक समृद्धी महत्त्वाची मानली आणि आपल्या बांधवाना न्याय देण्यासाठीच आपले शिक्षण आहे याची जाणीव ठेवली. म्हणून स्वतःच्या शिक्षणाबरोबरच त्यांनी समाजातल्या वंचित घटकाच्या शैक्षणिक जाणीवेला व विकासाला महत्व दिले. त्यासाठी शैक्षणिक संस्था निर्माण केल्या. शिक्षण व जागृतीसाठी वृत्तपत्र हे साधनही वापरले. सामाजिक संस्था महत्वाच्या मानल्या. त्यातूनच बहिष्कृत हितकारीणी सभा (१९२४), 'डिप्रेस्ड क्लास एज्युकेशन सोसायटी' (१९२८), पिपल्स एज्युकेशन सोसायटी (१९४५) या संस्थाची निर्मिती त्यांनी केली. मुकनायकमधून शैक्षणिक व सामाजिक प्रबोधन केले. ज्ञान हे विकासाचे मुख्य कारण आहे. मानव उत्क्रांत होत असताना मिळवलेले ज्ञान हे पुढील पिढ्यांपर्यंत संक्रमित केले जाते ज्ञानाच्या या संक्रमनालाच शिक्षण असे म्हणतात.'[८] या सर्वांचा अभ्यास करण्यासाठी हा शंभर वर्षाचा कालखंड घेतलेला आहे.

**१.५ पूर्व संशोधन :**

'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक व सामाजिक चळवळीचा दलितेत्तर समाजावर पडलेला प्रभाव'(इ.स.१९०० ते २०००) या विषयावर अद्याप पूर्णपणे संशोधन झालेले दिसून येत नाही. दलितांसह दलितेत्तरांसाठीही त्यांनी महान

कार्य केलेले आहे. अठरापगड जातींना आपल्या चळवळीच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट केले. त्याचप्रमाणे दलितेत्तर तसेच उर्वरित समाज घटकांसही आपल्या चळवळीचा भाग बनविले. त्यांच्या चळवळी विविध अंगाने, विविध विचाराने, अभ्यासण्यासारख्या आहेत. अजूनही त्यांच्यावर संशोधन बाकी आहे. या चळवळीत अनेक घटक आपोआप ओढले गेलेलेही आहेत. दलितेत्तरांनी त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक अशा दोन्ही चळवळीमध्ये योगदान दिलेले आहे. कारण हे दोन्हीही कार्यक्षेत्र असे आहेत की, शैक्षणिक व सामाजिक अशा दोन्ही स्तरावर परिणाम व प्रभाव पडत असतो. केवळ भावनिक ऐक्यावर आधारलेल्या ख-या-खु-या राष्ट्राची निर्मिती होणार नाही
त्यासाठी समानताच आवश्यक आहे अशी त्यांची योग्य धारणा होती.[९]

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात त्या प्रमाणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे दलित समाजाचे नेते म्हणून दिसत होते परंतु आता भुतकाळ त्यांच्या नेतृत्त्वावर जास्त चांगला प्रकाश टाकतो. ते सर्व भारतीय समाजाचे नेते होते. कारण जातीबद्ध विषम समाज रचनेला धक्का देणारा कृतीशील समाजसुधारक हा संबंध समाजामध्येच परिवर्तनाची आवश्यकता निर्माण करतो व ते घडले आहे.[१०]

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ तत्त्वचर्चा केली नाही भारतीय समाजाची उभारणी शैक्षणिक व सामाजिक चळवळीच्या आधारे केली पाहिजे असे ते सांगत. सामाजिक रोगाचे निदान कशात आहे याची पूर्ण जाणीव न झाल्यामुळे त्याच्या परिहाराचे प्रयत्न निष्फळ ठरतात, असे त्यांनी स्पष्ट केलं आहे.[११] त्यांचे विचार, कार्य व दलितेत्तरांवर पडलेला प्रभाव या विषयी सखोल संशोधन करण्याचा या संशोधन कार्यात प्रयत्न केला आहे.

महाराष्ट्रात निर्माण झालेल्या ज्या अनेक चळवळी व त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक चळवळी व कार्य यांची माहिती घेऊन प्रस्तूत या संशोधन कार्यात सादर करण्याचा प्रयत्न केला आहे. यापूर्वी या विषयावर जे संशोधन झालेले आहे ते पुढीलप्रमाणे.-

**१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : धनंजय कीर**

धनंजय कीर यांनी आपल्या या चरित्रग्रंथात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे संपूर्ण चरित्र, कार्य व विचार यांचा आढावा घेतला आहे. आंबेडकर पूर्व

महाराष्ट्र व भारत येथील वैचारिक, सामाजिक, राजकीय परिस्थितीचे वर्णन यात आहे. घटनेचे शिल्पकार लोकशाहीचे त्राते व मानवी हक्काचे कैवारी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हे जीवनचरित्र आधुनिक भारताच्या इतिहासातील अत्यंत मौल्यवान ठेवा आहे.

**२. महामानव डॉ.भीमराव रामजी आंबेडकर : डॉ. ज्ञानराज काशीनाथ गायकवाड**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मापासून अखेरपर्यंत अनेक प्रसंग व घटनासहीत हा ग्रंथ तयार झालेला आहे. त्यांच्या घरातील संस्कारशील वातावरण, त्यांचे शिक्षण अनेक व्यक्तींचे सहकार्य याची माहिती दिली आहे. पाच अध्यायामध्ये असलेले हे पुस्तक त्यांचे बालपण व शिक्षण, धीरोदत्त महानायक, राज्यघटनेचे शिल्पकार, बौद्ध धर्माचा स्विकार व महापरिनिर्वाण आणि महामानवाची तेजस्वी व विजयी जीवनयात्रा असे विभाजित झाले आहे.

**३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार (सामाजिक तत्त्वज्ञान) : शंकरराव खरात**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी माणूस हा केंद्रबिंदू मानून अखंडपणे आपले कार्य केले. आपले जीवन अनुभव अभ्यास मिमांसकवृत्ती यातून त्यांनी अनेक ग्रंथांचे लेखन केले. अस्पृश्यता हा हिंदू समाजाला लागलेला कलंक आहे आणि त्यानी कोट्यावधी जनतेचे जीवन कलंकित केलेले आहे. या समाजघातकी अस्पृश्यतेला समाजातून नष्ट करणे या हेतूने त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा यामध्ये आपल्याला दिसून येतो. महाड सत्याग्रह, बहिष्कृत हितकारणी सभा, बाबासाहेबांची भाषणे, दलितांच्या हक्काचा जाहिरनामा, महिलांचे हक्क, नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्यातील मतभेद तसेच या दोघांची अस्पृश्यतेच्या प्रश्नावरील भूमिका याचा आढावा यात घेण्यात आलेला आहे.

**४. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर : (चरित्र व विचारधन) : विवेक सौताडेकर**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कौटुंबिक जीवनातील घडामोडी त्यांचे शैक्षणिक विचार बौद्ध धम्मासंबंधी विचार, भारतीय राज्यघटना तयार करताना त्यांनी केलेला विचार भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणून त्यांची वाटचाल,

पत्रकारितेतून त्यांचे विचारधन, सत्याग्रही म्हणून त्यांची विचार धारा, समानतेसाठीचा संघर्ष, सामाजिक चळवळ, याबरोबरच महाराजा सयाजीराजे गायकवाड व राजर्षी शाहू महाराज यांच्याशी झालेल्या भेटी याबद्दलची माहिती यात नमुद करण्यात आलेली आहे.

**५. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सहवासात : डॉ.सविता भीमराव आंबेडकर**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दुस-या पत्नी डॉ. सविता आंबेडकर यांचे हे आत्मचरित्र आहे. एका महापुरुषाची पत्नी म्हणून कोणत्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले, दोन भिन्न परिस्थितीतून एकत्र आलेल्या या दाम्पत्याला वेळोवेळी समाजाकडून मिळालेली अवहेलना, त्यांच्या मानसिक परिस्थितीची घालमेल, त्यांचा पत्रव्यवहार आणि त्यांच्या महापरिनिर्वाणा नंतरचे डॉ.सविता आंबेडकर यांचे कसोटी पर्व या सर्वांच्या साक्षीदार असलेल्या त्यांच्या पत्नीचे हे आत्मचरित्र आहे.

**६. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची गौरवगाथा : संपादन सरिता गायकवाड, प्रदीप गायकवाड**

या गौरव गाथेमध्ये ४२ व्यक्तींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल लिहिलेले अनुभव व आठवणी आहेत. पंडीत नेहरू, के.आर.नारायणन्, शरद पवार, माईसाहेब आंबेडकर, शंकरराव खरात, अनंत काणेकर, कर्मवीर दादासाहेब गायकवाड, भाऊराव गायकवाड, कृष्णाजी केळूसकर अशा मान्यवरांनी भारतीय संविधानाचे शिल्पकार, अजोड पांडित्याचा बंडखोर, भारताच्या उभारणीत योगदान, कर्तव्यनिष्ठ, नेतृत्व, यांची वैशिष्ट्ये, या विषयांवर लेखन केलेले आहे.

**७. बोल महामानवाचे : अनुवादन व संपादन - डॉ. नरेंद्र जाधव**

एकूण तीन खंडामध्ये असलेल्या या ग्रंथांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषणाची समग्रसूची देण्यात आलेली आहे. यामध्ये आत्मनिवेदनपर भाषणे, अनुयायांना मार्गदर्शन यांचा समावेश आहे. दुस-या खंडामध्ये सामाजिक, आर्थिक, धार्मिक, कायदा व संविधानविषयक भाषणांचा समावेश आहे. तिस-या खंडामध्ये फक्त राजकीय भाषणे आहेत. जवळपास सतराशे इतकी पृष्ठसंख्या असलेल्या या खंडांमधून त्यांच्या विचारधनाची माहिती मिळते.

**८. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची निवडक भाषणे : संपादन - विजय सुरवाडे**

१९२०-१९३६ या काळातील त्यांची भाषणे यामध्ये वाचावयास मिळतात. य.दि.फडके यांची प्रस्तावना यास आहे. यातून त्यांचे सत्याग्रह परिषदेतील, मातंग परिषदेतील भाषण, ठाणे जिल्हा अस्पृश्य परिषदेतील, तसेच गोलमेज परिषदेसाठी लंडनला जाण्यापूर्वीचे भाषण, चवदार तळयाच्या सत्याग्रहापूर्वीचे भाषण यांचे उल्लेख यात करण्यात आलेले आहेत.

**९. समाज प्रबोधनकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर : प्रा.डॉ.सी.एच.निकुंभे**

समाजप्रबोधनाच्या कार्यात त्यांच्या सहभागाचा परामर्श या पुस्तकात घेण्यात आलेला आहे. या पुस्तकाचे वैशिष्ट्य असे की, आंबेडकर पूर्व अस्पृश्य समाजसुधारकांचे कार्य त्यानी सांगितलेले आहे. याच बरोबर अस्पृश्यांचे राजकीय अस्तित्व आणि हक्कांसाठीचे प्रयत्न, सामाजिक न्याय व समतेसाठी संघर्ष, धार्मिक अन्यायातून अस्पृश्यांची मुक्ती व्हावी यासाठी संघर्ष, शैक्षणिक प्रगतीसाठी प्रयत्न तसेच समाज प्रबोधनकार म्हणून त्यांचे इतिहासातील स्थान यांचा उहापोह करण्यात आलेला आहे.

**१०. अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा : डॉ. प्रल्हाद लुलेकर**

या ग्रंथामध्ये लेखकाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेती व शेतकरी, जलनियोजन, ऊर्जा, कामगार, अदिवासी, स्त्रिया या विषयांवरील विचारांचा उहापोह केलेला आहे. याचबरोबर भाषावार प्रांतरचना, हैद्राबाद संस्थान, लोकसंख्या नियंत्रण, परराष्ट्र धोरण या विषयी त्यांनी वेळोवेळी व्यक्त केलेले विचार त्याची मिमांसा केलेली आहे. त्यांचा वकिली हा आवडीचा विषय होता. याबाबत व त्यांचे वकिलीतील अनुभवातून अनेक खटल्यांची माहिती देण्यात आलेली आहे.

**११. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची शैक्षणिक संस्था : एस.एम.बुशी, संपादन व अनुवादन : प्रा. विलास खरात व डॉ.प्रताप चाटसे**

८ जुलै १९४५ मुंबईमध्ये त्यांनी 'पिपल्स एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली. याची ध्येय धोरणे ठरविण्यात आली. या सोसायटीच्या स्थापनेची पार्श्वभूमी याचा इतिहास याविषयी माहिती यात देण्यात आलेली आहे.

**१२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनुयायांच्या नजरेतून : निवड व संपादन : सलीम युसुफजी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा संघर्ष, कर्तृत्त्व, कामगिरी यांचे अनेक पैलू आहेत. त्यांच्यातील विद्वान, शिक्षक, वकिल, लेखक, राजकारणी, पत्रकार, राजकीय पक्षाचा संस्थापक, सामाजिक योद्धा असे एकाच व्यक्तीचे आयुष्यातील अनेक पैलू उलघडून दाखवणारे हे पुस्तक आहे. २३ जणांच्या लेखातून उलगडत जाणारे व्यक्तीमत्व यातून अधिक प्रेरणादायी होते.

**१.६ संशोधन विषयाची मांडणी :**

प्रस्तुत संशोधनात संशोधनासाठी निवडलेल्या विषयाची मांडणी एकूण सहा प्रकरणात करण्यात आलेली आहे. या सहा प्रकरणाच्याद्वारे या संशोधन विषयाची मांडणी करण्यात आलेली आहे. ती पुढीलप्रमाणे आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जी शैक्षणिक चळवळ होती त्यामागे त्यांचा शिक्षण विषयक विचार सांगण्यात आला आहे. या शैक्षणिक चळवळीमागील त्यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान सांगण्यात आले आहे. त्यांनी ज्या शिक्षणसंस्था स्थापन केल्या त्या संस्था स्थापन करण्यामागील त्यांची प्रेरणा व त्यांची मुख्य भूमिका, त्या मागील त्यांचा उद्देश, त्यांचे ध्येय व प्रत्यक्ष शैक्षणिक संस्थेची केलेली स्थापना याची संपूर्ण माहिती घेतली आहे. या शैक्षणिक संस्थेच्या उभारणीत पुढाकार घेणारे संस्थापक व तत्कालीन सहकारी यांची ही माहिती घेतली आहे. तसेच शैक्षणिक संस्थेची घटना व गव्हर्नींग बॉडी कशा रीतीने तयार केली. इ.घटकांचा स्पष्ट उल्लेख केला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक चळवळ हा विषय घेण्यात आलेला असून संशोधनाच्या या तिस-या प्रकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्या काही विविध प्रकारच्या सामाजिक चळवळी, आंदोलने, सत्याग्रहे निर्माण केली त्या सर्वांची नोंद करूनच त्यांची सामाजिक चळवळ ही कशी निकोप होती याचा प्रकर्षाने उल्लेख करण्यात आलेला आहे. तत्कालीन दलित व शोषित समाजावर झालेले अन्याय तत्कालीन समाजात रुढ असलेल्या अनिष्ठ चालीरिती, रुढी, प्रथा, परंपरेचा अभ्यास करण्यात आलेला आहे या सर्व महत्वाच्या बाबींवर सखोल माहिती घेऊन मांडण्यात आलेली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर

यांनी ज्या पददलितांसाठी सामाजिक चळवळी हाती घेतल्या होत्या त्या कशा योग्य होत्या, या सर्व चळवळी उभारून तत्कालीन समाजाला योग्य न्याय देण्यासाठी त्यांनी आपल्या सामार्थ्याने ह्या चळवळी कशा तडीस नेल्या यांचा विचार करून अभ्यासाअंती सामाजिक चळवळीचा उहापोह करण्यात आला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शैक्षणिक व सामाजिक चळवळीत ज्या काही दलितेत्तरांचे सहकार्य लाभले होते. ह्या सर्वांची नोंद घेतली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक चळवळीमध्ये दलितांसह दलितेत्तर उच्च समाजातील काही महत्त्वपूर्ण सहका-यांचे सहकार्य लाभले आहे. त्या सर्वांच्या कार्याची दखल घेतली आहे. त्या सर्व दलितेत्तर सहकार्याचा अभ्यास करून डॉ. आंबेडकरांच्या या शैक्षणिक व सामाजिक चळवळीत भाग घेऊन सहकार्य करणा-या दलितेत्तर सहका-यांचा उल्लेख करून ह्या चळवळी कशा पुढे गेल्या व त्या चळवळीचा फायदा सर्वांनाच कशा रीतीने झाला, त्या सर्व सहका-याचे योग्य रीतीने अभ्यासकांनी त्यांच्या सर्व कार्याची बारकाईने दखल घेऊन माहिती दिली आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा दलितेत्तर समाजावर पडलेला प्रभाव २० व्या शतकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक चळवळीत लाभलेले दलितेत्तर उदाः (ब्राह्मण समाज व ओ.बी.सी.इ.) समाजातील जे सहकारी म्हणून लाभलेले या सर्व सहका-यांवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा कार्याचा व त्यांनी हाती घेतलेल्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा कसा प्रभाव पडला यांचा प्रभावीपणे अभ्यास करण्यात आला आहे. डॉ.आंबेडकरांच्या या अजोड कामगिरीत व त्यांच्या चळवळीत ज्या दलितेत्तर समाजावर त्यांच्या कार्याचा ठसा कसा पडला, ते सर्व दलितेत्तर सहकारी कसे प्रभावित झाले यांचाही अभ्यास केला आहे. जेणेकरून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा दलितेत्तरांवर पडलेला प्रभाव यातून दाखविण्यात आलेला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या समाजउपयोगी चळवळीतून दलितेत्तर समाजावर प्रभाव पाडला व ते त्यांचे विश्वासू सहकारी बनले व त्यांच्या या महनीय कामगिरीत सहभागी झालेत्या

सर्व दलितेत्तरांवर त्यांच्या कार्याचा कसा प्रभाव पडला या विषयी या प्रकरणात अभ्यास करण्यात आलेला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक व सामाजिक चळवळीचा दलितेत्तर समाजावर जो प्रभाव पडला त्या सर्व दलितेत्तर समाजातील सहका-यांच्या सहभागाचा कसा उपयोग या चळवळीला झाला या सर्व चळवळी कशा पुढे आल्या, त्या सर्वांचा अभ्यास यात केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित, शोषित, बहुजन समाजाला पुढे आणण्यासाठी ज्या काही शैक्षणिक व सामाजिक चळवळी आपल्या भोवताली निर्माण केल्या सर्व चळवळीचा उपयोग समाजासाठी कसा झाला त्यांचा उहापोह या प्रकरणात करण्यात आला आहे. तसेच डॉ. आंबेडकरांची शैक्षणिक संस्था, तिचे ध्येय, उद्दिष्ट्ये गाठण्यासाठी आर्थिक परिस्थितीवर मात करून या शैक्षणिक व सामाजिक चळवळीचा उद्देश समोर ठेवून कार्ये केले. त्यांच्या या अजोड कामगिरीमध्ये त्यांना ज्या काही दलितेत्तर समाजातील सहका-यांनी जे मोलाचे सहकार्य केले त्या दलितेत्तर समाजावर त्यांच्या कार्यातून जो प्रभाव पडला या सखोल माहितीचा यात घटकामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. जेणे करून या संशोधनाचा निष्कर्ष आपल्या समोर योग्य पद्धतीने येईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे फक्त दलितांचेच नेते नसून संपूर्ण भारतीयांचे राष्ट्रीय नेते होते. या निष्कर्षापर्यंत जाता येणार आहे हाच या संशोधनामागील खरा उद्देश आहे असे म्हणणे योग्य ठरेल.

## संदर्भ ग्रंथ :

१. डॉ.क-हाडे सदा, समाजप्रबोधन, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठ क्र. ८८

२. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, दलितांचे शिक्षण : संपा. गायकवाड प्रदीप, समता प्रकाशन, नागपूर, २०१५ पृष्ठ क्र. ३२

३. बेडकिहाळ किशोर (संपादक), परिवर्तन विचार चिंतन आणि चिकित्सा, लोकवाड्.मय गृह, मुंबई, पृष्ठ क्र. ११९

४. गर्गे स. मा. (संपा.), समाजसुधारक आणि अंधश्रद्धा, प्रकाशक, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, पुणे, पृष्ठ क्र. १२५

५. Karl Pearson : The Gammeer of Science A@ Black, London, P.K. १०

६. Young Pauline V : Scientific social survey and Research Bombay

७. Juhdo Seutizclair : Research method in social Relation, Newyork P.K.25

८. गायकवाड प्रदिप, दलितांचे शिक्षण, समता प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र.६

९. डॉ.नाईकवाडी अशोक (संपा.), भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, विद्याभारती प्रकाशन, लेख. डॉ.भालचंद्र मुणगेकर, पृष्ठ क्र.४०

१०. त्रतैव, पृष्ठ क्र.४०

११. जोशी तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री, लेख पृष्ठ क्र. १५४.

### प्रकरण दुसरे

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन परिचय

**ज**गात महामानवाला महामानवाच्या रूपातच जन्म घ्यावा लागतो. म्हणूनच पुढे तो आपल्या गुणसंपन्न व्यक्तित्त्वाने आणि महान कर्तृत्त्वाने महामानव सिद्ध होतो. जगाच्या अशा नियमानुसारच दि. १४ एप्रिल १८९१ ला मध्यप्रदेशात महू येथे महाराष्ट्रीयन पिता रामजी आणि माता भीमाबाई यांच्यापोटी चौदावे अपत्य म्हणून महामानवाच्या रूपात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म झाला.'[१]

डॉ.आंबेडकर केवळ व्यक्ती नाही, तर तो एक विचार आहे. त्यांचे संपूर्ण जीवन आणि कार्ये हे वंचितांना वंचित व शोषित लोकांकरिता प्रेरणास्थान आहे. झोपलेल्या समाजाला जागृत करून त्यांच्यात स्वाभिमान, अस्मिता आणि आर्थिक सबळता निर्माण करण्याचा कृती कार्यक्रम आहे. जाज्वल्य राष्ट्रनिष्ठा आणि देशप्रेम काय असतं हे ज्यांना जाणून घ्यायचं असेल त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र अभ्यासणे आवश्यक आहे.[२]

समाजजीवनात अनेक संघर्ष असतात. समाजसुधारकांना सामाजिक चळवळींच्या आधारे ते करावे लागतात. काही संघर्ष मुलभूत स्वरूपाचे तर काही तात्कालीक असतात. तत्कालीक संघर्षांना मूलभूत संघर्ष मानून चळवळी उभ्या केल्या तर संघर्ष हे साधनाऐवजी साध्य बनतात आणि या संघर्षाची व्याप्ती स्वतः पर्यंत येऊन भिडते. त्यामुळे जे साध्य करावयाचे असते त्याचेच विस्मरण होते. आणि शत्रू-मित्रांचा सारासार विवेक न राहता आपण आपापसातच संघर्ष करत आहोत, याचेही भान हरपून जाते. आपल्या समाजजीवनात दारिद्री, बेकारी, वैफल्य आणि दिशाहिनतेतून ज्या मतलबी संघटना उभ्या राहत आहेत, मग त्यांचा आधार जात, धर्म, पंथ, भाषा यापैकी कोणता का असेना आणि त्यांचे आराध्य दैवत कोणता का महापुरुष असेना, अशा संघटना आणि त्यांचे नेते मूलभूत संघर्षाला टाळण्यासाठी मतलबी संघर्ष उभा करून आणि तो सतत धगधगता ठेवून प्रस्थापितांच्या हातातले बाहुले कसे बनत आणि दूरदृष्टी, ध्येयाची स्पष्टता आणि त्यावरील निष्ठायांचा आधार नसेल आणि तणाव वाढवू शकतात. परंतु सामाजिक पुनर्रचनेच्या मात्र त्याविरोधी असतात. म्हणूनच

आंबेडकरांची ज्ञानोपासनेवरील निष्ठा आणि व्यापकदृष्टी व दूरदुष्टी आज महत्त्वाची वाटू लागली आहे. रावसाहेब कसबे पुढे जाऊन असे म्हणतात, 'आंबेडकरवाद म्हणजे समाजवादी समाजरचनेच्या निर्मितीसाठी या जगाची जी पुनर्रचना करावी लागेल त्यासाठी स्वातंत्र, समता, बंधुता आणि न्याय यावर उभ्या असणा-या लोकशाहीची निर्मिती करण्याची प्रेरणा देणारे समाज विज्ञान आहे.'[३] या विचारांची प्रचीती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनपरिचयाने येते.

महाराष्ट्राच्या रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यात दापोलीजवळ (मंडणगडजवळ) पाच मैलांवर असलेले 'आंबावडे' हे एक छोटेशे गाव आंबवडे, हे म्हणजे सुभेदार रामजी यांचे मूळगाव होते. तेथे राहत असलेले रामजी यांचे पूर्वीचे आडनाव सकपाळ असे होते. पण पुढे रामजी यांनी आपल्या आंबावडे या गावाच्या नावावरून आपले मूळ 'सकपाळ' हे आडनाव बदलून 'आंबावडेकर' असे नवीन नाव धारण केले.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतात ईस्ट इंडिया कंपनीचा प्रसार होत होता. मुंबईमध्ये या इंग्लिश राजसत्तेचे जे सैन्य होते त्यामध्ये महार सैनिक मोठ्या संख्येवर होते. १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धामध्ये भारतात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य संपून, ब्रिटिश राणीचे राज्य प्रस्थपित झाले. या इंग्रजी राज्यसत्तेच्या सैनिकातही महार सैन्याची संख्या जास्त होतीच. त्यांच्या पराक्रमाने काही सैनिकांना, सुभेदार, मेजर अशी बढतीची पदेही मिळाली. या सैन्यातील नोकरीमुळे आणि सैनिकी शाळेतील शिक्षणामुळे मालोजीराव सपकाळ व त्यांचे सुपूत्र रामजी सकपाळ यांच्या जीवनात वैचारिक व सांस्कृतिक परिवर्तन झाले होते. मालोजीराव यांना तीन मुलगे, व एक मुलगी. रामजी हे त्यांचे चौथे अपत्य. १८३८ ला त्यांचा जन्म झाला. १८६६ ला ते इंग्रजी सैन्यात शिपाई म्हणून भरती झाले. १०६ सॅपर्स माकयर्नस या सैन्याच्या तुकडीत ते होते. १९ व्या वर्षी त्यांचा विवाह भीमाबाईंशी झाला. भीमाबाईंचे वडीलही इंग्रजी सैन्यात सुभेदार होते. रामजी हे अत्यंत धार्मिक, गंभीर व करारी होते. सैनिकी शाळेत शिकत असतानाच त्यांनी इंग्रजीचेही शिक्षण घेतले होते. मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर शिपाई पदाची नोकरी सोडून त्यांनी सैनिकी शाळेत शिक्षक म्हणून

नोकरी स्विकारली. अध्यापन कौशल्य, शिस्त, चिकाटी, अभ्यासूवृत्ती या जोरावर त्यांना मुख्याधापकपदी पदोन्नत्ती देण्यात आली. १४ वर्षे हे पद सांभाळल्यानंतर अखेरच्या टप्यात सुभेदार हे पद त्यांना मिळाले.

१८९१ पर्यंत रामजी व भिमाबाई यांना चौदा अपत्ये झाली. त्यात चौदावे अपत्य भीमराव यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ च्या सोमवारी झाला. ते तीन वर्षाचे झाल्यानंतर रामजी निवृत्त झाले आणि हे कुटुंब रत्नागिरी जिल्ह्यातील आपल्या मूळ गावी दापोली येथे आले. येथे इ.स. १९२६ पर्यंत राहून सातारा येथे सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये भांडार रक्षक म्हणून नोकरी मिळवून ते आपल्या कुटुंबासह तेथे राहू लागले. याचवेळी भिमराव पाच वर्षाचे झाल्यामुळे १८९६ मध्ये रामजी यांनी त्यांना कॅम्पस्कूलमध्ये घातले. येथेच भीमराव यांच्या शिक्षणाचा प्रारंभ झाला. आपल्या मुलांवर उत्तम संस्कार व्हावेत म्हणून सुभेदार रामजी हे १८९६ ला साता-याला आले. तेथे त्यांनी कबीरपंथाची दीक्षा घेतली. स्टोअरकीपरचे काम करत असताना तेथे त्यांना भरपूर वेळ मिळत असे. तेव्हा सकाळी पहाटेच पाच वाजल्यापासून भूपाळया व स्त्रोत्रे म्हणत. सकाळी ७ ते ९ पूजा करीत असत. पुन्हा सायंकाळी एक-दोन तास ते पूजा व प्रार्थना करीत. प्रत्येक पौर्णिमेला व अमावस्येला ते कडक उपास करीत. घरातील सर्व माणसांच्या बरोबर सूर्यास्ताच्या वेळी पूजा व प्रार्थना करण्यास बसत असत. प्रार्थना म्हणत असताना त्यात कबीराचे दोहे, तुकारामाचे व चोखोबाचे अभंग, दत्ताची संस्कृत स्त्रोत्रे व गीतेतील काही श्लोक ते म्हणत व इतर माणसे त्यांच्या पाठोपाठ म्हणत असत. गीतेतील त्यांचे आवडते श्लोक माणसाच्या आत्म्याच्या अमरत्वाबद्दल होते. ते श्लोक म्हणताना त्यांच्या चेह-यावर जे गांभीर्य येई ते पाहण्यात आसपास चे लोक रंगून जात असत. पूजा संपत आली म्हणजे ते हातात बत्ताशा घेत व त्यावर कापूर ठेवून त्याला काडी लावीत आणि स्त्रोतांचे पठण करत असत.

१८९६ मध्ये भीमराव यांच्या मातोश्री भीमाबाई यांचे साता-यात निधन झाले. केवळ पाच वर्षाचे असलेले भीमराव यांचा मातृविहीन आयुष्याचा काळ त्यांच्या आत्त्या मीराबाई यांच्या प्रेमळ व समजुतदार स्वाभावामुळे काहीसा सुखद

झाला. सुभेदार रामजी यांनी जिजाबाई नावाच्या विधवेशी दुसरा विवाह केला परंतु भीमरावांनी त्यांना आई म्हणून कधीच स्विकारले नाही.

कॅम्प स्कूलमध्ये आंबेडकर नावाचे शिक्षक होते. त्यांना आडनाव उच्चारण्यासाठी सोपे जावे म्हणून भीमराव आंबावडेकर यांचे आडनाव आंबेडकर असावे असे सूचविले आणि भीमरावांनी ते मान्य केले. आणि त्यानंतर भीमरावांचे आडनाव आंबावडेकर ऐवजी आंबेडकर असे प्रचलित झाले. असे म्हणता येईल की, दलितेत्तरांशी त्यांचा अशा लहान वयातच संपर्क व घनिष्ठ संबंध येऊ लागला. पुढे सातारा हायस्कूलमध्ये प्रवेश घेतल्यानंतर सुद्धा पेंडसे नावाचे त्यांचे शिक्षक भीमरावांचे अतिशय लाड करीत. रामजी यांना नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर मुलांना शिकवण्यासाठी वेळ मिळू लागला. आपल्या मुलांनी संस्कृत शिकावे अशी त्यांची खूप इच्छा होती. परंतु संस्कृत शिक्षकांनी त्यास नकार दिला. या अन्यायामुळे भीमराव खूप नाराज झाले होते. पन्नास रुपये पेन्शनमध्ये घरखर्च भागत नव्हता रामजी आपल्या कुटुंबास घेऊन मुंबईमध्ये नोकरी मिळेल आणि आपले सर्व प्रश्न सुटतील या आशेने मुंबईमध्ये एलफिन्स्टन हायस्कूल मध्ये त्यांनी आपल्या मुलांसाठी प्रवेश घेतला. परंतु खर्चाची तजवीज होत नव्हती म्हणून रामजी यांनी आनंदराव या आपल्या मुलास नोकरीस लावले आणि भीमरावांचे शिक्षण चालू ठेवले. १९०५ मध्ये वयाच्या चौदाव्या वर्षी भीमरावांचे दापोलीच्या भीकू वलंगकर यांच्या कन्या रमाबाई यांच्याशी विवाह लावून देण्यात आला. यावेळी भीमराव इंग्रजी पाचवीमध्ये शिकत होते. खेळणे आणि वाचन करणे हा छंद भीमरावांनी जोपासला मात्र एलफिन्स्टन हायस्कूल मध्ये त्यांना आपल्या जातीच्या लोकांना अस्पृश्य समजले जाते याची जाणीव होवू लागली. अनेक प्रसंगातून अनुभवातून त्यांना समाजाच्या या हीनवृत्तीचे दर्शन घडू लागले. मॅट्रिक झाल्यानंतर बी.ए. करण्यासाठी आर्थिक परिस्थिती नव्हती. परंतु कृष्णराव केळूसकर गुरूजी यांनी बडोदा संस्थानचे महाराज सयाजीराव गायकवाड यांची भीमरावांशी भेट घडवून आणली. त्यांची हुशारी पाहून सयाजीराव गायकवाड यांनी उच्च शिक्षणासाठी भीमरावांना दरमहा २५ रु. शिष्यवृत्ती देण्याचे मान्य केले. अत्यंत कष्ट करून १९१३ मध्ये बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर त्यांनी शिक्षणाच्या दृष्टीने मागे वळून पाहिलेच

नाही. 'जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास, ध्येयवाद यांच्या बळावर देशीविदेशी विद्यापीठाच्या बी.ए.,एम.ए. एम.एस्सी. डी.एस.सी., पीएच.डी., बार ॲट लॉ अशा अनेक पदव्या मिळवून विविध विषयातील सखोल ज्ञान मिळवून आपल्या कार्यकर्तृत्त्वाचा चिरंतन असा ठसा भारतीय समाजजीवनावर आणि राजकारणावर उमटविला.'[४]

महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या आर्थिक सहकार्यातून मुक्त होण्यासाठी बडोदा येथे त्यांच्याकडे नोकरी करण्याचा त्यांनी विचार केला. २३ जानेवारी १९१३ ला ते हजरही झाले. परंतु ३ फेब्रुवारी १९१३ रोजी रामजींचे निधन झाले. आणि त्यांच्या जीवनाने वेगळेच वळण घेतले. पुढील शिक्षण घेण्यासाठी अमेरिकेला जाण्याची संधी त्यांना प्राप्त झाली. बडोदा संस्थानकडून त्यांना शिष्यवृत्ती मिळाली. १५ जून १९१३ ते १४ जून १९१६ ही तीन वर्षे शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली. १९६३ रु. शिष्यवृत्ती देण्यात येत होती. कोलंबिया विद्यापीठात त्यांना राज्यशास्त्र शाखेत प्रवेश मिळाला. त्यांनी उच्च विद्याअभ्यासासाठी विषय निवडला. एम.ए. च्या पदवीसाठी त्यांनी 'प्राचीन भारतीय व्यापार' या विषयावर लघुप्रबंध लिहिला. २ जून १९१५ रोजी त्यांना एम.ए.ची पदवी मिळाली. त्यानंतर लागलीच भीमरावांनी 'भारताचा राष्ट्रीय लाभांश इतिहासात्मक व विश्लेषणात्मक अध्ययन' या विषयावर पीएच.डी. च्या अत्युच्च पदवीसाठी प्रबंध लिहिणे सुरू केले. मे १९१६ मध्ये त्यांनी अमेरिका सोडली. आणि ऑक्टोबर १९१६ त्यांनी लंडन येथे 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' येथे अर्थशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी प्रवेश मिळविला. येथेच त्यांनी कायद्याच्या अभ्यासाठी 'ग्रेजइन' मध्ये सुद्धा प्रवेश घेतला. लंडनमध्ये या सर्व पदव्या प्राप्त करून ते डॉ.भीमराव रामजी आंबेडकर झाले. आणि त्यांनी बी.ए., एम.ए., एम.एस्सी., डीएस.सी., पीएच.डी, बार ॲट लॉ अशा पदव्या प्राप्त केल्या. या काळामध्ये ते आपल्या पोटास चिमटा काढून जेवढे ग्रंथ विकत घेणे शक्य असे तेवढे विकत घेत. प्रवासाकरीता खर्च न करीता वाचनालयातून दुर्मीळ ग्रंथ मिळविण्याकरीता ते मैलोनमैल पायपीट करीत असत. त्यांची दिनचर्या म्हणजे खरोखरच मूर्तीमंत तपश्चर्या होती. ज्या बाईकडे ते राहत असत ती नतद्रष्ट होती. सकाळी न्याहरीच्या वेळी चहा, एक पावाचा तुकडा, त्या

तुकड्याच्या टोकाला चिंचोक्या एवढा मुरांबा एवढेच ती देई.[५] याच काळामध्ये त्यांनी मुंबईमध्ये सिडनेहॅम कॉलेजमध्ये प्रोफेसर म्हणून काही काळ नोकरीही केली. 'मुकनायक' हे पाक्षिक १९२० ला सुरू केले.

परदेशात अत्युच्च पदव्या मिळवून ज्ञानमहर्षी झालेले डॉ.भीरामव आंबेडकर अस्पृश्य समाजाच्या उद्धारासाठी आपल्या ज्ञानाचा सदुपयोग करण्याचा निश्चय करूनच भारतात परत आले आणि मुंबई येथे राहू लागले. मुंबईत राहूनच त्यांनी आपल्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याचा आरंभ केला. मानवतेच्या सन्मानासाठी अस्पृश्य जनतेच्या उद्धाराचे महान कार्य सिद्धीस नेणे आणि त्यासाठी डॉ.भीमराव आंबेडकर यांना महामानवाचेच रूप धारण करावे लागणे हा नियतीचा शुभसंकेत होता असे म्हणणेच योग्य ठरेल.

अहोरात्र अभ्यास करून त्यांनी ४२ पृष्ठांचा शोधनिबंध तसेच भारतीय जातीसंस्था तिची उत्पत्ती व विकास हा प्रबंध हा त्यांचा अमेरिकेतील शैक्षणिक प्रवास म्हणजे धुरंधर राजकारणी पुरुषाच्या जीवनक्रमाची ती तपस्यापूर्वक चाललेली साधनाच होती. एका राज्यघटनापटूची ती एक प्रकारची तपस्याच होती.[६]

डॉ.भीमराव आंबेडकर यांच्यापुढे आता दोन महत्त्वाची ध्येये होती. एक म्हणजे आपल्या पत्नी रमाबाई यांच्या इच्छापूर्तीसाठी आपल्या कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारणे आणि दुसरे म्हणजे आपल्या अस्पृश्य समाजाचा उद्धार करणे. अनुभवासारखा दुसरा गुरू नाही म्हणतात तेच खरे. अस्पृश्यांच्या दुःखानां नि युगानुयुगे चालत आलेल्या दारिद्रयाला त्यांना वाचा फोडायची होती. त्यांच्या गुदमरलेल्या भावना व्यक्त करायच्या होत्या.'[७] अनेक वेळा त्यांनी आपली ही भावना व्यक्त केलेली आहे. जनता या वृत्तपत्राच्या एका अंकात ते म्हणतात, 'स्वजनांच्या उद्धारासाठी माझे आयुष्य व्यतीत करण्याचा माझा निर्धार अटळ आहे. माझ्या संकल्पीत सेवेत नि कार्यात अडथळा येईल, असे बंधन मी स्विकारणार नाही.'[८]

डॉ. भीमरावांनी परळच्या दामोदर हॉलमध्ये पहिल्या मजल्यावर एक खोली ऑफिससाठी मिळवली. त्या खोलीत त्यांनी आपली काही पुस्तके आणून ठेवली त्याचबरोबर काही लागणारे आवश्यक सामान. त्यानंतर लगेच जून

महिन्यात त्यांनी वकिलीच्या प्रॅक्टिससाठी हायकोर्टात आपले नाव नोंदविण्याकरीता हायकोर्टाला आपला अर्ज सादर केला. हायकोर्टाने डॉ.भीमराव आंबेडकर यांचे नाव ५ जुलै १९२३ रोजी नोंदवून घेतले. आणि तेव्हापासून हायकोर्टात डॉ.भीमरावांची वकिलीची प्रॅक्टिस सुरू झाली. पण डॉ.भीमराव हे अस्पृश्य समाजाचे वकिल आहेत असे समजून स्पृश्य समाजाच्या वकिलांनी त्यांना सहकार्य करण्याचे टाळले. अशा स्थितीत बाळकृष्ण गणेश मोडक नावाच्या स्पृश्य समाजाच्या वकिलाने डॉ.भीमरावांना वकिली करीत राहण्यासाठी सहकार्य केले.

वकील म्हणून काम पाहत असताना भीमरावांना पहिली केस नाशिक जिल्ह्यातील आडगावच्या महार जातीच्या जाधव बंधूंची मिळाली. त्यांनी ती केस वर्षभर चालविली आणि यशस्वीही केली. त्यावेळी त्या केसची फी म्हणून त्यांना सहाशे रूपये मिळाले. अशा या तुटपुंज्या मिळकतीमुळे सर्व खर्च भागवणे कठीण होत असत. या आर्थिक संकटातून मार्ग काढण्यासाठी पार्टटाईम दुसरी नोकरी करण्याचा त्यांचा कयास होता. त्यानुसार त्यांना बॉटलीबॉईज अकौंटसी इन्स्टिट्यूटमध्ये लॉचे प्रोफेसर म्हणून नोकरी मिळविली. ते तेथे आठवड्यातून तीन ते चार दिवस काम करीत असत. या कामामुळे त्यांनी त्यांची पूर्वी सुरू असलेली प्राध्यापक पदाची नोकरी दि. १० जून १९२५ ते ३१ मार्च १९२८ या कालावधीत पूर्ण करून सोडली. अस्पृश्य समाजाच्या उद्धारासाठी, त्यांच्या न्याय हक्कांसाठी एखादी संस्था स्थापन करावी असे डॉ. भीमरावांना वाटत होते. काही विश्वासु लोकांच्या सहकार्याने त्यांनी ९ मार्च १९२४ रोजी दामोदर हॉलमध्ये समाजेसवा करीत असलेल्या आपल्या सहका-याची बैठक घेऊन 'बहिष्कृत हितकारिणी सभा' नावाची संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला. ९ मार्च १९२४ च्या बैठकीमुळे एक महत्त्वाची घटना घडली की, अस्पृश्य समाजाच्या उद्धारासाठी जे आंदोलन संघटितपणे सुरू करण्यात आले होते. त्या आंदोलनाचे नेतृत्त्व आपण होऊन डॉ. भीमराव आंबेडकर यांच्याकडे येऊ लागले. डॉ. भीमराव आंबेडकर हे वकील, प्राध्यापक आणि दलितांचा नेता या आपल्याला तिन्ही रूपांत पहावयास मिळतात. अस्पृश्य समाजाच्या उद्धारासाठी ते प्रयत्न करू लागले. त्यामुळे ते एकाच वेळी लोकांच्या हितासाठीही आणि आपल्या वकिलीचा उपयोग करू लागले. स्वावलंबी होत लोकांची निःस्वार्थ

सेवा करण्यासाठी ते प्राध्यापक पदाची नोकरी करून आपले अर्थबळ वाढवत असत. आणि अस्पृश्य समाजाच्या उद्धारासाठी वेगवेगळया उपाययोजना, कार्यक्रमांची आखणी करत असत. त्या सर्व कार्यक्रमाची योग्य परिपूर्ततेसाठी लोकांची संघटित आंदोलन सुरू करण्यासाठी आपले सुजाण, दूरदर्शी व हितकारक नेतृत्त्व हे गुणही प्रस्थापित करू लागले.

शिक्षणाच्या बाबतीत ते नेहमीच सजग राहिले. १९१९ ला मॉटेंग्यू चेंम्सफर्ड कमिशनपुढे अस्पृश्य समाजाच्या बाजूने कर्मवीर वि.रा.शिंदे यांच्याबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ही साक्ष झाली. यामध्ये ते स्पष्टपणे म्हणतात, दलितांना शिक्षणाच्या संधी मिळून त्यांचा सामाजिक दर्जा वाढविण्यासाठी जो पर्यंत प्रयत्न होत नाहीत तो पर्यंत स्वराज्य दूर आहे. याच काळामध्ये राखीव जागांचे जनक राजर्षी शाहू महाराजांशी त्यांचा परिचय झाला. दलित चळवळीसाठी त्यांनी १९२० मध्ये जे मूकनायक नावाचे पाक्षिक सुरू केले होते, त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू समाजाला मनो-याची उपमा दिली. हिंदू समाजातील एक जात म्हणजे एक मजला असून व्यक्ती कितीही पात्र असली तरी तिला मजला बदलता येत नाही. व्यक्ती स्वातंत्र्याला त्यांनी अत्यंत महत्व दिले. बहिष्कृत हितकारिणी सभेत सुद्धा त्यांचे ध्येय अतिशय उच्च होते.

१. विद्यार्थी वसतीगृहाद्वारे तसेच अन्य साधनाद्वारे बहिष्कृत समाजात शिक्षणप्रसार करणे.

२. बहिष्कृतांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी औद्योगिक व शेतकी शाळा चालवणे.

३. बहिष्कृत समाजासाठी वाचनालये व शैक्षणिक वर्ग उघडणे.

सर चिमणलाल हरिलाल सेटलवाड हे बहिष्कृत हितकारिणी सभेचे अध्यक्ष तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे कार्याध्यक्ष होते. त्यांच्या लढ्याची सुरुवातच त्यांनी शोषित, वंचित, बहिष्कृत समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक सुधारणांच्या विचारांनी केलेली होती. म्हणूनच ते या सर्वांचे प्रेरक शक्तीस्थान आहेत. ‘समतेच्या लढ्यातील महान विचारवंत व योध्दो तर ते निर्विवादपणे आहेतच, त्यांच्यामुळे हिंदू समाजात एक प्रचंड तुफान निर्माण झाले आणि हिंदू समाजाच्या सुधारणेच्या चळवळीची जागा क्रांतीकारी चळवळीने

घेतली. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्वांचा त्यांच्या विचारावर मोठा परिणाम होता व त्या दृष्टी नेत्यांनी हिंदूधर्माची व समाजाची चिकित्सा केली.'[१]

भारतामध्ये राजकीय गुलामगिरी मुळे कर्तृत्त्वक्षेत्र संकुचित बनले होते. त्यातून धार्मिक व सामाजिक बाबतीत न्याय ही संकल्पना कोसो दूर होती. हा न्याय जसा व्यक्तीला लागू पडतो तसा समाजालाही लागू पडतो. कोणताही समाज चांगल्या गोष्टींचा स्विकार आणि अनिष्ट गोष्टींचा त्याग या नैसर्गिक प्रक्रियेला पारखा झाला की, त्या समाजातील लोकांची उपक्रमशीलता नष्ट होते आणि समाजातील हक्कांपासून पारखे झालेल्या लोकांचा आत्मविश्वास लोप पावतो. असेच भारतासंदर्भात घडले आहे. म्हणूनच सक्तीच्या मार्गापेक्षा लोकांमध्ये स्व सुधारणा करून देण्यासाठी पुरेशी संधी देणे आवश्यक आहे. आणि त्यातच समाजाचे कल्याण आहे. असा उदात्त विचार त्यांचा होता.

शोषक व शोषित असे वर्ग असणा-या समाजामध्ये अन्यायकारक गोष्टींचे निर्मूलन करण्यास शिक्षणाचा उपयोग होऊ शकतो. याबाबत ते सजग होते. सामाजिक जीवनाच्या प्रवाहातून एक मोठा वर्ग बाजूला फेकला गेला तर, देश सुधारेल ही कल्पना केवळ कल्पनाच राहिल. नव्या आधुनिक संकल्पनाची माहिती असूनही जुन्या रुढी व परंपरा यांचे आचरण करणे म्हणजे धर्म व समाज हा विचार बदलला पाहिजे असे त्यांचे मत होते. भावनेतून कोणताही निर्णय घेतला जावू नये याबाबत ते नेहमीच जागृत असत. आपल्या देशातील समाजरचना जातीबद्ध असल्यामुळे समाजनिष्ठ व देशनिष्ठेपेक्षा जातीची अस्मिता व अभिमान यांचे प्राबल्य अधिक आहे याची त्यांना पूर्ण कल्पना होती. त्यामुळेच वंचित शोषित, दलित यांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थिती सुधारणे हे मोठे आव्हान आहे हेही ते जाणून होते. भारतामध्ये हा टोकाचा जातीभेद कसा निर्माण झाला, तो कसा दृढ व रुढ झाला, त्यामुळे सामाजिक जीवनात कोणकोणत्या प्रवृत्ती निर्माण झाल्या, बळावल्या, त्याचे समाजावर कसे परिणाम झाले या सर्व गोष्टींची मिमांसा त्यांनी केली. आणि जाती निर्मूलनासाठी विचारपूर्वक व पद्धतशीरपणे कायद्यानुसार, कृतीशील राहणे आवश्यक आहे. असाही विचार त्यांनी केला असावा हे नक्की. म्हणूनच संपूर्ण आयुष्यात त्यांनी अशाच पद्धतीचे धोरण ठेवले.

डॉ. सविता भीमराव आंबेडकर म्हणतात, दलितांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शिका हा महान संदेश त्यांनी आपल्या अनुयायांना दिला. आपल्या परिश्रमाने आपल्या हयातीतच संपूर्ण एक पिढी त्यांनी सुशिक्षित केली. ते असे म्हणतात, शिका याचा अर्थ केवळ पदवी प्राप्त करणे नसून सुशिक्षित, सुबुद्ध व डोळस व्हा असा अर्थ डॉ.आंबेडकरांना अभिप्रेत होता.[१०]

भारतामध्ये वर्षानुवर्षे चाललेल्या जातीव्यवस्थेवर प्रहार करताना वैचारिक बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी त्यांनी अनेक सामाजिक, राजकीय, विचारवंतांचा तसेच महापुरुषांच्या विचारांचा अभ्यास केला होता. अनेक प्रागतिक विचारवंतांचा त्यांच्यावर प्रभाव होता.[११] त्यामध्ये खालील विचारवंतांचा प्रभाव दिसून येतो.

**१. प्रो.जॉन ड्युई :** यांच्या वैचारिक लेखनाचा त्यांच्या मनावर प्रभाव होता. ब्लेक क्लार्क असे म्हणतात, डॉ.आंबेडकर यांच्यावर जॉन ड्युई यांचा अधिक प्रभाव होता. ते शिकवत असत तो शब्द न् शब्द ते लिहून घेत असत. जॉन ड्युई यांच्या मानवतावादी व उदारमतवादी विचारांचा त्यांना आदर होता.

**२. विल्यम गॅरीसन :** हे अमेरिकन विचारवंत होते. निग्रो गुलामांच्या मुक्तीचा संघर्ष त्यांनी स्वतःहा जवळून पाहिला होता आणि संघर्षही केला होता. लिब्रेटर नावाचे वृत्तपत्र त्यांनी सुरू केले होते. त्यातील विचारांचा प्रभाव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर होता.

**३.यू.सी.डीसस :** हा प्राचीन ग्रीक विचारवंत यांच्या विचारांची प्रेरणा जातीव्यवस्थेविरुद्ध लढताना सतत त्यांना मिळत असे. कारण या इतिहासकाराने गुलामगिरी प्रथेवर कडाडून टिका केली होती.

**४. एडमन्ड बर्क :** आर्यलंड मधील हा राजकीय विचारवंत होय. याने नेहमीच शोषितांच्या शोषणाची कारणमिमांसा केली होती. त्यांच्या मते सामाजिक पिळवणूकही शोषितांच्या नुकसानीचे मोठे कारण होय. समाजाची भावी पिढी व नैतिक उत्थान याबाबत डॉ.आंबेडकर एडमन्ड बर्क यांच्याशी सहमत होते.

**५. जॉन.स्टुअर्ट मिल :** हा इंग्लंडमधील उदारमतवादी विचारवंत. बहुसंख्याक व अल्पसंख्याक याविषयी त्याने केलेले विश्लेषण प्रसिद्ध आहे. डॉ.आंबेडकरांनी त्यांच्या या संकल्पनांचा उल्लेख भाषणातून केलेला आढळतो. त्याच्या काही तत्त्वांचा स्विकार त्यांनी भारतीय समाजाच्या संदर्भात केलेला आहे.

**६. अब्राहम व्हॉल्टेअर :** युरोपमधील कॅथॉलिक पंथ, चर्च, त्यांचा दांभिकपणा यावर व्हॉल्टेअर याने कडाडून टिका केली होती. फ्रेंच राज्यक्रांती होण्यासाठी त्याने जी धर्मजागृती घडवून आणली ती ही कारणीभूत होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही धर्मातील भ्रामक समजूती, अंधश्रद्धा, रुढी या विषयी समाज जागृती केली. व्हॉल्टेअरच्या ग्रंथातील तत्त्वे आणि विचार यांचा उल्लेख त्यांच्या लिखाणात दिसून येतो.

**७. डॅनियल ओकानेल :** हा आयरिश देशभक्त असून त्याने कॅथॉलिक असोसिएशन नावाची संघटना स्थापन केली होती. त्याच्या राष्ट्रवादी विचारांचा, राजकीय तत्त्वज्ञानाचा त्यांनी आपल्या लिखाणातून वेळोवेळी उल्लेख केला आहे.

**८. प्रो.हेरॉल्ड लास्की :** याचे तत्त्वज्ञान त्यांनी बारकाईने अभ्यासले होते. सामाजिक नितीमूल्ये ही लोकशाहीमध्ये महत्वाची असतात. मानवी समाजात कायदा हा केवळ संघर्ष, तंटा मिटविण्यासाठी असतो. परंतु नितीमूल्ये ही समाज उभारणीस आवश्यक ठरतात. याचा प्रभाव त्यांच्या विचारांवर पडलेला दिसून येतो.

त्यांची ग्रंथसंपदा, त्यांचा अनेकांशी पत्रसंवाद, निवेदने वृत्तपत्रीय लिखाण, मुलाखती व भाषणे हा त्यांच्या चळवळीचा दस्तावेज आहे. त्यांची विचारसंपदा व ग्रंथसंपदा आजही उपयुक्त ठरते. पुढील पिढीसही मार्गदर्शक प्रेरणादायी ठरणार आहे. म्हणूनच या शोधप्रबंधामध्ये त्यांचे शैक्षणिक कार्य, सामाजिक कार्य व संपूर्ण समाजावर पडलेला प्रभाव याविषयीचे प्राथमिक व दुय्यम साधने वापरून केलेले लेखन दीर्घकाळासाठी उपयोगी ठरणार आहे याची खात्री आहे.

## संदर्भ ग्रंथ :

१. पळशीकर सुहास लेख- डॉ. आंबेडकर यांचे विचार, यातील काही भाग, प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी.
२. महामानव डॉ.आंबेडकर भीमराव रामजी, डॉ.गायकवाड ज्ञानराज काशीनाथ, रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर, पृष्ठ क्र.२५
३. महामानव डॉ.आंबेडकर बाबासाहेब (चरित्र व विचारधन), सौताडेकर विवेक, विद्याभारती प्रकाशन, लातूर, पृष्ठ क्र.२१

४. कसबे रावसाहेब, आंबेडकर व्यक्ती व विचार
५. प्रा. येळेगावकर श्रीकांत वंदनीय व्यक्तिमत्त्वे, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, डिसेंबर २०१९, प्रथम आवृत्ती, पृष्ठ क्र.१३५
६. पाध्ये प्रभाकर, प्रकाशातील व्यक्ती, पृष्ठ क्र.३०
७. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर (चरित्र व विचारधन), सौताडेकर विवेक, विद्याभारती प्रकाशन, लातूर, पृष्ठक्र.३५
८. कीर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर : पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती १४ एप्रिल १९६६, पृष्ठ क्र. ६७
९. जनता खास अंक, एप्रिल-१९३३
१०. ॲड. देशपांडे भगवानराव, विचारमंथनः लोकवाड्.मय प्रकाशन गृह, पहिली आवृत्ती मार्च २०१६, पृष्ठ क्र. ३१
११. डॉ.आंबेडकर सविता भीमराव,आंबेडकरांच्या सहवासातः, तथागत प्रकाशन, ठाणे, प्रथम आवृत्ती १९९० पृष्ठ क्र. ५

**प्रकरण तिसरे**

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणविषयक विचार

### २.१ प्रस्तावना :

"Education is most powerful weapon which you can use to change the World" हे नेल्सन मंडेला यांचे वाक्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबतीत तंतोतंत खरे ठरलेले आहे. शिक्षण ही ज्ञानाची पहिली पायरी असली तरीही चिकित्सकता, विचारशक्ती आणि कौशल्ये आत्मसात करण्याची ती अपूर्ण संधी असते. यातून स्वप्रगती तर होतेच परंतु राष्ट्राच्या प्रगतीचा तोच संपन्न मार्ग आहे. म्हणून त्यांनी संदेश दिला Be-Educated, Be-organized & Be-Agitated म्हणजेच शिका, संघटित व्हा व संघर्ष करा.

भारतात आणि अर्थातच महाराष्ट्रामध्ये १९ व्या शतकापर्यंत सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक परिस्थिती अत्यंत वेगळी होती. १९ व्या शतकाच्या मध्यानंतर यात मुलगामी परिवर्तन घडून आले आणि हळूहळू सामाजिक जीवनामध्ये त्याचे परिणाम दिसू लागले. जुनी राज्यव्यवस्था नष्ट होवून ब्रिटिशांचे कायद्याचे राज्य आले. त्यांच्या सोयीसाठीच का असेना परंतु ब्रिटिशांनी अनेक सोयी केल्या. दळणवळणाच्या साधनांची वाढ झाली. आणि ग्रामीण व शहरी असा संपर्क येऊ लागला. खेड्यातील ग्रामसंस्थांची स्वयंपूर्णता नाहीशी झाली आणि खुल्या विनिमयावर अधिष्ठित अर्थव्यवस्था आली. रेल्वे, गिरण्या, कारखाने या माध्यमातून नवी यंत्र संस्कृती अस्तित्वात आली. जातीधर्माचे निर्बंध काहीसे सैल होत गेले. या परिस्थितीबरोबर ब्रिटिशांनी इंग्रजी शिक्षणाची सुरुवात केली आणि प्राचीन शिक्षण पद्धतीचे प्रस्थ कमी होऊन भौतिक वैज्ञानिक शास्त्रे परिचयाची झाली. मध्ययुगीन काळामध्ये ज्यावेळी भारतात रुढी प्रामाण्यवाद अधिक होता त्यावेळी पाश्चात्यांचा विज्ञाननिष्ठ, उद्योगप्रधान, भौतिक संस्कृतीला मानणारी आधुनिक संस्कृती ही भारतामध्ये प्रवेश करू लागली होती. १८५४ नंतर रेल्वे बरोबरच टपाल व तारायंत्र यांच्यामुळे भारतात औद्योगिक परिवर्तनाला

चालना मिळाली. वाहतुकीच्या सोयीमुळे यंत्रावर तयार झालेल्या परदेशी मालाने भारतीय बाजारपेठा काबीज केल्या. भारतातील मध्ययुगीन विचार परंपरेला धक्का देण्यासाठी इंग्रजी शिक्षण हे प्रभावी साधन ठरले. नैसर्गिक शास्त्रांबरोबरच सामाजिक शास्त्रांची युरोपात वाढ होत होती. प्रत्येक पंथातील व स्तरातील प्रत्येकाला आपल्या विकासाची संधी मिळावी म्हणून परिवर्तन घडवून आणण्याची युरोपीय विचारवंतांची धडपड चालू होती. म्हणूनच राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास मिमांसा इत्यादी शास्त्रे लोकप्रिय होऊ लागली. भारतामध्ये इंग्रजी शिक्षण सुरू झाल्यामुळे वर्णव्यवस्था ईश्वरनिर्मीत व शाश्वत आहे या श्रद्धेला धक्का बसला. परंतु हे आधुनिक विचारांचे लोण वरिष्ठ वर्गापर्यंत गेले नाही. आपापल्या वर्णव्यवस्थेने व जातीव्यवस्थेने ठरवून दिलेले व्यवसाय करण्यात, शेतकरी आपले काम करण्यात, कारागिरी उपजिविकेसाठी कष्ट करण्यात मग्न राहिले. शेकडो वर्षाच्या बौद्धिक गुलामगिरीमुळे ज्ञान ही आवश्यक बाब आहे आणि ते घेण्याचा आपल्याला अधिकार आहे याची जाणीवही त्यांना नव्हती. वरिष्ठ जातींनीच ज्ञान प्राप्ती करावी अशी परंपरा असल्यामुळे बहुजन समाजाचे अज्ञान दूर करण्याची आपली ही जबाबदारी आहे याची जाणीव इंग्रज शिक्षण घेतलेल्या उच्चवर्णिय शिक्षितांना झाली नाही. त्यांचे राहणीमान जरुर बदलले, मात्र बहुजन समाजाला याचा फायदा झाला नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही अत्यंत कष्टाने इंग्रजी शिक्षण घेतले. शिक्षण घेतल्यानंतर ते स्वतः मोठ्या हुद्द्याची नोकरी करून किंवा वकीली करून गर्भश्रीमंत होऊ शकले असते. परंतु वर्षानुवर्षे बौद्धिक, सामाजिक, आर्थिक गुलामगिरीत राहणा-या आपल्या बांधवांना या गुलामगिरीतून मुक्त करणे ही आपली जबाबदारी त्यांनी मानली. नुसते दलितांचे अश्रू पुसणे, त्यांच्याबद्दल कळवळा वाटणे, सहृदयता असणे पुरेसे नव्हते.याची त्यांना जाणीव होती. त्यांच्या आधी अनेक समाजसुधारकांनी सर्व मानव ईश्वराची लेकरे आहेत हा संदेश जरुर दिला परंतु तो मानवतावादी दृष्टीकोन होता. हाच दृष्टीकोन परिवर्तनवादी करण्याचे कार्य भारतामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.

हे परिवर्तन करणे सोपे नव्हते. बाह्य परिस्थितीत परिवर्तन झाले तरी लोकांच्या मनाची जडण-घडण बदलणे अत्यंत कठीण होते. जुन्या समजुती आणि नवे आदर्श, जुन्या परंपरा आणि नवे सिद्धांत यांच्यामध्ये संभ्रम होता. तसेच जुन्या व्यवस्थेशी हितसंबंध असलेले लोक होतेच. आपले पारंपारिक हक्क टिकवून ठेवण्यासाठी परिवर्तनाला विरोध होणार होता. परंतु दलितांचे सामाजिक जीवन समृद्ध व विकसित बनवण्याची महत्वाकांक्षा त्यांनी बाळगली होती. अशा परस्पर विरोधी मूल्यांच्या कसरतीतून त्यांना वाट काढावी लागली.

**२.२ ज्ञानयोगी व ग्रंथप्रेमी डॉ. बाबासाहेब आंबेडकर :**

शिक्षण व ज्ञानाची महती जाणणारे व ग्रंथप्रेमी म्हणून भारतामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मानले जाते. देश, स्वबांधव यांचा अहोरात्र विचार करून आपल्या ध्येयासाठी सर्वस्व पणाला लावणारे हे ज्ञानयोगी व्यक्तीमत्व. त्यांनी विविध विषयांवर सखोल वाचन व चिंतन करून अनेक संशोधनात्मक ग्रंथांची निर्मिती केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अफाट विद्वत्तेची खून म्हणजे भारतीय घटनेचे शिल्प घडवले.[१]

'भारतीय रुपयांच्या मूल्यांचा प्रश्न', शूद्र पूर्वी कोण होते? अस्पृश्य मुळचे कोण? पाकिस्तान विषयक विचार, स्वतंत्र मुंबईचे राज्य अशा अनेक लहान-मोठ्या ग्रंथांची रचना केली. राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक अशा अनेक प्रश्नांवर लेख लिहिले, व्याख्याने दिली. सामाजिक परिस्थितीमुळे व तत्कालीन समाजकारण व राजकारणामुळे त्यांना परिस्थितीप्रमाणे कधी समाजकारणात तरी कधी राजकारणात पडावे लागले. परंतु त्यांची मूळची प्रवृत्ती व प्रकृती ज्ञानार्जनाचीच होती. घराची प्रतिकूल परिस्थिती, अस्पृश्य जातीत जन्म, सोई-सुविधांमध्ये अडचणी यामुळे त्यांच्या शिक्षण घेण्यामध्ये अनेक अडचणी आल्या होत्या. परंतु त्यांची जिद्द, जिज्ञासा व शिक्षण घेण्याची आस यामुळे त्यांनी आपले शिक्षण तर पूर्ण केलेच. शाळेत केळूसकर गुरुजी, एलफिन्स्टन कॉलेजमध्ये असताना प्रा.म्युलर व प्रा.ईराणी तसेच ब्रिटिश म्युझियम मधील ग्रंथपाल ही मंडळी भेटल्यामुळे त्यांची ग्रंथ वाचनाची इच्छा अधिक दृढ झाली. थोडे जरी पैसे हातात आले तरी ग्रंथ खरेदी ते करत असतं, जणू काही ग्रंथ विकत घेण्याचे व्यसनच त्यांना लागले. मुंबईमध्ये दादरच्या त्यांच्या ग्रंथालयात,

दिल्लीला त्यांच्याबरोबर असलेली पुस्तके ही ३० हजार पुस्तके होती. त्यांचे प्रचंड वाचन होते. नुसतेच ग्रंथवाचून त्यांनी कधी सोडून दिले नाहीत तर ग्रंथांतील संदर्भ लक्षात ठेवीत असत व त्यातील टिपणे कढीत असत. आपले कोणतेही लेखन परिपूर्ण असावे यावर त्यांचा कटाक्ष असे. प्रा.बाळ गाडगीळ हे त्यांची एक आठवण सांगतात, ते म्हणतात, 'सिद्धार्थ कॉलेज स्थापन करणारी मातृसंस्था 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' या संस्थेचे डॉ.बाबासाहेब हे अध्यक्ष (Chairman) होते. तर, आमच्या सिद्धार्थ कॉलेजमध्ये आमच्या चेअरमन नी आमच्या विद्यार्थ्यांना लोकशाही म्हणजे काय याचे शिक्षण मिळावे म्हणून आमच्या महाविद्यालयात एक पार्लमेंट सुरू करण्याचे ठरविले. त्या निर्णया प्रमाणे निवडणुका घेण्याचे ठरले. अनेक निरनिराळे पक्ष उगवले आणि त्यांनी आपापले उमेदवार जाहीर केले. कोणत्या पक्षाला बहुमत मिळाले, ते मला आज आठवत नाही. पण कोणत्या तरी पक्षाला बहुमत मिळाले. (तो बहुधा समाजवादी पक्ष नसावा, एवढे कदाचित खरे असेल.) आणि महत्त्वाची घटना म्हणजे, आमच्या कॉलेज पार्लमेंटच्या उद्‌घाटनाचा दिवस उजाडला. आमच्या कॉलेजमध्ये मोठी दालने (हॉल्स) होती.पण डॉ.आंबेडकर स्वतः उपस्थित राहणार त्या वेळचे मुख्यमंत्री (P.M. Hounourable Prime Minister असे त्या काळात म्हणत असत.) माननीय बाळासाहबे खेर हजर राहणार, तर त्या सभेला साहजिकच चांगली गर्दी होणार नाही. हे लक्षात घेऊन आमच्या प्राचार्यांनी आमच्या कॉलेजच्या झोपड्यां शेजारच्या (hutments) एन.एन.डी.टी. चा मोठा असेंब्ली हॉल या सभेसाठी मुक्रर केला होता. त्या वेळी कॉलेजच्या लोकसभेचे उद्‌घाटन करताना डॉक्टर साहेबांनी 'संसदीय लोकशाही' (Parlimentary Democracy) या विषयावर पाऊण एक तास अस्खलित इंग्रजीत सुंदर भाषण केले. ते त्यांच्या पद्धती प्रमाणे इतके रेखीव आणि बांधेसूद होते की, माझ्या त्या वेळच्या पद्धतीप्रमाणे घरी आल्यावर मी त्या सभेचा वृत्तांत जेव्हा माझ्या दैनंदिनीत लिहिला, तेव्हा त्यांचे बहुतेक सर्व मुद्दे मला आठवत होते. त्या प्रसंगानंतर किंवा आधी ही श्रवणीय भाषणे मी खूप ऐकली, पण बाबासाहेबांचे त्या दिवशीचे भाषण ही कधीही विसरू शकणार नाही. त्यांच्या नंतर सभेचे अध्यक्ष नामदार बाळासाहेब खेर यांचेही भाषण झाले. एका अर्थाने तेही बरे

झाले. हे मी आशासाठी म्हणतो की बाळासाहेब हे चांगले, चटपटीत, थोडेसे विनोदी, हलके फुलके असे बालले हे खरे, पण गंभीर, विचारवंताच्या वक्तृत्वाची सर त्याला कधीही येणे शक्य नव्हते. एकंदरीत बाबासाहेबांचे आधीचे भाषण आणि ना.बाळासाहेब खेरांचे भाषण यातला फरक आमच्या पैकी बहुतेक सिनिअर विद्यार्थ्यांच्या लक्षात आल्याशिवाय राहिला नाही. अर्थात यावरून असे समजू नये, की बाबासाहेबांनी संसदीय लोकशाही बाबत कसली रेकॉर्ड वगैरे लावली. त्यांच्या भाषणात ही विनोदाचा फुलोरा होता. ब्रिटिश पार्लमेंटचे कामकाज चालताना काय काय गमती-जमती होतात, याविषयीही ते बोलले. ते फार चुरचुरीत आणि खमंगसुद्धा होते.[२] शिक्षण आणि समाज, शिक्षण आणि माणुसकी असा परस्पर संबंध बाबासाहेबांना अभिप्रेत होता. त्यात त्यांनी कधीही तडजोड केली नाही.[३] अमेरिकेमध्ये १९१३ मध्ये ते गेले. अर्थशास्त्रा सारखा क्लिष्ट विषय त्यांनी निवडला.तेथे कोलंबिया विद्यापीठाच्या ग्रंथालयात ते १८-१८ तास अभ्यास करून नोट्स काढत असत. १९१५ मध्ये एम.ए.ची पदवी मिळविल्यानंतर एका वर्षात डॉक्टरेटचा प्रबंधही सादर केला. अमेरिकेतील वास्तव्यात अनेक वेळा अर्धपोटी राहून पैसे वाचवून मौलिक पुस्तके मिळवण्यासाठी जुन्या पुस्तकांच्या दुकानात वेळोवेळी जावून ग्रंथ विकत घेत असत. तेथून लंडनला जाताना हे ग्रंथ त्यांनी भारतात पाठवले. ज्यांच्या बरोबर हे ग्रंथ पाठवले त्याच्या निष्काळजीपणामुळे ही पुस्तके सुस्थितीत आली नाहीत. त्यातल्या प्रत्येक पुस्तकावर त्यांनी अभ्यास केला होता. त्यातून प्रेरणा घेतली होती. पुन्हा-पुन्हा वाचन केलेल्या या ग्रंथातील अनेक वाक्य मुखोद्गत होती. पुढे त्यांनी ही पुस्तके जुन्या बाजारातून मिळविली होती.

आर्थिक चणचणीमुळे त्यांना पुढे सिडनेहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राच्या प्राध्यापकाची नोकरी पत्करावी लागली. मिळणा-या वेतनामध्ये अर्धे पैसे कुटूंबासाठी तर बाकीचे पुढील शिक्षणासाठी त्यांनी ठेवले होते. दोन वर्षात काही रक्कम जमा होताच १९२० मध्ये त्यांनी लंडन विद्यापीठात प्रवेश घेतला. मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयातच अभ्यासाची पूर्वतयारी केली होती. त्यामुळे लंडनमध्ये फक्त आठ महिन्यात त्यांचा प्रबंध तयार झाला आणि १९२१ मध्ये त्यांना एम.एस्सी ची पदवीही मिळाली. त्यानंतर डॉक्टरेटची तयारी सुरू केली. भारतीय नाणक

परिमाण या विषयासाठी आवश्यक ते ग्रंथ व कागदपत्रे ब्रिटिश म्युझियम मध्ये व इंग्लंड मधील इंडिया ऑफीसमध्ये उपलब्ध होती. सकाळी ९ वाजल्यापासून ते बंद होईपर्यंत ते तेथे वाचन करीत असत. एखाद्या सॅण्डवीचवर आपले पोट शांत करीत आणि जेवणाचा वेळ वाचवून वाचन करीत असत. ग्रंथालयास खाण्यास बंदी आहे तुम्ही हा नियम मोडू नका अशी ताकीद त्यांना देण्यात आली. ग्रंथपालाने त्यांची विचारपूस केली आणि ग्रंथपाल स्वतः त्यांच्या जेवणासाठी डबा आणू लागला. डॉक्टरेटचा प्रबंध पूर्ण होत असतानाच त्यांनी 'लॉ'चा अभ्यासक्रम हाती घेतला आणि दोन्ही पदव्या घेऊन ते भारतात परतले. परंतु 'हिंदी मनुष्याला परदेशात अध्ययनास जावयास मिळणे, ही त्या काळी एक मोठी दुर्लभ संधी गणली जाई. स्वाभाविकपणे अस्पृश्य तरुणाला तर ती एक पर्वणीच वाटावी. भारतातील एका अस्पृश्याने अब्राहम लिंकनच्या आणि बुकर टी. वॉशिंगटनच्या मायभूमीला जावे, तेथील उदात्त, स्फूर्तीदायक नि अद्ययावत जीवन अनुभवून आपले सामर्थ्य वाढवावे ही एक अभूतपूर्व घटना होती.[४] परदेशातील त्यांचे वास्तव्य हा त्यांचा अत्यंत समृद्ध अनुभव होता. तेथील समतेच्या वातावरणाने ते भारावून गेले होते. या नव्या दुनियेमध्ये त्यांचे मनाचे व विचारांचे क्षितिज विस्तारले होते. अमेरिकेहून वडिलांच्या एका मित्राला लिहिलेल्या पत्रात त्यांनी पददलितांच्या दैन्यावर उपाय सुचविला होता. तो म्हणजे शिक्षण. अस्पृश्य समाजातील प्रत्येक कार्यकर्त्याने शिक्षणप्रसार हे ध्येय ठेवले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. शेक्सपियरच्या नाटकातील 'प्रत्येक माणसाच्या आयुष्यात जेव्हा संधीची लाट येते तेव्हा त्या संधीचा योग्य प्रकारे उपयोग त्याने केला तर त्या मनुष्यास वैभव प्राप्त होते हे वचन त्यांनी सांगितले.'[५] याचपत्रात त्यांनी एक खंत व्यक्त केली आहे. 'आई-बाप मुलास जन्म देतात, कर्म देत नाहीत असे म्हणणे योग्य नाही.'[६] तेथे शिकत असताना विचारांची चलबिचल आणि कृतीशीलता आणण्यासाठी आपल्या विचारांची समर्थता आवश्यक आहे याची त्यांना जाणीव होती.त्यासाठी अविश्रांत श्रम आणि अध्ययनाचे सातत्य या दोन गोष्टींचा निश्चय त्यांच्या मनात त्यांनी पक्का केला होता. तत्कालीन परिस्थितीत सुद्धा परदेशी जाणा-या तरुणांचा चैनीकडे कल असे परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा कल ध्येयनिष्ठा व समाज बांधवांची

प्रगती याकडेच होता. तेथे अध्ययन करीत असताना तेथील प्राध्यापकांच्या व्यक्तिमत्वाचा आणि विचारांचा त्यांनी जवळून अभ्यास केला. त्यातील एड्वीन सेलिग्मन हे एक होते. संशोधनाची कोणती पद्धत आपण अनुसरावी असे त्यांनी या प्राध्यापकास विचारले त्यावेळी ते म्हणाले होते 'तुम्ही आपले काम कळकळीने करीत रहा म्हणजे त्यातून तुमची स्वतःची पद्धती आपोआपच निर्माण होईल.'[७] त्यांच्या ग्रंथाच्या अमाप वेडापाई त्यांना आपल्या तहान-भूकेची देखील जाणीव होत नसे. एखाद्या आवश्यक बाबीची खूपच गरज वाटली तर काही जवळच्या मित्र आणि परिचितांकडून उसनवारी करावी लागत असे आणि काटकसर करून ते मित्र ऋणाची लगेच परतफेड करीत असत. एखादा ग्रंथ हातात पडताच ते बेभान आणि उल्हासी होऊन तात्काळ त्या पुस्तक वाचनात ते बुडून जात. ह्या निर्विकल्प समाधीत दंग झालेला हा ज्ञानतपस्वी पाहण्याचे भाग्य ज्याला लाभले असेल, त्यालाच ह्या ग्रंथवेडाची अपूर्वाई प्रत्ययास आली असेल.

पुस्तक वाचनाच्या प्रेमापोटी त्यांच्या ग्रंथसंपदेत नेहमीच भर पडत राहिली. पण पुढे जाऊन त्याची साठवणूक कोठे करावी? असा प्रश्न त्यांना पडला. त्यातून मार्ग काढण्यासाठी त्यांनी आपले मित्र नाईक, प्रा. अनंतराव काणेकर व ना.म.जोशी ह्यांच्या सोशल सर्व्हिस लीगच्या कार्यालयात शेजारच्या हॉलच्या बाहेर एका कोप-यात आपल्या पुस्तकांचे खोके ठेवण्याची परवानगी त्यांना मिळाली. अनेक वेळा ते तेथेच रात्री उशीरापर्यंत वाचन करीत असत. ना.म.जोशी-बखले या वाचनालयातील बहुतेक सर्व पुस्तके मराठीतूनच होती. आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मराठी ग्रंथ वाचनाचा नाद इथेच लागला. टिळक, आगरकर, चिपळूणकर, शिवरामपंत परांजपे, केळकर, सावरकर आदींचे गद्य वाड्.मय तसेच कोल्हटकर, गडकरी, खाडिलकर, वरेरकर, औंधकर, टिपणीस इत्यादींचे नाटके त्यांनी खूप आवडीने वाचली. या सर्व वाचन प्रकारातून त्यांनी आपल्या साप्ताहिकातून अग्रलेख आणि स्फूट लेखन शैलीतून त्यांना मराठी भाषेत लिहिणे सुलभ झाले.

१९२७ पासून जसे ते सामाजिक चळवळीमध्ये पडले तसा त्यांचा सत्याग्रह, सभा, संमेलने यामध्ये अधिकाधिक वेळ जाऊ लागला. अनेक दौरे होत त्यावेळी ते आपल्या सोबत पुस्तके घेत. त्यातून थोडा जरी वेळ मिळाला तरी ते तो वेळ

वाचनात घालवत असत, इतके त्यांचे ग्रंथप्रेम होते. त्यांच्या ग्रंथप्रेमाचे प्रतिक म्हणजे आपल्या मौल्यवान ग्रंथ संग्रहासाठी त्यांनी उभारलेले 'राजगृह' होय. ही वास्तु अत्यंत आकर्षक होती. राजगृह म्हणजे आपल्या समृद्ध ग्रंथसंपदेसाठी त्यांनी बांधलेले निवासस्थान होय. जागेची निवड इथपासून संपूर्ण इमारतीची रचना त्यांनी स्वतः जातीने तयार केलेली होती. रोमन पद्धतीचे स्तंभ मोठे पोर्च, सुंदर नक्षीकाम, गॉथीक पद्धतीचे सज्जे, वरील मजल्यावर जाण्यासाठी लाकडी जीना, हॉलचे लाकडी प्रवेशद्वार, हे त्यांनी स्वतः आवडीप्रमाणे तयार करून घेतले होते. दोन मजले असलेले हे राजगृह त्यातील पहिला मजला हा फक्त ग्रंथसंग्रहासाठी होता. या ग्रंथालयात सुमारे २२ हजार ग्रंथ होते. यामध्ये तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, धर्मशास्त्र, राज्ये अशा विविध विषयांवरील दर्जेदार ग्रंथ उपलब्ध होते. या बरोबरच सर्व भाषांचे कोष, कायदा, इतिहास, संस्कृती असेही अनेक ग्रंथ होते. १९४२ मध्ये मजूरमंत्री म्हणून जेव्हा त्यांची नियुक्ती झाली तेव्हा ते दिल्लीला गेले त्यावेळी आपल्या सोबत त्यांनी सुमारे दोन हजार ग्रंथ वाचनासाठी नेले होते. त्यांचे हे वाचन म्हणजे वेळ घालवण्यासाठीचा छंद नसून तो त्यांचा ध्यास होता. 'केळुसकर या गुरुजींनी लिहिलेले बुद्ध चरित्र १९०८ मध्ये ते मॅट्रिक झाले तेव्हा त्यांना भेट म्हणून मिळाले होते.' त्याकाळी त्यांनी त्याची पारायणे केली होती. कालांतराने जेव्हा त्यांनी धर्मांतराची घोषणा केली, तेव्हा पासून त्यांनी सर्व धर्मांचा अभ्यास करण्यासाठी ग्रंथ गोळा करण्यास सुरूवात केली होती. बायबल, कुराण, पारशी व ज्यू धर्मग्रंथ, हिंदूधर्मा संबंधीचे सर्व ग्रंथ याबरोबरच बौद्ध धर्माची त्रिपिटके, भगवान बुद्धाची चरित्रे इत्यादी जमवून त्यांच्या तौलनिक अभ्यासात त्यांनी मन लावले.[८] डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे खरे स्मारक म्हणजे त्यांचे हे 'राजगृह ग्रंथालय' होय.[९]

सुनीता गायकवाड असे म्हणतात, समाजात काही माणसं आपली गुणवत्ता, कला, सामर्थ्य, संपत्ती, बुद्धिमत्ता यांचा वापर आपली व्यक्तिगत उंची वाढविण्यासाठी करतात. दुस-यांना ते त्रासदायक नसले तरी अशी माणसं दुस-यावर उपकारही करत नाहीत. पण काही माणसं आपल्या गुणवत्तेचा, बुद्धिमत्तेचा, ज्ञानाचा वापर दुस-यांच्या जीवनातील दुःखे दूर करण्यासाठी करतात. होरपळणा-या बरोबर

स्वतः होरपळून दुस-याला गारवा देतात. आपल्या बुद्धिमत्तेच्या स्पर्शानं सामान्यांना संपन्न करतात. अशा व्यक्तीमुळं मानवजातीचं मस्तक अभिमानानं उन्नत होतं.[१०] याची प्रचिती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ग्रंथ लेखनातून येते. घटनेचे शिल्पकार दलितोद्धारक, कायदेपंडीत अशा अनेक उपाध्या त्यांना आहेत. परंतु केवळ स्वतःहा पुरते ज्ञान संपादन न करता विद्येचा प्रसार समाजाच्या तळागळा पर्यंत व्हावा यासाठी त्यांनी जो प्रयत्न केला तो अवर्णननीय आहे. ज्ञान बंदीस्त असून उपयोगी नाही तर सर्व सामान्यापर्यंत पोहचविण्यासाठी काहीतरी केले पाहिजे. या विचारातून त्यांनी शिक्षणसंस्था सुरू केल्या. त्याकाळी हे कार्य करणे अत्यंत कठीण होते परंतु आपले ग्रंथप्रेम व ज्ञानसाधना यांच्या या गुणांमुळे त्यांनी अनेक ग्रंथांचे लेखनही केलेले आहे. या ग्रंथांच्या शीर्षकावरूनच आपल्याला त्यांच्या अभ्यासातील वैविध्य, व्यासंग याची कल्पना येते. यामध्ये विद्यार्थी दशेपासून ते भाषावार प्रांतरचने पर्यंतचा समावेश आहे. यामध्ये शोधनिबंध, निबंध, प्रबंध, लेख, अहवाल, ग्रंथ यांचा समावेश आहे. त्यांच्या या व्यासंगाने त्यांच्या सिद्धहस्त लेखणीने अनेक ग्रंथांची निर्मिती केली ती पुढीलप्रमाणेः

| अ.क्र. | वर्ष | ग्रंथाचे नाव |
|---|---|---|
| १. | १९१५ | ईस्ट इंडिया कंपनी. प्रशासन आणि अर्थनिती |
| २. | १९१६ | भारतातील जाती, त्यांची घडण, उत्पत्ती आणि वाढ |
| ३. | १९१७ | भारतातील ब्रिटिश सत्तेची प्रांतिक, वित्तीय क्रांती |
| ४. | १९१८ | श्रीयुत रसेल आणि समाजाची पुनर्बांधणी |
| ५. | १९१८ | भारतातील लहान शेतजमिनी आणि त्यावरील उपाय |
| ६. | १९२३ | रूपायाचा प्रश्नः उद्‌गम आणि विकास |
| ७. | १९३६ | जातींचे निर्मूलन संघराज्य विरुद्ध स्वराज्य |
| ८. | १९४० | पाकिस्तानवरील विचार |
| ९. | १९४२ | रानडे, गांधी आणि जिना |
| १०. | १९४३ | श्रीयुत गांधी आणि अस्पृश्यांचा उद्धार |
| ११. | १९४५ | जातीय तेढ आणि ती सोडविण्याचे उपाय |
| १२. | १९४५ | काँग्रेस आणि गांधी यांनी अस्पृश्यांसाठी काय केले? |
| १३. | १९४६ | शूद्र पूर्वी कोण होते? |

| | | |
|---|---|---|
| १४. | १९४७ | भारतीय चलनाचा इतिहास आणि बँक व्यवसाय |
| १५. | १९४७ | संस्थाने आणि अल्पसंख्य यांचे हक्क काय आहेत? |
| १६. | १९४७ | अस्पृश्य पूर्वी कोण होते? |
| १७. | १९४८ | महाराष्ट्रः एक भाषिक प्रांत |
| १८. | १९५० | हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती |
| १९. | १९५३ | नियंत्रण आणि समतोल यांची आवश्यकता |
| २०. | १९५४ | हिंदूत्त्वातील कूटप्रश्न |
| २१. | १९५५ | भाषिक राज्यासंबंधी विचार |
| २२. | १९५६ | बौद्धधम्म आणि साम्यवाद |
| २३. | १९५६ | पाली व्याकरण,शब्दकोश आणि बौद्ध पूजापाठ |
| २४. | १९५६ | बुद्ध की कार्ल मार्क्स |
| २५. | १९५६ | बुद्ध आणि त्यांचा धम्म |
| २६. | १९८६ | क्रांती आणि प्रतिक्रांती |

**२.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार :**

'शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा क्रांतीचा संदेश देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सातत्याने शिक्षणाचा आग्रह धरत होते. त्यांना जाणीव होती की, भारतीय समाजव्यवस्थेने ज्ञानाची द्वारे सर्व समाजासाठी असतात हे मानलेच नाही. ज्ञानसंपादन हे विशिष्ट वर्गाचे कार्य आहे अशा समजुतीमुळे खूप मोठा समाज शिक्षणापासून वंचित राहिला होता. विद्येच्या अभावी मनुष्य मानसिक गुलाम होऊन सामाजिक व सांस्कृतिक गर्तेत कसा आडकतो या विषयी ते म्हणतात, उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हीनबल होऊन अल्पायुषी होतो. तसेच शिक्षणाच्या अभावी जिवंतपणी तो दुस-याचा गुलाम होतो. त्यांच्या मते, शिक्षणाचा उद्देश केवळ माहिती किंवा सिद्धांत शिकवणे हा नसून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित होईल, त्यांच्या मानसिक, बौद्धिक क्षमतांची वाढ होईल, प्रस्थापित अधिकारी विद्वानांच्या विचारांचे टीकात्मक परीक्षण करण्यास ते समर्थ होतील. प्रथम सूत्रांचा शोध घेऊन ते आवश्यक माहिती मिळविण्याचा प्रयत्न करतील. त्यांच्या मनात कोणत्याही विषयाविषयी जिज्ञासा निर्माण होऊन, त्याद्वारे सखोल अध्ययनाच्या प्रवृत्ती विकसित होतील.

त्याचप्रमाणे सत्याचा शोध किती अवघड आहे. याची त्यांना जाणीव होईल, तरीही त्या मार्गावर जाणे किती आवश्यक आहे हे त्यांना जाणवेल.[११]

१९३२ मध्ये परळ येथील दामोदर हॉलमध्ये त्यांचे जे भाषण झाले त्यावरून त्यांच्या शैक्षणिक विचारांचा गाभा लक्षात येतो. ते असे म्हणतात की, 'या देशातील उच्चनीचता दृढमूल होण्यास समाजातील जातीव्यवस्था हे तर कारण आहेच पण तीस चिरस्थायित्व जातीजातीतील गुणवैशिष्ट्यामुळे आले आहे. काही ठराविक जातीचे श्रेष्ठत्व इतर जातीतील ज्ञानाभावामुळे कायम राहिले. सरकार दरबारातील मोठमोठ्या नोक-या, मामलतदारी किंवा पोलिस अधिकारी वगैरे सारख्या लोकांवर सत्ता गाजविणा-या जागा या सर्वात अस्पृश्य समाजास अद्याप पावेतो संपूर्ण मज्जाव असे. यामुळे प्रत्यक्ष व्यवहारात या समाजाची अवहेलना तर होतेच पण या समाजाकडे इतर जातीचा पाहण्याचा दृष्टिकोनही अगदी भिन्न प्रकारचा असतो. हा अकुंचित दृष्टिकोन बदलून आपल्या समाजाबाबत इतरांच्या मनात वावरत असलेली असमानतेची भावना नष्ट करावयाची असेल तर त्यास रामबाण उपाय म्हटला म्हणजे या अंमलदारीच्या जागा संपादन करणे हा होय. उदाहरण द्यायचे म्हटले तर, डेप्युटी कलेक्टरचे काम करीत असलेल्या एका अस्पृश्य तरुणाचे होय. ते ज्या-ज्या जिल्ह्यात जातात तेथील अस्पृश्य समाजास आपल्यावर खरेखुरे कृपाछत्र आहे असे तर वाटतेच पण शिवाय अस्पृश्यांना तुच्छतेने लेखण्याची जी इतर समाजाची भावना ती कमी व्हावयास लागते. असे अनेक अधिकारी झाल्यास आजची परिस्थिती पालटल्या शिवाय राहणार नाही. परंतु आपण ही गोष्ट कधीही विसरता कामा नये की, जर आताच सांगितलेल्या गृहस्थाने उच्च शिक्षण संपादन करून आपली लायकी प्रस्थापित केली नसती तर हा थोडासा फरक देखील आपल्याला लाभला नसता. हाडाची काडे करून त्यांनी शिक्षण संपादन केले नसते तर ही परिस्थिती प्राप्त झाली असती काय? तेव्हा आपला व्यक्तीविषयक लौकिक वाढविणे व त्याबरोबरच आपल्या समाजाची योग्यता वाढविणे हे केवळ शिक्षणावर अवलंबून आहे. आज कायद्याने जरी आपण आपल्या समाजाकरीता सरकारी नोकरीत आपले प्रमाण ठरवून घेतले तरी योग्य ते शिक्षण घेऊन अंगी लायकी प्राप्त करून घेतल्याशिवाय आपल्या मागण्या निष्फळ होतील व आपले माप आपल्याच

दौर्बल्यामुळे पुरेपूर पदरात पडणार नाही. गोलमेज परिषदेपुढे म्हणा किंवा अन्य कोणत्याही ठिकाणी म्हणा ज्या ज्या प्रसंगी मला अस्पृश्य समाजाकरीता कायदे कौन्सिलात राखीव जागा मागताना नेहमी हाच मोठा प्रश्न पडत असे. पण अस्पृश्यांच्या वाढत्या महत्त्वकांक्षा व दिवसेंदिवस वृद्धिंगत होणारी ज्ञानलालसा ह्यावर माझा पूर्ण विश्वास असल्यामुळे मला धीर येत असे. गेल्या काळाशी तुलना करता आज अस्पृश्य समाजास उपलब्ध असलेली ज्ञानार्जनाची साधने व परिस्थितीत पडलेला फरक पाहिला असता आपल्याला एक प्रकारची उमेद येते असे त्यांनी सांगितले.[१२] त्यांच्या मते विद्यार्थी दशा पुन्हा पुन्हा प्राप्त होत नसते. या काळात प्रयत्नाने ज्ञान संपादन करावे. विद्यार्थ्यांनी शिक्षण प्राप्ती हे ध्येय ठेवावे.

मानवाच्या उन्नयनाचे साधन म्हणून त्यांनी शिक्षणाकडे पाहिले. मूल्याधिष्ठित शिक्षणाला त्यांनी नेहमीच महत्त्व दिले. विषमताधिष्ठित शिक्षणाने भारताचे नुकसान झालेले आहे. शिक्षण घेऊन नोकरी करणा-या लोकांना बाबासाहेबांनी असे म्हटले आहे की, 'आपल्या दरिद्री आणि अज्ञानी बांधवांची सेवा करणे हे कर्तव्य आहे.' शिकलेल्या माणसांमध्ये काही दोष असतात. शिकल्यावर नोकरीच्या पाठीमागे लागणे हा दोष नव्हे, ते दोष व ते अवगुण तुमच्या अंगात शिरणार नाहीत याची खबरदारी घ्या. शिक्षण पुरे झाल्यावर मनुष्य स्वार्थी बनतो. मनुष्य स्वार्थी असणे हे स्वाभाविकच आहे. परंतु शिकलेला मनुष्य स्वतःच्या हिताचीच काळजी घेतो. मॅझिनी म्हणतो की, "लोकात पारतंत्र पसरले. माणसे शिकली तरी त्यांच्यात कर्तव्यापेक्षा हक्कांची जाणीव जास्त उत्पन्न होते" आपले कर्तव्य कोणते, याची भावना जागृत होत नाही हा एक शिकलेल्या माणसाचा दोष आहे. १२ डिसेंबर १९३८ रोजी मुंबई अस्पृश्य विद्यार्थी संमेलनामध्ये त्यांनी हे विचार मांडले. ते म्हणतात, तुम्ही घाणीत पडलेली रत्ने आहात. अत्यंत घाणेरड्या पाण्यात अत्तराचा थेंब पडावा त्याप्रमाणे तुमची स्थिती आहे. तुमच्या आईबापांना शिक्षण नाही. अठराविश्व दारिद्रय. तेव्हा हा मैल साफ करणे हे तुमचे कर्तव्य आहे. शिकवा चेतवा आणि संघटित करा, स्वतःच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवा आणि निराश होऊ नका. मी सदैव तुमच्या सोबत राहिल. २० जुलै १९४२ च्या नागपूर येथील अखिल भारतीय

दलित परिषदे प्रसंगी त्यांना दिलेल्या मानपत्राच्या उत्तरादाखल त्यांनी काढलेल्या या उद्‌गाराचे बोल अत्यंत महत्वाचे आहेत.

आपल्या शैक्षणिक विचारांमध्ये पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनीही प्रत्येक कार्यात सहभागी व्हावे आपली शैक्षणिक प्रगती करावी असे मत त्यांनी मांडले होते. शिक्षण हे सामाजिक क्रांतीचे साधन आहे. शिक्षणाच्या अभावी माणूस गुलाम होतो त्यामुळे प्रत्येकाला शिक्षण मिळाले पाहिजे. शासनाने सक्तीचे व मोफत शिक्षण दिले पाहिजे. माणसाला माणूस म्हणून जगण्याची पात्रता शिक्षणच देते असा आग्रह त्यांनी धरला होता. शिक्षणाच्या अभावाने वंचितांच्या जीवनातील गती थांबली होती. जीवन अर्थहीन झालेले होते. शिक्षणाने मनुष्यत्व येते व म्हणजेच माणूस बनण्याची प्रक्रिया होते. विचारी माणूसच देशविकासांमध्ये हातभार लावू शकतो म्हणून शासनाने शिक्षणाला उत्तेजन दिले पाहिजे. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचा ध्यास घेतला होता. मुलींसाठी शाळा, योग्य शिक्षक, माणूस घडवणे त्यासाठी समाजाकडे व शासनाकडे पाठपुरावा करणे हे कार्य त्यांनी केले. यातून विवेकी समाज घडून उन्नतीचा मार्ग या शिक्षणाच्या मार्गातून खुला होणार होता. महात्मा फुले यांच्या कार्याला अभिवादन म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना गुरू मानले होते. शिक्षण म्हणजे सम्यक परिवर्तन होय हेच त्यांनी सामाजिक क्रांतीचे सूत्र मानले होते. प्राथमिक शिक्षण, सहशिक्षण, उच्च शिक्षण या संबंधी देशाचे धोरण, विद्यापीठांच्या भूमिका, प्राध्यापकांच्या भूमिका, विद्यार्थ्यांच्या भूमिका यासंबंधी त्यांचे मौल्यवान विचार आहेत. ज्यांना शिक्षणाचे महत्व कळत नाही त्यांच्यासाठी सक्तीच्या कायद्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली. प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न हा राष्ट्रीय प्रश्न आहे असे मानले. ३१ मे १९२९ रोजी महाबळेश्वर येथील परिषदेत दिलेल्या भाषणात ते म्हणतात, "प्राथमिक शिक्षणाचा प्रसार हा राष्ट्रीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. सध्याच्या युगात ज्या देशातील बहुजन समाज निरक्षर आहे, अशा देशाचा जीवनकलहात टिकाव लागायचा नाही, हे सांगावयास नकोच. प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार सर्वांगीण राष्ट्रीय प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे. केवळ लोकांच्या खुषीवर हा प्रश्न सोपविल्यास प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा करावा लागतो. आघाडीस आलेल्या

जगातील सर्व देशांनी सक्तीचा कायदा करून लोकांची निरक्षरता हद्दपार केली असे आपणास दिसून येते. जे वर्ग आधीच शिक्षणाचा लाभ घेतात, त्यांच्यावर शिक्षणाची सक्ती करावी लागत नाही. ज्यांना शिक्षणाचे महत्त्व कळत नाही व जे त्याबाबतीत उदासीन असतात, त्यांच्या करीताच सक्तीच्या कायद्याची आवश्यकता असते."[१३]

शिक्षणाचा उपयोग आपल्या बांधवांच्या सुधारणांसाठी करावा या संबंधी बोलताना ते म्हणतात, "भारतामध्ये बहुसंख्य जनता अज्ञान आणि भोळसर खुळया कल्पनेत गुरफटून गेली आहे. नव्हे, येथील समाजरचनाच खुळया कल्पनांना जन्म देते. म्हणून उपास-तापास, नवस-सायास, देव-देवऋषी करणे म्हणजे धर्मपालन करणे, अशी लोकांची भावना झालेली आहे. या खुळया आणि धर्मभोळया जनतेची या कल्पनेतून सुटका करावयास पाहिजे. विद्यार्थ्यांनी चाळीचाळीत जाऊन जनतेचे अज्ञान आणि खुळया समजुती दूर केल्या पाहिजेत. तरच आत्ताच्या शिक्षणाचा जनतेला लाभ होईल. आपण आपल्या ज्ञानाचा केवळ परीक्षा पास करण्यासाठीच उपयोग करून चालणार नाही. ज्ञानाचा उपयोग आपण आपल्या बांधवांची सुधारणा, प्रगती करण्याकरीता केला पाहिजे, तरच भारत उन्नतावस्थेला जाईल."[१४] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या सर्व विचारातून आणि कार्यातून संपूर्ण समाजाच्या, संपूर्ण देशाच्या उन्नतीचा विचार व्यक्त झाला आहे. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, या भूमिकेतून स्त्री-पुरुषांच्या शिक्षणासाठी व्यापक मोहिम त्यांनी राबविली. सहशिक्षणाचा विचार सांगून प्रत्यक्ष अंमलात आणला. ज्ञान म्हणजे व्यक्तीच्या जीवनाचा पाया आहे आणि म्हणूनच प्रत्येक विद्यार्थ्याने बुध्दिचा विकास करण्यासाठी हालअपेष्टा सहन करून ज्ञान मिळविले पाहिजे, त्या ज्ञानाच्या बळावर स्वतंत्रपणे विचार करावयास शिकले पाहिजे, हे विचारसूत्र सर्वांना दिले. देशाच्या शैक्षणिक स्थितीचा विचार करून समाज आणि शिक्षण यांचा अनुबंध सर्वांसमोर ठेवला.[१५] या पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकरांचे विचार व कार्य महत्त्वाचे आहे. वास्तव मात्र हेच आहे की, "या देशाचा विकास साधावयाचा असेल, स्वातंत्र्य-समता-बंधुता या सामाजिक न्यायावर आधारलेला उन्नत समाज उभा करावयाचा असेल, निकोप लोकशाही आणावयाची असेल आणि विषमता गाडण्याची मनापासून इच्छा असेल, तर

शिक्षणाचा सम्यक विचार देणारे डॉ. आंबेडकर सर्वांचे नेते आहेत, हे सर्व शिक्षितांनी समजून घ्यावे लागेल. शिक्षितांच्या मस्तकातील जातीचा वळवळणारा किडा मेला पाहिजे. पण झाले उलटेच. शिक्षणाने जातीय अहंकार अधिक टोकदार झाले आहेत. समाजाचे स्वास्थ्य या जातीय अहंकाराने नासवून टाकले. शिक्षणातून अधिक व्यापक भूमिका तयार झाली, जातीपातीच्या पलीकडे जगायला शिकले तरच आपले भले होईल याचे भान आता यायलाच हवे. तरच आपला विनाश थांबेल. तरच आपले भले होईल."[१६]

त्यांनी आपल्या आयुष्यात तीन गुरू व तीन उपास्य दैवते मानले. तीन गुरू १) भगवान बुद्ध २) कबीर ३) महात्मा फुले व तीन उपास्य दैवते १) विद्या २) स्वाभिमान ३) शील. विद्येला त्यांनी दैवत मानले होते. ते म्हणतात, विद्येशिवाय मानवाच्या आयुष्यात शांतता व माणुसकी नाही. ती सर्वांना अवगत झाली पाहिजे. ती महासागरासारखी आहे. ज्याप्रमाणे माणसाला अन्नाची आवश्यकता असते तशीच विद्येचीही असते. ज्ञानाशिवाय मनुष्य काहीही करू शकत नाही. १९२७ च्या आक्टोबर मध्ये ते असे म्हणतात की, भारतात ९० टक्के लोक निरक्षर आहेत. याचे कारण धर्माचे कायदे आड आले आणि ब्राह्मणांनी आमची विद्या हिरावून घेतली. सर्वांना विद्येचे वेड पाहिजे विद्येची २४ तास पूजा केली पाहिजे.

## २.४ प्राथमिक शिक्षण विषयक विचार :

१५ जुलै १९२७ च्या 'बहिष्कृत भारत' च्या अंकामध्ये प्राथमिक शिक्षणाबद्दलचे त्यांचे विचार लक्षात येतात. मुंबई इलाख्याच्या शिक्षण खात्याचा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला त्यावेळी हा अग्रलेख त्यांनी लिहिला होता. ते म्हणतात, हा अहवाल लक्षपूर्वक वाचला तर असे लक्षात येते की, या इलाख्यातील शिक्षणाच्या प्रसाराचा प्रकार अत्यंत आश्चर्यजनक आहे. शिक्षणाच्या प्रसाराचा हिशोब देण्यासाठी या इलाख्यातील प्रजेचे चार विभाग करण्यात आले आहेत. हा संपूर्ण अग्रलेख देण्याची येथे आवश्यकता आहे. १) पुढारलेला वर्ग, अथवा ब्राह्मण व तत्सम जाती २) मध्यम वर्ग अथवा मराठा व तत्सम जाती ३) कनिष्ठ वर्ग अथवा अस्पृश्य व तत्सम जाती आणि ४) मुसलमान वर्ग. लोकसंख्येच्या मानाने पाहिले तर मराठा व तत्सम जाती यांचा पहिला, अस्पृश्य व तत्सम

जातीचा दुसरा, मुसलमान वर्गाचा तिसरा आणि ब्राह्मण जातींचा चौथा नंबर लागेल. शिक्षण प्रसाराच्या दृष्टीनेही असाच अनुक्रम लागावयास पाहिजे. पण खरा प्रकार आगदी उलट आहे. मराठा व तत्सम जातींचा लोकसंख्येच्या मानाने पहिला नंबर लागतो. पण उच्च शिक्षणांत तसाच दुय्यम व प्राथमिक शिक्षणांत त्यांचा तिसरा नंबर आहे. अस्पृश्य व तत्सम जातींचा लोकसंख्येच्या मानाने दुसरा नंबर लागतो. पण उच्च शिक्षणांत तसाच दुय्यम व प्राथमिक शिक्षणांत त्यांचा नंबर चौथा म्हणजे शेवटचा आहे. मुसलमान वर्गाचा लोकसंख्येच्या मानाने तिसरा नंबर आहे. परंतु उच्च शिक्षणांत तसाच दुय्यम व प्राथमिक शिक्षणांत त्यांचा नंबर दुसरा म्हणजे मराठा व तत्सम जाती व अस्पृश्य व तत्सम जाती यांच्यावरचा आहे. या सर्वांना कळस म्हणून समजल्या जाणार्या ब्राह्मण व तत्सम जातींचा लोकसंख्येच्या मानाने चौथा म्हणजे शेवटचा नंबर लागतो. पण नवल हे आहे की, या चिमुकल्या जातींनी उच्च शिक्षणांत तसेच दुय्यम व प्राथमिक शिक्षणांत पहिला नंबर पटकाविला आहे. या इलाख्यांतील शिक्षण प्रसाराच्या अध्यायांतील ही कथा विस्मयकारक आहेच. पण वर जी निरनिराळया जातींची शिक्षणांतील क्रमवारी दिली आहे. तिच्यावरून एकावर्गाने दुस-या वर्गास किती टांगानी मारले आहे, याचा बोध होणे शक्य नाही. ते कळण्यास दरेक वर्गात किती अंतर पडले आहे याची इत्यंभूत कल्पना आली पाहिजे. ती यावी म्हणून गतसाली प्रसिद्ध झालेल्या अहवालावरून खालील आकडे आम्ही देत आहोत.

**प्राथमिक शिक्षण :**

सदर वर्गाच्या दर हजारी लोकसंख्येशी त्या वर्गातील विद्यार्थ्यांचे प्रमाण,

| वर्ग | लोकसंख्या (दर हजारी) |
|---|---|
| ब्राह्मण व तत्सम जाती | ११९ |
| मुसलमान | ९२ |
| मराठा व तत्सम जाती | ३८ |
| अस्पृश्य व तत्सम जाती | १८ |

**दुय्यम शिक्षण**

सदर वर्गाच्या दर एक लाख लोकसंख्येशी त्या वर्गातील विद्यार्थ्यांचे प्रमाण,

| वर्ग | लोकसंख्या (दर एक लाखात) |
|---|---|
| ब्राह्मण व तत्सम जाती | ३,००० |
| मुसलमान | ५०० |
| मराठा व तत्सम जाती | १४० |
| अस्पृश्य व तत्सम जाती | १४ |

**उच्चशिक्षण**

सदर वर्गाच्या दर दोन लाख लोकसंख्येशी त्या वर्गातील विद्यार्थ्यांचे प्रमाण,

| वर्ग | लोकसंख्या (दर दोन लाखात) |
|---|---|
| ब्राह्मण व तत्सम जाती | १,००० |
| मुसलमान | ५२ |
| मराठा व तत्सम जाती | १४ |
| अस्पृश्य व तत्सम जाती | ० |

वरील आकडे जो मनन करील त्याला सहज कळून येईल की, पहिल्या व शेवटच्या वर्गात केवढे मोठे भयंकर अंतर पडले आहे. शिक्षणाच्या शर्यतीत धावणा-या या घोड्यात एवढे अंतर पडले आहे की पहिल्यास शेवटचा दिसत नाही व शेवटच्यास पहिला दिसत नाही. त्यातल्या त्यात ध्यानात ठेवण्यासारखी गोष्ट ही की मुसलमान लोक जे काही थोडक्या दिवसांपूर्वी सर्वांच्या नव्हे अस्पृश्यांच्याही पिछाडीस होते त्यांनी आज इतके अंतर छाटले आहे की नुसते मराठ्यांना व अस्पृश्यांना मागे टाकले आहे असेच नव्हे तर ब्राह्मणांना देखील ते गाठीत आले आहेत. तीन मागासलेल्या वर्गांपैकी एकाने आणि तोही गाढ निद्रेत घोरत पडत असलेल्या वर्गाने खडबडून जागे व्हावे व घोडदौड करून सर्वास मागे टाकावे हा आश्चर्यकारक परिणाम कसा घडला हा प्रश्न विचारात घेण्यासारखा आहे.[१७] याच अग्रलेखात पुढे ते म्हणतात, त्यातील मुख्य दोष म्हणजे प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था कायदे कौन्सिलच्या हातून काढून

म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्ड यांच्या स्वाधीन करण्यात आली हा होय. ज्या राजकारणी पुरुषाने ही व्यवस्था घडवून आणली तो एक तर खुळा असला पाहिजे किंवा लबाड असला पाहिजे. खुळा, कारण कोणीही शहाणा माणूस हल्लीच्या परिस्थितीत केव्हांही असे म्हणू शकणार नाही की प्राथमिक शिक्षणाच्या कार्याला कायदे कौन्सिलांपेक्षा लोकल बोर्डे व म्युनिसिपालिट्या जास्त लायक आहेत. एक तर लोकल बोर्डे व म्युनिसिपालिट्या यांचे सभासद कायदे कौन्सिलच्या सभासदांपेक्षा केव्हाही जास्त अडाणीच असणार. शिवाय भत्ता घेऊन बाजार करावयास सापडतो एवढ्यासाठी बोर्डाच्या सभेला जे हजर राहतात त्यांना प्राथमिक शिक्षणाची कसली अडचण असणार आणि असलीच तर पैशाच्या अभावी त्या बापड्यांना काय करता येईल.[१८]

मुंबई सरकारचे शिक्षण मंत्री ना. मौलवी रफिउद्दिन अहमद यांच्या आमंत्रणावरून महाबळेश्वरला ६ मे १९२९ रोजी प्राथमिक शिक्षणाबाबत त्यांनी जे विचार मांडले ते पुढीलप्रमाणे "ज्या देशांमधील बहुजन समाज निरक्षर आहे अशा देशाचा जीवनकलहांत टिकाव लगायचा नाही हे सांगावयास नकोच. प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार सर्वांगीण राष्ट्रीय प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे. केवळ लोकांच्या खुषीवर हा प्रश्न सोपविल्यास प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होण्यास कैक शतके लागतील. म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा करावा लागतो. आघाडीस आलेल्या जगातील सर्व देशांनी सक्तीचा कायदा करूनच लोकांची निरक्षरता हद्दपार केली असे आपणास दिसून येते. जे वर्ग आधीच शिक्षणाचा लाभ घेतात त्यांच्यावर शिक्षणासाठी अर्थातच सक्ती करावी लागत नाही. त्यांना शिक्षणाचे महत्त्व कळत नाही व जे त्या बाबतीत उदासीन असतात त्यांच्याकरीताच सक्तीच्या कायद्याची आवश्कता असत. म्हणून या देशात शिक्षणामध्ये मागासलेले जे वर्ग आहेत त्यांच्या जिव्हाळयाचा हा प्रश्न आहे. प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत कायद्याने सक्ती असावी यासाठी कै.ना. गोपाळकृष्ण गोखले यांनी आणलेल्या तद्विषयक बिलापासून चळवळ सुरू झाली. त्या बिलाला देशातील सर्व जनतेने विशेषतः मागासलेल्या वर्गाच्या पुढा-यांनी जोराने पाठिंबा दिला. परंतु वेगवेगळया प्रांतात सक्तीचा कायदा होण्यास मध्यंतरी कित्येक वर्षे जावी लागली. मुंबई इलाख्यात

प्राथमिक शिक्षणाच्या सक्तीचा कायदा झाला आहे. परंतु त्याची अंमलबजावणी सहसा सर्वत्र झाली नसून ती म्युनिसिपालिटीच्या व लोकल बोर्ड् यांच्यावर अवलंबून ठेवलेली आहे. आणि सरकारने विशिष्ट प्रमाणात मदत देण्याचे ठरविले आहे. तरी म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्ड तयार होत नाहीत. त्यामुळे सक्तीच्या तत्वाची अंमलबजावणी मुंगीच्या पावलांनी होत आहे असे म्हटले तरी चालेल. १९२०-२१ मुलामुलींच्या प्राथमिक शाळेची एकंदर संख्या १३,००० पेक्षा कमी होती व त्यातील विद्यार्थी-विद्यार्थ्यांनीची संख्या ८ लक्ष १ हजार इतकी होती. १९२६-२७ साली शाळांची संख्या १३,८३५ व विद्यार्थी-विद्यार्थिनींची संख्या दहा लक्षांपेक्षा थोडी कमी इतकी असल्याचे दिसून येते. १९२०-२१ ते १९२५-२६ या पाच वर्षांच्या मुदतीत शाळांच्या संख्येत शेकडा ४.८ टक्के वाढ झाली. विद्यार्थी संख्येत शेकडा १४ टक्के वाढ झाली. १९२०-२१ साली प्राथमिक शिक्षणावर एकंदर खर्च १ कोटी २७ लक्ष रुपये इतका झाला होता. तो १९२६-२७ साली १ कोटी ९८ लक्ष इतका झाला. हे सर्व आकडे प्रगतीदर्शक दिसले तरी बहुजन समाजातील निरक्षरता अद्यापही किती विस्तृत प्रमाणावर आहे हे ध्यानात आणले म्हणजे एकंदरीत अगदी मंद गतीनेच प्रगती होत आहे असे म्हणावे लागेल.”[१९]

### २.५ १९२१ च्या चंदावरकर कमिटीच्या रिपोर्टमधील शिफारशी :

या कमिटीने पुढील दहा वर्षाच्या कार्यक्रमाचा आराखडा आखून तो आंमलात आणण्यासाठी १ कोटी १० लक्ष रुपये इतक्या रकमेपर्यंत वार्षिक खर्च होण्याचा अंदाज वर्तविला. १ कोटी २१ लक्ष रुपये सरकारला द्यावे लागतील असा हल्लीचा अंदाज आहे. सक्तीच्या शिक्षणासाठी होणा-या खर्चाचा जिल्हा लोकल बोर्डाच्या बाबतीत दोन तृतीयांश भाग व म्युनिसिपालिट्यांच्या बाबतीत एक द्वितीयांश भाग सोसण्याची जबाबदारी कायद्याने सरकारवर टाकलेली आहे. खुशीच्या शिक्षणासंबंधाच्या योजनांचा खर्चही त्याच प्रमाणात अर्थातच पैशाच्या सवडी प्रमाणे देण्याचे सरकारने आश्वासन दिले आहे. १९२२-२३ सालापासून प्राथमिक शिक्षणासंबंधिचा मुंबई सरकारचा खर्च (मुंबई म्युनिसिपालिटीच्या ग्रँट हिशोबी धरून) २८ लाखांनी वाढलेला आहे. परंतु या वाढीचा बराच भाग शिक्षकांच्या पगारवाढीने गिळंकृत केला आहे. सक्तीच्या व

खुशीच्या शिक्षणाच्या ज्या योजना सरकारपुढे मदतीची मागणी करून मांडण्यात आल्या होत्या त्यापैकी ६ लक्ष रुपये खर्चाच्याच योजना सरकार मंजूर करू शकले. कायद्यात सांगितल्या प्रमाणे सक्तीच्या शिक्षणाचा कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी १ कोटी ७२ लक्ष रुपये खर्च करावा लागेल. त्यातले १ कोटी १५ लक्ष रुपये सरकारने द्यावे लागतील. आणि या मोठ्या रकमेच्या तरतूदीसाठी सामान्य लोकांवर जादा कर बसवावे लागतील. ते कर कोणकोणत्या प्रकारचे असतील त्याबाबत चंदावरकर कमिटीने काहीमुद्दे त्यावेळी सुचविले होते, परंतु यांच्यात सरकारने कोणत्याही प्रकारची हालचाल केलेली दिसत नाही. प्रांतिक सरकार व वरिष्ठ सरकार यांच्या दरम्यान महसुलाच्या विभागणीच्या बाबतीत ओढाताण सुरू आहे. मध्यवर्ती सरकारकडून मुंबई सरकारच्या वाट्याला दरसाल अधिक रक्कम मिळाली तर तितक्याच रकमे पुरती काळजी तर दूर होईल, या बाबतीत सायमन कमिशन कडून काही सूचना करण्यात येतील असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. जादा कर बसवून शिक्षणासाठी पाहिजे असलेली जादा रक्कम उभारण्याचा प्रश्न तूर्त सोडविला जाईल अशी आशा नाही.

रक्षणासंबंधीच्या प्रश्नाची मुख्य दोन अंगे आहेतः १) शिक्षणावरील ताबा आणि २) सक्तीचे तत्त्व अमलात आणण्याची जबाबदारी. या दोन्ही बाबतीत सध्याच्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासंबंधीचा आहे.[२०]

### २.५.१ कायदा मूलतःसदोष :

"स्थानिक स्वराज्याच्या वाढीच्या विरुद्ध आम्ही नाही परंतु शिक्षण ही बाब सध्याच्या परिस्थितीत तरी स्थानिक स्वराज्याच्या मर्यादेत येणे इष्ट नाही. म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्डस् यांच्यात सध्या जी माणसे निवडून येतात त्यातील खूप माणसे शिक्षणावर ताबा ठेवण्यात अपात्र असतात. कित्येकांना शिक्षणाचे ध्येय व पद्धती यांची अंधुक कल्पनाही नसे. त्याशिवाय जातिभेद व पक्षभेद यांच्यामुळे सभासदांमध्ये चुरस असते. त्याचा परिणाम शाळांच्या व्यवस्थेवर झाल्या खेरीज राहत नाही. शिक्षक लोकही सभासदांपाशी आपल्या फायद्यासाठी किंवा बचावासाठी वशिला बांधण्याचा प्रयत्न करीत असतात. सभासदांनाही निवडणुकीच्या वेळी मते मिळविण्यासाठी शिक्षकच पाहिजे असतात. या सर्वांमुळे शाळांमध्ये ज्या प्रकारची शिस्त अपेक्षित असते ती पहावयास मिळत नाही.

मुंबईसारख्या ठिकाणी काही महानगरपालिकेच्या शाळा असतात त्या शाळेमध्ये देखील असे प्रकार दिसून येतात.[२१]

**२.५.२ शिक्षणावर प्रांतिक सरकारचा ताबा :**

खरे पाहता, शिक्षण ही बाब रस्ते बांधणे, गटारी साफ करणे इत्यादी पेक्षा वेगळी आहे. बारभाईचा कारभार येथे काय उपयोगाचा असणार. प्रांतीय स्वायत्तता आणि राष्ट्रीय दृष्टिने शिक्षणाचे धोरण ठरविण्यास आमची काहीच हरकत नाही. त्या शिक्षणामध्ये एकसूत्रीपणा असणे गरजेचे आहे. गेल्या काही वर्षात अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांचा बेशिस्त कारभार चव्हाट्यावर आला आहे. त्या संस्थांचे तात्पुरते अधिकार काढून घेणेही सरकारला भाग पडले आहे. परंतु शिक्षणाच्या कारभारात अंधाधुंदी माजल्याने नवीन पिढीचे होणारे नुकसान हे विसरुन चालणार नाही. याशिवाय शिक्षणावर प्रांतिक सरकारचेच का नियंत्रण असावे हे प्रस्थापित करणारा महत्वाचा मुद्दा हा की, शिक्षणासाठी शेकडा ८० टक्के पेक्षाअधिक खर्च प्रांतिक सरकारकडून होत असतो. स्थानिक संस्था फक्त शेकडा १५/२० टक्के खर्च करत असतात. त्यामुळे नियंत्रणाचा हक्क प्रांतिक सरकारलाच असला पाहिजे.[२२]

**२.५.३ प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याची जबाबदारीही सरकारवरच :**

सामाजिक न्यायावर आधारित सम्यक परिवर्तन केवळ शिक्षणाने येऊ शकते. शिक्षण हेच सामाजिक क्रांतीचे साधन आहे. शिक्षणाच्या अभावामुळे माणूस कोणाचाही गुलाम होण्यास वेळ लागत नाही. त्यासाठी शिक्षण घेणे गरजेचे आहे. शासनाने ही सर्वांना शिक्षण देण्याची जबाबदारी स्वतःवर घेऊन शिक्षण घेणे सर्वांना सक्तीचे केले पाहिजे. मोफत शिक्षण दिले पाहिजे. माणसाला माणूस म्हणून जगण्याची जाणीव मूळात शिक्षण घेतल्यानेच हे साध्य होते असे त्यांचे मत होते.[२३] अशा प्रकारची प्राथमिक शिक्षणाबद्दलची त्यांची भूमिका होती. निरक्षरता नष्ट करून सार्वत्रिक शिक्षण हा त्यांच्या विचारांचा गाभा होता.

**२.६ विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षणासंबंधी विचार :**

विद्यापीठीय शिक्षणाच्या ध्येय आणि कार्यासंबंधी मुंबई विद्यापीठ पुनर्रचना समितीपुढे दिलेल्या लेखी साक्षीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, “विद्यापीठात दिले जाणारे शिक्षण समाजाभिमुख असावे. ते विज्ञाननिष्ठ

आणि पक्षपात विरहित असावे. कोणत्याही विशिष्ट समाजघटकांच्या हितासापेक्ष नसावे. शिक्षणाचा उद्देश वस्तुस्थिती पूरक माहिती पुरविणे किंवा सिद्धांत शिकविणे हा नसावा. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित होईल. त्यांच्या मानसिक, बौद्धिक क्षमतांची वाढ होईल, प्रस्थापित अधिकारी विद्वानांच्या विचारांचे टीकात्मक परीक्षण करण्यास ते समर्थ होतील, प्रथम सूत्रांचा शोध घेऊन ते आवश्य माहिती मिळविण्याचा प्रयत्न करतील. त्यांच्या मनात कोणत्याही विषयाविषयी जिज्ञासा निर्माण होऊन, त्याद्वारे सखोल अध्ययनाच्या प्रवृत्ती विकसित होतील. त्याप्रमाणे सत्याचा शोध किती अवघड आहे त्यांना जाणवेल, एखाद्याने व्यक्त केलेले मत आणि वस्तुस्थिती यामधील अंतर ते जाणवू शकतील. समस्या जाणून घेऊन प्रत्येक समस्येचा नेमकेपणा त्यांच्या लक्षात येईल, प्रत्येक समस्येच्या गुण-अवगुणांचे विश्लेषण केल्यानंतर निदान बदल करण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण होईल. समस्येचे निराकरण करताना आपल्या आवडत्या सिद्धांताचा मोह त्यांनी टाळावा, एखाद्याच्या मताचा तीव्र विरोध करावयाचा असेल तरीही त्या व्यक्तीवर अन्याय होणार नाही याची काळजी घ्यावी. विचारांची, संकल्पनांची सत्यता पडताळून पाहण्याची दृष्टी त्याला हवी. एखाद्या विचाराचा किंवा संकल्पनेचा स्वीकार किंवा अस्वीकार करण्यापूर्वी त्याने विवेकनिष्ठपूर्वक विचार करावा. मौलिक विचारांचे शोधकार्य करणारा विद्यार्थी होण्यापेक्षा मौलिक संशोधन कशा प्रकारे केले जाते हे जाणून घेणे अधिक महत्वाचे आहे. उपलब्ध पुराव्याचें योग्य मूल्यमापन करावे, त्याने तर्कांचा पाठपुरावा करावा. त्यावर टीका करावी, तसेच विद्वानांच्या मतावर भाष्य करावे. या सर्वांसाठी विद्यार्थ्यांच्या क्षमता विकसित करणे हे विद्यापीठीय शिक्षणाचे मुख्य ध्येय असावे."[२४]
त्यांच्या अनेक भाषणांवरून असे लक्षात येते की, विद्यापीठीय शिक्षणामध्ये जे लोक बौद्धिकदृष्ट्या उच्च शिक्षणाचा लाभ घेण्यास समर्थ आहेत परंतु आर्थिक स्थितीमुळे शिक्षण घेऊ शकत नाहीत त्यांना उच्च शिक्षणाच्या सुविधा पुरविण्यासाठी विद्यापीठ ही महत्त्वाची यंत्रणा आहे. परंतु ते अशा मतांचा विरोध करत असत की, जे लोक विद्यापीठाचा संबंध फक्त विशिष्ट वर्गाशी आहे असे म्हणत असत. परंतु या उच्चवर्णिय आणि सुशिक्षित समजल्या जाणा-या वर्गाच्या जुलमी राजवटीत शतकानुशतके भरडल्या जाणा-या वर्गाची स्थिती आज कशामुळे

आहे याचा विचार करावा लागेल. त्यांच्यामते भारतामध्ये लोकसंख्येचा बहुतांश वर्ग असा आहे जास्त अस्पृश्य असे म्हटले जाते. प्रगती समजल्या जाणा-या जमातीने दलित वर्गाचा सामाजिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न का केला नाही? असा त्यांचा प्रश्न आहे. गुन्हेगार समजल्या जाणा-या जमातीची सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न झाला नाही. उच्चवर्णियांनी त्यांची संस्कृती, त्यांचे स्थान व दर्जा या समाजापर्यंत पोहोचविल्या नाहीत. पूर्वी हे घडले नाहीच परंतु भविष्यातही या दिशेने विचार होत नाही. वंचित वर्गाकडे होणारे जे दुर्लक्ष आहे त्यासाठी कोणाला कारणीभूत धरावे? असा प्रश्न ते करतात. ते म्हणतात, शिक्षण हा सर्वात महत्त्वाचा भौतिक लाभ आहे याची मागासवर्गीयांना जाणीव झाली आहे. त्यासाठी आम्ही तीव्र संघर्षासाठी तयार आहोत. आम्ही कोणत्याही प्रकारच्या भौतिक लाभाचा त्याग करू शकतो. कोणत्याही परिस्थितीत उच्चशिक्षणाचा अधिकार आणि संधी यांच्या महत्तम उपयोगाच्या हक्कांचा आम्ही त्याग करावयास तयार नाही.'[२५] मुंबई विद्यापीठ पुनर्रचना समितीपुढे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १५ ऑगस्ट १९२४ रोजी जी लेखी साक्ष दिली होती त्यातून विद्यापीठ सुधारणा, विद्यापीठाचे कार्य, विद्यापीठाचे ध्येय याबाबत त्यांचे विचार अत्यंत महत्वाचे आहेत. ब्रिटिशकालीन मुंबई सरकारने १९२४ ला विद्यापीठ सुधार समिती स्थापित केलेली होती. या समितीचा उद्देश होता, मुंबई विद्यापीठीय सुधारणा प्रश्नांचा अभ्यास करून त्यावर अहवाल सादर करणे. या समितीत १३ सभासद होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर या समितीचे सभासद नव्हते. परंतु समितीने जी प्रश्नावली तयार केलेली होती, ती देशातील निवडक व्यक्तींना त्यांचे विचार, जाणून घेण्यासाठी पाठविली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनाही ती पाठविण्यात आली होती. प्रश्नावलीत एकूण ५४ प्रश्न होते. त्यातील काही प्रश्नांवर त्यांनी प्रकाश टाकला होता. त्यामध्ये

१) विद्यापीठ शिक्षण ध्येय व कार्य

२) विद्यापीठ शिक्षण यंत्रणेतील उणिवा

३) विविध जाती जमातीत सांस्कृतिक आदान प्रदान व सलोख्याचे संबंध सुधारण्याबाबत विद्यापीठाची भूमिका

४) शिक्षणांनुवर्ती विद्यापीठ

५) उच्च शिक्षण व संशोधनात विद्यापिठाचे योगदान

६) विद्यापीठ आणि समाज परस्परसंबंध

७) विद्यापीठ व शासन परस्परसंबंध

८) विशिष्ट जाती-जमातीत विद्यापीठीय शिक्षणासाठी प्रचार व प्रसारासाठी उपाययोजना

विद्यापीठाच्या संबंधी त्यांनी अध्ययन करून अत्यंत महत्वाच्या प्रश्नांवर हात घालून मौलिक सूचना मांडल्या होत्या. यामध्ये विद्यार्थी, प्राध्यापक, शासन, समाज, विविध जाती-जमाती हा सर्वसामावेशक विचार त्यांनी केला होता. त्यांनी ज्या सूचना यात केल्या होत्या त्यापुढीलप्रमाणे मांडण्यात आल्या आहेत.

१) विद्यापीठातून केवळ परिक्षार्थी निर्माण न होता शिक्षणार्थी निर्माण व्हावेत.

२) पदवी व पदव्युत्तर असे विभाजन न करता दोन्ही प्रकारच्या शिक्षणाची जबाबदारी विद्यापीठाने घ्यावी.

३) महाविद्यालयांवर विद्यापीठाचे नियंत्रण असावे.

४) खाजगी महाविद्यालयांना विद्यापीठाकडून अनुदान देण्यात यावे.

५) मागासवर्गीय व दलितांना उच्च शिक्षणाच्या संधी मिळाव्यात.

६) अद्ययावत व सुसज्ज असे ग्रंथालय असावे.

त्यांनी मांडलेल्या प्रत्येक मुद्द्याचे स्पष्टीकरण केले तर त्यांची शिक्षणविषयक विचार व चळवळ याबद्दलची विचारधारा व दृष्टिकोन स्पष्ट होतो.

**विद्यापीठ शिक्षणाचे ध्येय :**

१) विद्यापीठीय शिक्षण समाजाभिमुख असावे.

२) विज्ञाननिष्ठ व सर्वसमावेशक असावे.

३) त्यात पक्षपातास थारा नसावा.

४) विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासास चालना मिळावी.

५) विद्यार्थ्यांची मिमांसक व विश्लेषणात्मक क्षमता वाढवावी.

६) विवेकनिष्ठ विचारांना चालना देण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

७) संशोधनाची दिशा प्रगल्भ असावी.

**विद्यापीठाची भूमिका व जबाबदारी :**

१) समाजातील विविध घटकात सामंजस्य निर्माण करावे.

२) इतिहास व संस्कृती यांची जाणीव निर्माण करणे.

३) शिक्षणाभिमुख विद्यापीठ अशी प्रतिमा तयार करणे.

४) माणसे घडवण्याची यंत्रणा निर्माण करणे.

५) ज्ञानविकास व ज्ञानप्रचार, ज्ञानप्रसार अशी ही शिक्षणसंस्था असावी.

६) शिक्षणाचा दर्जा व स्थिती उच्च प्रकारची असावी.

७) शैक्षणिक संस्थेच्या यशाचे मूळ शिक्षण व व्यवस्थापन यंत्रणेत असावे.

**विद्यापीठाचे कार्ये :**

१) शिक्षणकार्याचे संयोजन करणे

२) १८५७ च्या विद्यापीठ कायद्यात शिक्षणप्रदानाच्या कार्याबद्दल तरतूद नाही. मात्र १९०४ च्या विद्यापीठ कायद्यात ही तरतूद आहे. परंतु विद्यापीठ आयोगाच्या शिफारशीचाच विचार केला जातो.

३) पदवी पूर्व व पदव्युत्तर शिक्षणाचे विभाजन कृत्रिम आहे. कारण यामुळे शिक्षण व संशोधन यांचे एकमेकापासून विभाजन होते. जेव्हा असे होते तेव्हा संशोधन कार्याची हानी होते.

४) पदवी पूर्व विद्यार्थ्यांनासुद्धा प्राध्यापकांनी शिकवले पाहिजे. कारण पदवीपूर्व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनाच्या आरंभापासूनच प्राध्यापकांनी विद्यापीठ शिक्षणक्षेत्रात प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांशी संपर्क ठेवला तर विद्यार्थ्यांची मानसिक व बौद्धिक तयारी होईल.

५) यामुळे अशा सर्वोत्तम विद्यार्थ्यांची निवड करून संशोधन कार्ये उत्कृष्टपणे करून घेता येईल.

६) प्राध्यापकांनी आपले व्यक्तीमत्व असे तयार करावे की त्यातूनच विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, प्रेरणा व विश्वास निर्माण होईल.

७) प्राध्यापकांमध्ये स्वतंत्र प्रज्ञा व मौलिक विचार क्षमता असावी.

८) सतत संपर्कात राहून प्रयोगशाळेच्या व चर्चासत्राच्या माध्यमातून जे प्रशिक्षण व प्रबोधन होते ते पुस्तके वाचून होत नाही याची जाणीव ठेवावी.

९) प्रबोधन आणि प्रशिक्षण ही प्रक्रिया फक्त विद्यापीठातच शक्य आहे.

१०) या माध्यमातूनच विचार विकासाची प्रक्रिया विद्यार्थ्यांना परिचित होते.

११) मूलगामी विचारांची क्षमता वाढीस लागते.

१२) विद्यार्थ्यांच्या शिक्षणविषयक समस्या प्राध्यापक व शिक्षकांनाही मार्गदर्शक ठरतात तसेच विद्यार्थ्यांचा विश्वास व प्रतिसाद त्यांच्या प्रेरणेचा स्त्रोत ठरतो.
१३) विद्यापीठात ज्ञानाचे आदान-प्रदान मोठ्या प्रमाणात होणे आवश्यक आहे.
१४) प्रगत संशोधन शिक्षणापासून वेगळे करू नये.

कुणाच्याही मताचा विवेकाने स्वीकार करण्यास ते समर्थ होतील. विश्लेषण, मिमांसा व परिक्षण करण्यासाठी क्षमता त्यांच्यामध्ये निर्माण होईल. विचार व संकल्पना यांचा विवेकपूर्ण विचार करून त्याकडे पाहण्याची दृष्टी त्यांना आली पाहिजे. थोडक्यात विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व मानसिक विकासाकडे लक्ष दिले तर मूलगामी विचार करण्याची त्यांची क्षमता वाढते असा त्यांचा विचार होता. विद्यापीठाला शिक्षण मंदिर म्हणून समजावे असे असेल तर विद्यापीठ संविधानातही अनेक बदल केले.पाहिजेत असे त्यांचे मत होते. त्यांच्या मते, विद्यापीठा अंतर्गत समाजाच्या विविध आणि बदलत्या गरजांचा सातत्याने मागोवा घेणारी स्वतंत्र यंत्रणा त्यांना अपेक्षित होती. विद्यापीठ, समाज आणि विद्वान यांच्यामध्ये सामंजस्य निर्माण होऊन त्याचा समाजाला उपयोग व्हावा यासाठी विद्यापीठ सल्लागार मंडळ असावे असेही त्यांनी आग्रहाने मांडले. केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे तर शिक्षकांनाही मार्गदर्शन करण्यासाठी विद्यापीठात सक्षम यंत्रणा असावी त्यासाठी विद्वान व्यक्तींचे नियंत्रण विद्यापीठावर असणे त्यांना आवश्यक वाटले. विद्यापीठाच्या संविधाना अंर्तगत विविध विद्याशाखांची स्थापना व्हावी व महाविद्यालय यांच्या मध्ये समन्वय प्रस्थापित करून विद्यापीठाने आंतर महाविद्यालयीन शिक्षणपद्धती स्विकारावी, अभ्यासमंडळे विविध समित्या यांची स्थापना व्हावी याबरोबरच पदवी, पदविका व पारितोषिके प्रदान करण्यासंबंधी नियमावली तयार करावी. अध्ययन, अध्यापन व परीक्षा पद्धती यांचेही नियम ठरवावेत. या सर्व गोष्टी त्यांनी अत्यंत दूरदृष्टी पूर्वक विचार करून मांडल्या होत्या. यातील सर्वच बाबी आज संपूर्ण देशातील विद्यापीठामध्ये प्रचलित करण्यात आलेल्या आहेत. हा त्यांच्या विचारांचा प्रभाव आहे. शिक्षकांच्या पात्रतेविषयी सुद्धा ते अत्यंत दूरगामी विचार करतात. शिक्षकांना चाकोरीबद्ध अभ्यासक्रमाच्या बंधनातून मुक्त केले पाहिजे; कारण अशा पद्धतीचे शिक्षण विद्यार्थ्यांच्या संपूर्ण विकासासाठी आवश्यक असते. मात्र शिक्षक हे यासाठी

पात्र आहेत किंवा नाहीत याची मात्र खात्री करून घेण्याविषयी ते आग्रही आहेत.

विद्यापीठाचे प्रशासन, विद्यापीठाची शिक्षणव्यवस्था या दोन यंत्रणा तर ते आवश्यक मानतातच. मात्र विद्यापीठांच्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी साधनांची जुळवाजुळव व विनियोग यासाठी विद्यापीठाची स्वतंत्र वेगळी यंत्रणा त्यांना आवश्यक वाटते. याला ते विद्यापिठाची केंद्रीय कार्यकारिणी म्हणतात. मुंबई विद्यापीठाला पुनर्रचनेचा आराखडा जो त्यांनी सादर केला त्याचा आधारच विभाजन हे तत्व आहे.

१. विद्यापीठ विधानविषयक अधिकारांचे केंद्र सिनेट राहिल.

२. कार्यकारीणी म्हणून विद्यापीठ व्यवहाराचे केंद्र सिंडिकेट राहिल.

३. अध्ययन व अध्यापन विषयक व्यवहाराचा केंद्रबिंदू विद्याशाखा राहील.

४. विद्वत सभा

या स्वतंत्र यंत्रणा आपले अधिकार वापरतील परंतु या तीनही यंत्रणामध्ये समन्वय असणे आवश्यक आहे अन्यथा त्याचे परिणाम अत्यंत घातक होऊ शकतात. कारण विद्याशाखा ही पायाभूत यंत्रणा असून याकडे अभ्यासक्रम निर्धारित करणे, अध्ययन अध्यापन ठरवणे, परीक्षा व्यवस्था करणे ही कामे असतील. पण विद्याशाखा आणि सिंडिकेट यांच्यामध्ये समन्वय नसेल तर सिंडिकेट आपल्या अधिकाराचा दुरूपयोग करून विद्याशाखांच्या स्वातंत्र्यावर आघात करू शकेल असे उदाहरण ते देतात. विद्वतसभा ही अंशतः कार्यकारी मंडळ म्हणून कार्य करील असा त्यांचा विचार होता. याविद्वत सभेचे अनेक अधिकार ते मान्य करतात. त्यामध्ये महाविद्यालयांना भेटी देणे, शिष्यवृत्ती, अर्थसाह्य याबाबत निर्णय घेणे, काहीवेळा विद्यापीठातील प्रवेश रद्द करणे. विविध नियमावली तयार करणे. तसेच सिंडिकेटवर नियंत्रण ठेवणे, विद्याशाखांना मार्गदर्शन करणे अशी विविध कामे ते सांगतात.

विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून विद्यापीठाचा दर्जा उंचावण्यासाठी विद्यार्थ्यांचे योग्य मूल्यमापन होण्यासाठी त्यांनी काही सूचना मुंबई विद्यापीठास केल्या. त्यावरून त्यांचे उच्च शिक्षण व विद्यापीठीय शिक्षणाबद्दलचे विचार स्पष्ट होतात.

१. विद्यार्थ्यांच्या कार्याचे मूल्यमापन व त्यांची परीक्षा याशिवाय त्यांनी केलेले शोधकार्य विचारात घ्यावे लागेल.

२. स्तानकोत्तर पदवीसाठी प्रबंध लेखण व पदवी परीक्षा घ्यावी.

३. अभियांत्रिकी मुंबई विद्यापीठात अभियांत्रिकी, कृषी व तंत्रज्ञान या तांत्रिक विद्याशाखा असाव्यात.

४. ललित कला व संगीत याही विद्याशाखा असाव्यात.

५. समाजविज्ञान विद्याशाखेसाठी स्तानकोत्तर पदवी अभ्यासक्रम ४ वर्षांचा असावा.

६. हा कालावधी २ वर्षांचे एक सत्र याप्रमाणे दोन सत्रामध्ये असावा.

७. प्रथम वर्षाच्या शेवटी विद्यार्थ्यास कला पारंगत ही पदवी द्यावी.

८. या पदवीसाठी विद्यार्थ्यास त्याच्या आवडीचा मुख्य विषय म्हणून एक विषय निवडण्याची मुभा द्यावी.

९. विद्यार्थ्याने ७५ टंकमुद्रीत पानांचा निबंध लिहिणे बंधनकारक करावे.

१०. दुस-या सत्रामध्ये लेखी परीक्षा असावी.

११. याशिवाय एक प्रबंध ही बंधनकारक करावा.

१२. हा प्रबंध प्रकाशन योग्यच असावा.

१३. पारंगत या पदवीसाठी जो प्रबंध त्याने निवडला त्याच विषयावर संशोधन कार्य केले पाहिजे.

१४. विद्यार्थ्याची मौखिक परीक्षाही आवश्यक करावी.

१५. विद्यापीठाचे स्वतःचे मुद्रणालय व प्रकाशन विभाग असावे.

१६. शिक्षणप्रचारासाठी वाहून घेताना विद्यापीठाने स्थानिक भाषेचा अध्ययन अध्यापनाचे माध्यम म्हणून स्विकार करावा.

१७. विद्यापीठाच्या शिक्षणविषयक कार्यावर शासनाचे कोणतेही नियंत्रण असू नये.

१८. संपर्क भाषा कोणती असावी याचा निर्णय जनतेवर सोपवावा.

१९. मागासवर्गीय समाजात, विशेषतः दलित वर्गात विद्यापीठ शिक्षण प्रचारासाठी विद्यापीठाने विशेष प्रयत्न करावे.

मुंबई विद्यापीठाच्या संदर्भात या सर्व सूचना मांडत असताना विद्यापीठाला मागासवर्गीयांचे प्रतिनिधित्व असावे यासाठी ही ते आग्रही होते. ५ ऑक्टोबर १९२७ रोजी मुंबई विद्यापीठ कायदा दुरुस्ती विधेयकावर मुंबई विधीमंडळामध्ये चर्चा करत असताना त्यांनी भाषण दिले.[२६] त्यांचे असे म्हणणे होते की, विद्यापीठाच्या अनेक महत्वपूर्ण आणि मुलभूत कार्यापैकी एक म्हणजे गरजू आणि गरीबांच्या दारापर्यंत उच्च शिक्षणाच्या सोई पोहोचविणे हे होय. कोणतेही विद्यापीठ फक्त परीक्षा घेऊन आणि पदव्या देऊन आपले अस्तित्व सिद्ध करू शकत नाही. भारतामध्ये मागासवर्गीय जमातींना उच्च शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणे हे कोणत्याही आधुनिक विद्यापीठांचे पहिले कर्तव्य आहे. जे व्यक्ती समूह बौद्धिकदृष्ट्या उच्च शिक्षणाचा महत्तम लाभ घेण्यास समर्थ आहे पण आर्थिक स्थिती योग्य नाही म्हणून किंवा काही अडचणी आहेत म्हणून असे वर्ग शिक्षणाचा लाभ घेऊ शकत नाही. त्यांना उच्च शिक्षणाच्या सुविधा पुरविण्यासाठी विद्यापीठ ही प्राथमिक यंत्रणा आहे. भारताच्या लोकसंख्येचा मोठा भाग गुन्हेगार जमाती म्हणून ओळखला जातो याची ते खंत व्यक्त करतात आणि मागासवर्गीयांच्या उच्च शिक्षणाचा आग्रह धरतात. त्याशिवाय देशाच्या प्रगतीची आशा करता येत नाही असे त्यांचे स्पष्ट म्हणणे होते.

बहिष्कृतांची पहिली परिषद धारवाड येथे २८ डिसेंबर १९२९ रोजी झाली. यासभेचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते.[२७] आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये मानपत्र स्विकारण्याबद्दल बोलताना त्यांनी शिक्षणाबद्दलची मते व्यक्त केली. ते म्हणतात, केवळ शिक्षण घेतले म्हणजे ती योग्यता येत नसते. मनुष्य विद्वान झाला की तो समाजाला उपयुक्त असतोच असे नाही. तो दुगुर्ण ही असू शकतो. आजच्या परिस्थितीत विद्वान व सुशिक्षित म्हणवणारे लोक अस्पृश्यांशी नीट वागत नाहीत. मग त्यांना सुशिक्षित कसे म्हणावे. अस्पृश्यांच्या शिक्षणप्रसाराची त्यांची कळकळ वेळोवेळी दिसून येते. १० सप्टेंबर १९३२ रोजी मुंबईतील परळ येथे त्यांचे भाषण झाले.[२८] ते म्हणतात अस्पृश्य समाजासाठी अत्यंत निकडीचे काम कोणते असेल तर ते शिक्षणप्रसार होय. समाजातील प्रत्येक व्यक्तीचे व संस्थेचे कर्तव्य आहे की, शैक्षणिक बाबतीत तरुण पिढीचे पाऊल योग्य मार्गाने कसे जाईल? आम्ही देखील हेच कार्य करत असून सध्या आमची तीन बोर्डिंगे

आहेत. ठाणे, धारवाड व अहमदाबाद येथील तीनही बोर्डिंगमध्ये १०० मुलांची सोय असल्याचे त्यांनी सांगितले. आपला लौकिक वाढविणे व आपल्या समाजाची योग्यता वाढविणे हे केवळ शिक्षणावर अवलंबून आहे. विद्यार्थ्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून ज्ञान संपादन केले पाहिजे. शिक्षण प्राप्ती हेच ध्येय ठेवावे असे कळकळीचे आवाहन त्यांनी केले होते.

## संदर्भ ग्रंथ :


१. गाडगीळ बाळ, संपा., डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या शब्दांत आणि अनेकांच्याः मधुराज् पब्लिकेशन्स्, पुणे २०१४, पृष्ठ क्र.४८

२. प्रा.गाडगीळ बाळ, संपा., डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या शब्दात आणि अनेकांच्याः मधुराज पब्लिकेशन, पुणे, २०१४, पृष्ठ क्र.५१

३. सोनवणे सुहास, संपा, शब्दफुलांची संजीवनीः अनुभव अक्षरधन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २०१३, पृष्ठ. क्र.५३

४. कीर धनंजय, डॉ.आंबेडकर बाबासाहेबः पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती २००६, पृष्ठ क्र.३३

५. खैरमोडे चां.भ : डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, पृष्ठ क्र.६६

६. त्रतैव, पृष्ठ क्र.६७

७. कीर धनंजय, डॉ. आंबेडकर बाबासाहेब : पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई, पृष्ठ.क्र.३६

८. प्रा. गाडगीळ बाळ, संपा., डॉ. आंबेडकर बाबासाहेब त्यांच्या शब्दात आणि अनेकांच्याः मधुराज पब्लिकेशन, पुणे, २०१४ पृष्ठ क्र.४३

९. त्रतैव, पृष्ठ क्र.४७

१०.गायकवाड सुनीता, डॉ.बाबासाहेब आंबेडकर (संक्षिप्त चरित्र): सुविद्या प्रकाशन, सोलापूर २००८, पृष्ठ क्र. १५

११.मागाडे बाळासाहेब संपा., सम्रग बाबासाहेब (डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध कार्यपैलूंचा संशोधनात्मक वेध घेणारा महाग्रंथ), थिंक टँक पब्लिकेशन, सोलापूर २०१६- पृष्ठ क्र.१९९

१२.जनता, दि.१० नोव्हेंबर १९३२

१३. लुलेकर प्रल्हाद, दलितेत्तरांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरः अनंत

पैलूंचा सामाजिक योद्धा, सायन पब्लिकेशन, पुणे २०११, पृष्ठ क्र.९१
१४. संपा - मून वसंत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखन आणि भाषणेः खंड - १८ भाग-३, पृष्ठ.क्र. ३८९
१५. लुलेकर प्रल्हाद, दलितेत्तरांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरः अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा, सायन पब्लिकेशन, पुणे २०११, पृष्ठ क्र.१०२
१६. लुलेकर प्रल्हाद, दलितेत्तरांसाठी डॉ.बाबासाहबे आंबेडकरः अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा, सायन पब्लिकेशन, पुणे २०११, पृष्ठ क्र. १०३
१७. अग्रलेख -, आप घरी बाटा आणि बाप घरींही बाटा,बहिष्कृत भारत, दि. १५ जुलै १९२७
१८. तत्रैव
१९. बहिष्कृत भारत, ३१ मे १९२९
२०. तत्रैव
२१. तत्रैव
२२. तत्रैव
२३. लुलेकर प्रल्हाद, दलितेतरांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरः अनंत पैलंचा सामाजिक योद्धा, सायन पब्लिकेशन, पुणे २०११, पृष्ठ क्र. ८८
२४. दहाट धनराज, संपा., डॉ. बाबासाहेब आंबेडकर : भाषणे आणि विचार : खंड-२ शिक्षण, पृष्ठ.क्र. १४२-१४३
२५. Dr. Babasaheb Ambedkar Writing & Speeches Vol. 2 “On Bombay University Act Amendment Bill: 4' P.61
२६. Dr. Babasaheb Ambedkar Writing & Speeches Vol. 2 “On the Bombay University Act Amendment Bill:4' P.61
२७. ज्ञानप्रकाश, १ जानेवारी १९३०
२८. जनता, १७ सप्टेंबर १९३२

## प्रकरण चौथे

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक चळवळी

८ जुलै १९४५ ला मुंबई येथे त्यांनी पिपल्स एज्युकेशन सोसाटीची स्थापना केली. ही संस्था स्थापन करण्यामागे दोन उद्देश होते. पहिला सत्याचा शोध आणि दोन शिक्षण संस्थांची स्थापना करून त्यांनी पुढील शैक्षणिक संस्था स्थापन केल्या.

१. पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई ८ जुलै १९४५

२. सिद्धार्थ कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, मुंबई १९ जून १९४६

३. मिलिंद महाविद्यालय, औरंगाबाद १९ जून १९५०

४. सिद्धार्थ कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक्स, मुंबई १९५३

५. सिद्धार्थ कॉलेज ऑफ लॉ, मुंबई १९५६

**२.७.१ पिपल्स एज्युकेशन सोसायटीचा इतिहास :**

मुंबई मध्ये उच्च शिक्षण घेण्याची इच्छा बाळगणा-या अस्पृश्य विद्यार्थ्यांची कुचबंना ते पहात होते. त्यासाठी आपल्यालाच काही तरी केले पाहिजे. या धारणेने 'पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना' त्यांनी केली. शैक्षणिक प्रगतीसाठी तळमळ असणा-या लोकांची प्रशासकीय मंडळावर त्यांनी नियुक्ती केली. १० सदस्य व ते स्वतः चेअरमन अशी रचना करण्यात आली. सोसायटीचे पहिले प्रशासकीय मंडळ पुढीलप्रमाणे होते.

१. डॉ.बी.आर. आंबेडकर (M.A. ,Ph.D., D.S.C., L.L.B., D.Lit, Barrister at Law) चेअरमन

२. राव बहादूर एन.शिवराज - सदस्य

३. श्री.डी.जी.जाधव - सदस्य

४. श्री.आर.आर.मोडे - सदस्य

५. श्री.जे.एच.सुभैय्या - सदस्य

६. श्री.एच.के.पटेल - सदस्य

७. श्री.जी.टी.मेश्राम - सदस्य

८. राव बहादूर एस.के.बोले - सदस्य
९. श्री.एस.जी.जोशी - सदस्य
१०. श्री.एन.बी.समर्थ - सदस्य

या मंडळावरील हे सर्व पूर्वीच्या बॉम्बे प्रांतातील मराठी व गुजराती भाषिक निजाम राज्यातील तेलगू भाषिक आणि पूर्वीच्या मद्रास प्रांतातील तमिळ भाषिक सदस्य होते.

**२.७.२ संस्थेची उद्दिष्टे :**

पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना पुढील उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी झालेली होती.[१]

१. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, तांत्रिक, शारीरिक आणि तत्सम सर्वप्रकारचे उच्च शिक्षण देणे.

२. बॉम्बे व भारताच्या इतर भागात विविध शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, हॉस्टेल्स ग्रंथालये, खेळण्याचे मैदान योग्य ठिकाणी सुरू करणे, त्यांचे संवर्धन करणे आणि त्यांना मदत करणे.

३. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करणे, अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करणे व तिची वाढ करणे यासाठी त्यांना विशेष सुविधा, शिष्यवृत्ती आणि भारतात व भारताबाहेर मोफत उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणे.

४. विज्ञान, ग्रंथलेखन, सूक्ष्म कला इत्यादी कलागुणांना विकसित करणे व समाजउपयोगी ज्ञानाची भर घालणे.

५. सोसायटीसाठी जमीन विकत घेणे आणि आवश्यकते नुसार सोसायटीच्या पैशांचा व्यवहार करणे.

६. सोसायटीच्या निकडीवर बिल्डिंगचे बांधकाम, संवर्धन, डागडुजी, जागा बदलणे.

७. सोसायटीच्या गरजेनुसार सोसायटीची मालमत्ता विकणे, त्यात वाढ करणे, भाड्याने देणे, विक्रीला काढणे, भंगारात काढणे, या व तत्सम पत्रव्यवहारा संबंधी काही किंवा सर्व मालमत्तेची खरेदी-विक्री बाबतीत निर्णय घेणे.

८. सोसायटीच्या पुढील ध्येय-धोरणांसाठी इतर संस्थांसोबत सोसायटी मधील सभासदांच्या दरम्यान सहकार्य अनुबंध किंवा मिळून काम करणे.
९. सोसायटीची ध्येय-धोरणे व उद्दिष्टांसाठी सुरक्षित किंवा असुरक्षित ठेवीं मधून पैसे वाढविणे.

**२.७.३ सिद्धार्थ कॉलेजची स्थापना : १९ जून १९४५**

पीपल्स एज्युकेशन सोसायटीने पहिले कॉलेज स्थापन केले ते म्हणजे मुंबई येथील सिद्धार्थ कॉलेज होय. ज्यांना शिक्षण घेण्याची इच्छा आहे परंतु कामामुळे शिकू शकत नाहीत अशा विद्यार्थ्यांसाठी 'कमवा आणि शिका' या योजने अंतर्गत या सकाळच्या कॉलेजची स्थापना करण्यात आली. वंचित समाजातील बहुसंख्य विद्यार्थ्यांना मुंबईमध्ये इतर कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला नाही म्हणून त्यांनी हा निर्णय घेतला होता. या महाविद्यालयासाठी मिलिटरी बराकची जागा केंद्र शासनाकडून सोसायटीने भाड्याने घेतली होती. व्हॉईसरॉयच्या कार्यकारी मंडळावर सदस्य म्हणून केंद्रशासनाकडून तीन लाख रुपयाचे अनुदान त्यांनी घेतले. याबरोबरच तीन लाख रुपये कर्ज म्हणून कॉलेजच्या उभारणीसाठी मिळवले. मरिन लाईनवरील जुन्या मिलिटरी बराकमधील इमारत ५ वर्षासाठी लिजवर घेतली. लिजचा काळ संपत आला तेव्हा त्यांनी बॉम्बे हायकोर्ट येथे दोन इमारती विकत घेतल्या. त्यांची नावे 'आनंदभुवन' व 'बुद्धभुवन' अशी दिली आणि कॉलेज रीतसर सुरू झाले. २७ नोव्हेंबर १९४५ रोजी पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या वतीने त्यांनी एक निवेदन केले होते. त्यामध्ये महाविद्यालय स्थापण्या मागील त्यांचा हेतू स्पष्ट होतो. ते म्हणतात.' हे महाविद्यालय बंदिस्त संस्था नाही. या महाविद्यालयात देशातील विविध प्रांतातील व राज्यांतील सर्व जाती-धर्मांच्या विद्यार्थ्यांना ॲडमिशनच्या सुविधा, मोफत शिक्षण, शिष्यवृत्ती देणे आणि राहण्यासाठी हॉस्टेलची सुविधा पुरविणे अशा खास सुविधा पुरविणे महाविद्यालयाचे खास वैशिष्ट्ये असेल. सोसायटीची गव्हर्निंग बॉडी या महाविद्यालयाला उच्च शिक्षणासाठी आदर्श शिक्षण संस्थेचा नमुना म्हणून सादर करू इच्छिते.'[२]

या सिद्धार्थ कॉलेजच्या उद्‌घाटन प्रसंगी सोसायटीच्या पहिल्या प्रशासकीय मंडळाचे सदस्य श्री डी.जी.जाधव म्हणाले होते, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे

स्वप्न होते की, आधुनिक संसाधनांनी पूर्ण आणि गुणवान कर्मचा-यांनी युक्त अशी एक आदर्श शैक्षणिक संस्था आपली निर्माण व्हावी. त्यांचे ते स्वप्न आता पूर्णत्वास आले आहे. या कॉलेजला पूर्व आणि पश्चिमेच्या शैक्षणिक संस्थांच्या बरोबरीने आणणे त्यांचे निर्धारित लक्ष्य आहे. त्यामुळे या कॉलेजकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या उद्देशपूर्तीचे साधन म्हणून आज गौरवाने पाहात आहेत. ते सिद्धार्थ कॉलेजला 'माझे लाडके बाळ' म्हणत असत.

या कॉलेजचे नाव त्यांनी सिद्धार्थ असे ठेवले याचे कारण म्हणजे तथागत भगवान बुद्धास स्मरण करणे होय. भगवान बुद्धांना 'सिद्धार्थ' असे म्हटले जाते. पिचलेल्या लोकांच्या उत्थानासाठी भगवान बुद्धांनी आपले आयुष्य वेचले. अहिंसेचा मार्ग स्विकारला. वर्णव्यवस्थेला विरोध केला. सर्वसामान्यांच्या भाषेतून आपल्या तत्त्वांचा प्रसार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर भगवान बुद्धाच्या विचारांचा जो प्रभाव होता त्यातला सर्वात महत्त्वाचा प्रभाव म्हणजे कारणांचा शोध घेणे. डॉ.ए.बी. गजेंद्रगडकर हे संस्कृत विद्वान सिद्धार्थ कॉलेजचे पहिले प्राचार्य होते. यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षणातील शुद्ध दृष्टीकोन दिसून येतो. त्यांनी भाषा, जात, धर्म यामध्ये भेदभाव न करता गुणवत्ता हा निकष ठेवला होता. महाविद्यालय सुरू झाल्यापासूनच विद्यार्थ्यांची संख्या भरपूर होती. आजही सिद्धार्थ कॉलेज उत्तमरीत्या चालू आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सिद्धार्थ महाविद्यालयाला 'माझे लाडके बाळ' असे म्हणत असत.

### २.७.४ मिलिंद महाविद्यालय : औरंगाबाद १९ जुन १९५०

१७ सप्टेंबर १९४८ ला हैद्राबाद संस्थान निजामाच्या वर्चस्वातून मुक्त झाले आणि स्वतंत्र भारतामध्ये विलिन झाले. हैद्राबाद विलिन झाल्यानंतर अखंड भारताच्या निर्मितीचे स्वप्न पूर्ण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेही अखंड भारताच्या निर्मितीचे स्वप्न होते. निजाम राज्यामध्ये शैक्षणिक प्रगती ही विशिष्ट वर्गापुरतीच मर्यादीत होती. मराठवाडा हा भाग तत्कालीन हैद्राबाद या राज्यातच मोडत होता. निजाम राज्यातही मराठवाडा हा शैक्षणिकदृष्ट्या अर्तगत मागासलेला

होता. उच्च शिक्षणासाठी मराठवाड्यातून हैद्राबादला जावे लागत असे. ही अडचण दूर करण्यासाठी त्यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या अधिपत्याखाली औरंगाबाद येथे एक कॉलेज स्थापन करण्याचे ठरवले. त्यानुसार १९ जून १९५० रोजी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना झाली. व १ सप्टेंबर १९५१ रोजी त्यावेळचे नव स्वतंत्र भारताचे राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी या कॉलेजचा शिलान्यास केला. औरंगाबाद हे ठिकाण का निवडले याची कारणमिमांसा करताना ते स्पष्ट करतात, शैक्षणिक सुविधा या प्रांतीय राजधानीच्या ठिकाणी एकवटल्यामुळे खेड्यापाड्यातील जनतेला उच्च शिक्षण मिळत नाही. अजिंठा व वेरूळची लेणी तसेच संतांची भूमी यामुळे भूतकालीन प्रेरणा व वर्तमानातील गरजा लक्षात घेऊन औरंगाबाद येथे या कॉलेजची स्थापना करण्यात आली. 'मिलिंद' या शब्दाबद्दल स्पष्टीकरण देताना त्यांनी १२ डिसेंबर १९५५ रोजी मिलिंद महाविद्यालयातील बोधी मंडळाच्या वतीने भरविण्यात आलेल्या सभेत दिलेले आहे.[३] त्यांनी सांगितले की, मिलिंद हा एक ग्रीक राजा होता. त्याला आपल्या विद्वतेबद्दल घमेंड होती की, ग्रीकासारखे विद्वान लोक जगाच्या पाठीवर कोठेही सापडावयाचे नाहीत. त्याने जगाला आव्हानही दिले होते. त्याला एकदा वाटले की, आपण एखाद्या बौद्ध भिक्खुबरोबर वाद-विवाद करावा. पण त्याच्याबरोबर वाद-विवाद करण्यास कोणीही तयार झाला नाही. मिलिंद हा एक क्षुल्लकसा मनुष्य होता. तो काही तत्त्वज्ञानी नव्हता किंवा जाडा विद्वानही नव्हता. त्याला राज्यकारभार कसा चालवावा हेच माहीत होते. पण अशा मिलिंद बरोबर वादविवाद करण्यास कोणीही तयार झाला नाही. महाप्रयासाने 'नागसेन' भिक्खुला तयार केलं गेलं. मिलिंदाचं चॅलेंज आपण स्वीकारलं पाहिजे, असा त्याने निश्चय केला मग त्यात यश येवो अथवा अपयश येवो.

'नागसेन' हा ब्राह्मण होता. वयाच्या सातव्या वर्षी त्यानं आपल्या आईबापाचं घर सोडलं होतं. अशा या नागसेनाने भिक्खु लोकांचा आग्रह मान्य केला. नंतर मिलिंद व नागसेन यांचा वादविवाद होऊन मिलिंदाचा पराजय झाला. त्या वादविवादाचं एक पुस्तक प्रसिद्ध झालं आहे. त्या पुस्तकाला पाली भाषेत 'मिलिंदपन्हा' असं नाव आहे. या पुस्तकाचं मराठीत भाषांतर 'मिलिंद प्रश्न'

असं आहे. या पुस्तकाचं शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी अवश्य वाचन करावं अशी माझी इच्छा आहे. त्यात शिक्षकांच्या अंगी कोणते गुण असावेत हे दिलेले आहेत. म्हणून मी व माझ्या सोसायटीने ह्या कॉलेजला मिलिंद महाविद्यालय हे नाव दिले व परिसराला 'नागसेनवन' असं नाव दिलं. मिलिंद हरला व बौद्ध झाला, म्हणून मी हे नाव दिलेलं नाही. मी जे ह्या कॉलेजला नाव दिलेलं आहे ते आदर्शभुत असचं आहे. असं माझं मत आहे. शिक्षणसंस्थेला एखाद्या श्रीमंत व्यापा-याने केवळ पैशाची देणगी दिली. म्हणून त्याचे नाव देणे हे अत्यंत अनुचित आहे. याच भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना संदेश दिला की, विद्येबरोबरच भगवानबुद्धांनी सांगितलेली प्रज्ञा, शील, करुणा आणि आत्मीयता या चार पारमिता असल्या पाहिजेत. म्हणजेच शहानपण, सदाचरण, मानवजातीसंबंधी प्रेमभाव आणि प्राणीमात्रा विषयी आत्मियता. म्हणूनच विद्या, प्रज्ञा, शील, करुणा व मैत्री या पंचतत्वानुसार मिलिंद महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्याने आपले चारित्र बनवावे आणि या मार्गाने एकट्यानेच जावे लागले तर मनोधर्य व निष्ठा राखून ठेवले पाहिजे.

दलितांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी स्थापन झालेल्या या महाविद्यालयात शिक्षण घेण्यासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी येऊ लागले. या विद्यार्थ्यांना कोणत्याही अडचणी येऊ नयेत यासाठी संस्थाही काळजी घेऊ लागली. एखाद्या विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्ती मिळण्यामध्ये अडचण आली तर त्याचे शिक्षण बंद पडू नये याची काळजी स्वतः डॉ.बाबासाहेब आंबेडकर घेत होते. परिणामी दलित विद्यार्थी उच्च शिक्षण घेण्यासाठी मिलिंद महाविद्यालयामध्ये प्रवेश घेत असत. याची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे.

मिलिंद महाविद्यालयात २५ वर्षामध्ये दलित विद्यार्थ्यांनी शिक्षण घेण्याची आकडेवारी वाढत गेली. औरंगाबाद येथे १९६० पर्यंत शासकीय महाविद्यालय व मिलिंद महाविद्यालय अशी दोनच महाविद्यालये होती. मिलिंद महाविद्यालयात दलितेत्तर व दलित विद्यार्थ्यांचे प्रमाण सुरूवातीला कमी होते. दलितेत्तर विद्यार्थीसुद्धा तेथे शिक्षण घेत असत. याचाच अर्थ त्यांनी केवळ दलित विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालय सुरू केले असले तरी शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या भागाचा विकास व्हावा हा ही त्यांचा हेतू स्पष्ट होतो.

**विद्यार्थी आकडेवारी**

| इ.स. | एकूण विद्यार्थी संख्या | दलित विद्यार्थ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९५०-५१ | १२५ | १२ | ९.६ % |
| १९५६-५७ | ७१६ | २२५ | ३१.४ % |
| १९७४-७५ | १३२०८ | ५६५३ | ४२.८ % |

शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मराठवाड्याच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये मिलिंद महाविद्यालयाचा सिंहाचा वाटा होता. १९५८ मध्ये मराठवाड्यात महाविद्यालयात विद्यार्थी संख्या ३२०० होती. ती १९७४-७५ मध्ये ७८,५२९ झाली. त्याच काळात अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जातींची विद्यार्थी संख्या २२५ वरून १८३२५ पर्यंत झाली. शैक्षणिक क्षेत्रात मराठवाड्याने केलेल्या या अभूतपूर्व प्रगतीचा ऑगस्ट १९५८ मध्ये मराठवाडा विद्यापीठाचे उद्‌घाटन करताना पंडित नेहरूंनी देखील गौरवपूर्वक शब्दात उल्लेख केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी इ.स. १९५० मध्ये मिलिंद कॉलेज ऑफ सायन्सची स्थापना करून महाविद्यालयीन शिक्षणाची मूहर्तमेढ रोवली.[४] १९५० मध्ये मिलिंद कॉलेज ऑफ सायन्सच्या स्थापनेनंतर १९६० मध्ये डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ कामर्स, १९६३ मध्ये मिलिंद कॉलेज ऑफ आर्ट्स, १९६८ मध्ये डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ लॉ तसेच शारीरिक शिक्षण महाविद्यालय, वर्किंग वुमेन हॉस्टेल त्याचप्रमाणे १९५५ मध्ये इंग्रजी माध्यमाचे मराठवाड्यातील पहिले माध्यमिक विद्यालय, मातोश्री रमाबाई आंबेडकर हायस्कूल, बुद्धिस्ट सेंटर, महाविद्यालयाचे स्वतंत्र वसतीगृह इत्यादी सुरू करून संस्थेचा खूप मोठा विस्तार केला. आणि मराठवाड्यातील दलित विद्यार्थ्यासाठी एक मोठे शैक्षणिक केंद्र निर्माण केले. या शैक्षणिक संस्थामध्ये फक्त महार किंवा नवबौद्धच विद्यार्थी शिक्षण घेत असत, असे नव्हे तर १९७४-७५ च्या आकडेवारी नुसार औरंगाबाद जिल्ह्यातील एकूण ५७६ चांभार विद्यार्थ्यांपैकी ३८८ म्हणजे ६७.५ टक्के विद्यार्थी तसेच ३७४ मातंग विद्यार्थ्यांपैकी २९८ म्हणजेच ७९ टक्के विद्यार्थी या महाविद्यालयात शिक्षण घेत

असत. मात्र इतर दलित जातींच्या तुलनेमध्ये महार किंवा बौद्ध यांचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून येते.[५]

१९५० मध्ये महार समाजातील लोक इतर दलित जाती-जमातीं प्रमाणेच दुर्बल व मोल-मजूरी करून उदरनिर्वाह करणारे होते १९६९-७० मध्ये ३५ लाख ७१ हजार लोकसंख्येत महाविद्यालयीन शिक्षण घेणारे १४ हजार ३६३ विद्यार्थी होते. तर उरलेल्या दलित जाती-जमाती व भटक्या विमुक्तामध्ये मध्ये ५२ लाख ६० हजार लोकसंख्येमध्ये महाविद्यालयीन शिक्षण घेणारे ७०१९ विद्यार्थी होते. महार आणि बौद्धांच्या २४८ मध्ये एक विद्यार्थी उच्च शिक्षण घेणारा होता. कारण १९२६ ते १९५६ या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे प्रबोधन केले त्याचे फलित म्हणून बौद्धांमध्ये जेवढी जागृती झाली तेवढी तुलनेने इतर दलित वर्गात झाली नाही. औरंगाबाद येथील या सर्व महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणा-या ९५ टक्के मुलांचे पालक आपल्या घरातील वस्तू सावकाराकडे गहाण ठेवून कर्ज काढत असत. आणि मुलांना शिक्षणासाठी पाठवत असत. या सर्वांना त्यांच्या नेतृत्वाचा खूप मोठा आधार वाटत असे.

### २.७.५ सिद्धार्थ कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक्स : मुंबई १९५३ सिद्धार्थ कॉलेज ऑफ लॉ - मुंबई १९५६

या दोन कॉलेजेस ची स्थापनासुद्धा वरील हेतूनेच करण्यात आली आणि सोसायटीच्या आखत्यारीतील शैक्षणिक संस्थांच्या संख्येत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर वाढच होत गेली. सोसायटीने मुंबई, औरंगाबाद, महाड, पुणे, नांदेड, वडाळा अशा ठिकाणी अनेक संस्था तसेच आश्रम आणि वसतीगृहे स्थापन केली.

विद्यार्थी पार्लमेंट व वक्तृत्व शाखा अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांची सुरुवात सिद्धार्थ महाविद्यालयाने सुरू केली होती. २५ सप्टेंबर १९४७ रोजी या महाविद्यालयात विद्यार्थी पार्लमेंट व वक्तृत्व शाखेचे उद्‌घाटन त्यांनी केले होते.[६] विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यास करून पदवी संपादन करावी एवढाच हेतू न ठेवता सामाजिक, राजकीय भान ठेवावे यासाठी विद्यार्थी पार्लमेंट व विविध विषयांवर वक्तृत्व घेण्यासाठी त्यांनी प्रोत्साहन दिले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी राजकीयदृष्ट्या

कसे जागरूक असावे याबद्दलची त्यांची मते महत्त्वपूर्ण ठरतात. म्हणूनच विद्यार्थ्यांसमोर त्यांनी राजकीय प्रश्नही ठेवले परंतु राजकारण म्हणजे काय? त्यातील जबाबदा-या कोणत्या? पद्धती कोणत्या? याबद्दल त्यांची स्वतंत्र मते आहेत. शैक्षणिक जीवन आणि राजकारण, शैक्षणिक जीवन आणि समाजकारण, शैक्षणिक जीवन वास्तविक जीवन यातील परस्पर संबंध विद्यार्थ्यांनी लक्षात घेतला पाहिजे आणि आपला व्यापक दृष्टीकोन व निर्णयक्षमता वाढविली पाहिजे. हे फक्त ज्ञान व शिक्षणातूनच होते असे त्यांचे मत होते. ब्रिटिशांचे उदाहरण देत असताना त्यांनी सांगितले की, ब्रिटिशांनी ५० वर्षांच्या काळामध्ये अनेक आश्वासने दिली. परंतु अनुसूचित जातीच्या राजकीय अस्तित्वामध्ये कोणतीही मदत केली नाही. वंचित वर्गाला निराधार सोडले. त्यामुळे वंचित वर्गाने फक्त आपल्या शक्तीवर अवलंबून रहावे अन्य कशावर ही नाही असा संदेश त्यांनी दिला. ते इंग्लंडमध्ये असताना त्यांनी विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांशी चर्चा केली होती. परंतु त्यांनी ब्रिटिश साम्राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातूनच निर्णय घेतला होता. हा ब्रिटिशांचा निर्णय म्हणजे अनुसूचित जातीसाठी हानिकारक होता. अल्पसंख्याक उपसमितीमध्ये त्यांनी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मांडून उमेदवार ज्या समुदायाचे प्रतिनिधीत्व करतो त्याला विजयी होण्यासाठी त्या समुदायाची ३५ टक्के मते मिळावीत असे मत त्यांनी मांडले. परंतु याबाबत नकारात्मक भूमिका दिसून आली. आपल्या बांधवांना दिलासा देताना त्यांनी विद्यार्थ्यांसमोर ब्रिटिश मजूर पक्षाचा इतिहास सांगितला. अवघ्या २४ वर्षात त्या पक्षाने सत्ता मिळविण्या इतपत यश प्राप्त केले. त्यांची तत्त्व आणि कार्यक्रम यांचा हा विजय होता. शेड्युल्ड कास्ट फेडरेशन यांनीही हीच भूमिका ठेवली आहे. शेड्युल्ड कास्ट फेडरेशन याबाबत विद्यार्थ्यांसमोर मते मांडताना त्यांनी तीन गोष्टींकडे लक्ष वेधले. १) राजकीय अस्तित्व कायम टिकविणे. २) चांगले नेतृत्त्व मिळविणे. ३) कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडणारे निष्ठावान कार्यकर्ते करत असणे.

याचाच अर्थ शेड्युल्ड कास्ट फेडरेशन कोणत्याही परिस्थितीत विकली जाऊ नयेत याची काळजी घेण्याबद्दल ते पुन्हा पुन्हा सांगतात. या विद्यार्थ्यां मधूनच योग्य वेळी या फेडरेशनचे नेतृत्त्व करण्यासाठी सक्षम कार्यकर्ते पुढे

येतील आणि हे कार्यकर्ते मी असे पर्यंतच घडावेत असे ते म्हणत असत. अनेक विद्यार्थ्यांना राजकीय चळवळीमध्ये पडण्याची इच्छा असते परंतु राजकारण म्हणजे काय? हे विद्यार्थ्यांनी समजून घेतले पाहिजे. राजकारणात अनेक जबाबदा-या असतात. पक्षाचे कार्यक्रम असतात. ते राबविण्यासाठी कोणत्या पद्धतींचा आणि कोणत्या तंत्रांचा अवलंब केला पाहिजे याची स्पष्टता असणे आवश्यक आहे. शैक्षणिक जीवन आणि वास्तविक जीवन यामध्ये पूर्णतः विसंगती आहे. म्हणूनच राजकारण व समाजकारण या गोष्टींपासून विद्यार्थी दूर असतो. म्हणूनच विद्यार्थ्यांनी आपली मानसिकता, आपला दृष्टिकोन, वैचारिक क्षमता आणि प्रश्न सोडविण्याची क्षमता वाढवली पाहिजे. निर्णय क्षमता व दृष्टिकोनाची व्यापकताही वाढवली पाहिजे. विज्ञानामध्ये प्रयोग शाळांमध्ये बसून समस्या सोडवता येतील परंतु समाजविज्ञानामध्ये आणि राजकारणा मध्ये असे होत नसते. जनतेचे प्रश्न, आपल्या बांधवांचे प्रश्न, आपल्या शिक्षण व ज्ञानाच्या आधारे समजून घेतले पाहिजे. आपल्या देशाचा राज्यकारभार चालवणारे नेते कुठे चुकतात आणि समाजापुढील समस्यांची सोडवणूक समाधानकारक कशी करता येईल याचा विचार विद्यार्थ्यांनी केला पाहिजे.

वक्तृत्व याबाबत बोलताना ते स्पष्टपणे असे म्हणतात, राजकारणामध्ये वक्तृत्वाला फारसे महत्व नसले तरी विरोधकांच्या मतांचे परिवर्तन करण्याची कला विकसित करणे आवश्यक आहे. गुंडशक्तीचा वापर करून लोकशाहीतील बहुमताला आपण नमवू शकत नाही. त्यामुळे वक्वृत्व कलेच्या आधारे मतपरिवर्तनाची सक्षमता विकसित करावी लागेल.यासाठी वेळेप्रमाणे कधी नम्रता, कधी युक्तीवाद, कधी तर्कनिष्ठता, कधी ठामपणा, कधी विचार प्रवर्तकता यासाठी आवश्यक आहे. म्हणूनच सभागृहाला जिंकण्याचे कौशल्य आत्मसात करावयाचे असेल तर भाषण देण्याची कला गांभीर्याने आत्मसात करावी. यामध्ये भाषेवर प्रभुत्व असणे हा महत्वाचा गुण आहे तो शिक्षण आणि ज्ञान व ग्रंथवाचनानेच साध्य होऊ शकतो. भारतामध्ये असलेल्या संसदीय लोकशाहीकडे विद्यार्थ्यांचे लक्ष त्यांनी वेळोवेळी वेधून घेतले आहे. संसदीय लोकशाही ही बहुमताची लोकशाही व्यवस्था असून कायद्यानुसार सर्व निर्णय बहुमताने घेतले जातात. परंतु याच काळजीपूर्वक विचार करावा लागेल. मूलभूत अधिकारांच्या

बाबत जागृक असले पाहिजे. देशाला चांगल्या शासनाची आवश्यकता आहे. हे सर्वांना माहित असते परंतु हे चांगले शासन कसे प्राप्त होईल याचा विचार विद्यार्थ्यांनी करावा. याची सैधांतिक मांडणी करता येत नाही कारण मत मतांतरे अनेक असतात. मात्र आपल्या हक्काबाबत जागृकता असणे मात्र विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी परिपूर्ण असावे यासाठी त्यांचा कटाक्ष होता. म्हणूनच विद्यार्थ्यांसमोर विविध विषयांवर त्यांनी विचार व्यक्त केलेले दिसून येतात. अशाच एका कार्यक्रमात सिद्धार्थ कॉलेजमधील विद्यार्थ्यांसमोर विविध भाषणाचा उल्लेख नवयुग साप्ताहिकाच्या एका अंकात आहे.[७] 'आमच्या कॉलेजची परंपरा या विषयावर त्यांनी विद्यार्थ्यांसमोर भाषण केले. सुरुवातीलाच ते अत्यंत खेदाने म्हणाले होते, "आजकालच्या विद्यार्थ्यांमुळे माझी पूर्णपणे निराशा झाली आहे. त्यांना कशाचीही आस्था वाटत नाही. आमच्या देशात पूर्वी असा एक काळ होऊन गेला की त्यावेळी न्या.रानडे, गोखले, टिळक, व फिरोजशहा मेहता याच्यासारखे कितीतरी अत्यंत कळकळीचे विद्यार्थी निर्माण झाले. त्यांच्यामध्ये उमेद होती, शिस्त होती, जबाबदारीची जाणीव होती, परंतु आजकालच्या विद्यार्थ्यांमध्ये शिस्त नाही आणि जाणीवही नाही." अनेक कॉलेजमध्ये त्यांना व्याख्यानासाठी निमंत्रणे जात. पण त्यांनी स्विकारली नाहीत. परंतु सिद्धार्थ कॉलेजची एकवेगळी परंपरा निर्माण करण्यासाठी त्यांची तळमळ होती. विद्यार्थ्यांसमोर त्यांनी सिद्धार्थ या भगवान बुद्धाच्या नावाबद्दल आदर व्यक्त करून भगवान बुद्धाच्या तत्त्वज्ञानाची माहिती दिली. भगवान बुद्धांनी सांगितले होते की, प्रत्येक माणसाला विचार करण्याचे स्वातंत्र्य आहे. पण त्या विचार स्वातंत्र्याचा उपयोग त्यांनी सत्य शोधण्यासाठी करावा. सत्य म्हणजे हे की मनुष्याच्या पंचज्ञानेंद्रीयांना ते सत्य पटले पाहिजे म्हणजेच ते सत्य पाहता आले पाहिजे, ऐकता आले पाहिजे, त्याचा वास घेता आला पाहिजे, त्याचा स्वाद घेता आला पाहिजे आणि त्याच्या अस्तित्वाची साक्ष पटवता आली पाहिजे. सत्य शोधणे व जो धर्म मानवता शिकवेल त्या धर्माचे अनुसरण करणे ही ध्येये सिद्धार्थ कॉलेजने अनुसरली पाहिजेत आणि सिद्धार्थ कॉलेजचे हेच ध्येय असले पाहिजे असे ते म्हणतात. मुंबई येथे सहा महाविद्यालये, विद्यालये, रात्रशाळा वसतीगृहे, संशोधन

संस्था इत्यादींच्या रूपाने मुंबई येथे ही त्यांनी शिक्षणाचा खूप मोठा विस्तार केला.

पी.ई.एस सध्याचे स्वरूपः पीपल्स एज्युकेशन सोसायटीमध्ये सध्या वाद असून न्यायालयीन लढाई चालू आहे. सध्या ही संस्था अनेक गटात विभागली गेली आहे.

## २.८ स्त्री शिक्षणाचा पुरस्कार :

दलित समाजातील व्यक्तीला परदेशात अध्ययनासाठी जाण्याची संधी लाभणे ही अत्यंत दुर्लभ गोष्ट डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी करून दाखवली होती. परदेशातील त्यांचे जीवन हे त्यांची वैचारिक दिशा ठरवण्यासाठी आणि भारतात परतल्यानंतर आपल्या बांधवांच्या प्रगतीसाठी प्रयत्न करणे या ध्येयासाठी उपयुक्त ठरले. तेथील वैचारिक विश्वाने त्यांचे वैचारिक विश्व अधिक प्रगल्भ झाले. याची वेळोवेळी प्रचिती येते. अमेरिकेहून वडिलांस लिहिलेल्या पत्रांमध्ये त्यांनी पददलितांच्या दैन्यावर एक रामबाण उपाय सुचवला तो उपाय म्हणजे पददलितांमध्ये शिक्षणप्रसार होय.[८] या पत्रामध्ये शेक्सपिअरच्या नाटकातील 'प्रत्येक माणसाच्या आयुष्यात जेव्हा संधीची लाट येते तेव्हा त्या संधीचा योग्य प्रकारे उपयोग त्याने केला तर त्या मनुष्यास वैभव प्राप्त होते असे त्यांनी म्हटले आहे.'[९] याच पत्रामध्ये त्यांनी आई-बाप व मुलांचे शिक्षण याबद्दल विचार व्यक्त केले आहेत. त्यांचे म्हणणे असे आहे की, आई-बाप आपल्या मुलांच्या आयुष्याला वळण लावू शकतात. मुलांच्या शिक्षणाबरोबरच मुलींच्या शिक्षणासाठी सुद्धा धडपड केली तर आपल्या समाजाची प्रगती लवकर होईल. स्त्रीपुरुषांच्या एकत्र शिक्षणाचा त्यांनी पुरस्कार केला. एकत्र शिक्षणामुळे स्त्री-पुरुष यांच्या एकत्र सहवासाचा आणि नितिमत्तेचा परिपोष घडून येतो आणि स्त्री स्वातंत्र्य व समानतेचा पुरस्कारही त्यातून स्पष्ट होतो. स्त्रियांच्या प्रगतीवरूनच समाजाची प्रगती मोजली जाते असे ते म्हणत असत.

११ एप्रिल १९४७ रोजी संविधान सभेत त्यांनी हिंदू कोड बिल मांडले. २७ सप्टेंबर १९५१ पर्यंत मान्य न झाल्याने कायदेमंत्री पदाचा राजीनामा त्यांना द्यावा लागला. या राजीनाम्याची त्यांनी जी दोन महत्वाची कारणे सांगितली. ती म्हणजे हिंदू कोड बिलाला मान्यता न देणे. आणि मागास जातींसाठी आयोग

न नेमणे. केवळ दलितच नव्हे तर संपूर्ण स्त्रीवर्गाच्या उन्नतीसाठी हिंदू कोड बिलाची त्यांना आवश्यकता वाटत होती. १४ एप्रिल १९४७ रोजी मांडलेले हिंदू कोड बिल ९ एप्रिल १९४८ पर्यंत भिजत ठेवले. त्यानंतर हे बिल सिलेक्ट कमिटीकडे पाठवून दिले. १९४९ साली चर्चेला घेण्यात आले. फेब्रुवारी १९४९ मध्ये चार दिवस, मार्च १९४९ मध्ये एक दिवस, एप्रिल १९४९ मध्ये दोन दिवस चर्चा झाली. निर्णयाविना चर्चा संपली. डॉ. आंबेडकर यासंबंधी म्हणतात, '१७ सप्टेंबर १९५१ रोजी हे बिल पुन्हा चर्चेस आले असता खुद्द पंतप्रधान नेहरू यांनी त्यात कपात सुचविली. ही कपात इतकी भयंकर होती की, मूळ बिलाचे रूपच बदलून गेले.' त्यामुळे डॉ. आंबेडकरांचा संताप अनावर झाला होता. देशातील सर्व स्त्रियांच्या हक्काचे हे बिल होते. तेच भिजत ठेवले. या बिलावर त्यांनी आपली भूमिका विस्ताराने २७ फेब्रुवारी १९४९ च्या संविधान सभेत मांडली. तहकुबी आक्षेप आल्यानंतर दिलेले हे उत्तर आहे. ते म्हणतात, 'मला सभागृहाला एवढेच सांगावयाचे आहे की, जर तुम्हाला हिंदू पद्धत, हिंदू संस्कृती, हिंदू समाज टिकवायचा असेल, तर तुम्ही आवश्यक असेल तेथे दुरुस्ती करण्याची कुचराई करू नका. हिंदू पद्धतीचे जे भाग जवळ जवळ मोडकळीस आले आहेत, त्याची दुरुस्ती करण्यापलीकडे सदर बिल अधिक काहीही करीत नाही.'[१०]

इ.स १९१७ मध्ये ब्रिटिश सरकारने प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे असे विधेयक संमत केले परंतु तत्कालीन परिस्थितीत वर्ण व्यवस्थेच्या प्रभावाने त्यास विरोध झाला. मुलांबरोबर मुलींना शिक्षण द्यावे की नाही असा वाद निर्माण झाला. ४ ऑगस्ट १९१३ रोजी न्यूयॉर्कहून श्री शिवनाक जमेदार यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पत्र लिहिले, जमेदार यांची मुलगी चौथ्या इयत्तेत शिकणारी महार समाजातील पहिली मुलगी होती. त्यांनी आपल्या पत्रात त्यांच्या मुलीचा गौरव केला. आणि आपल्या समाजाने मुलांच्या बरोबरच मुलींच्या शिक्षणाकडे लक्ष दिले तर आपल्याला चांगले दिवस येतील आणि प्रगती घडून येईल. त्यांनी शिक्षणाच्या बाबतीत मुलगा-मुलगी हा फरक केला नव्हता. समाजाच्या प्रगतीचे दुसरे चाक हे स्त्री असून त्यास शिक्षणाच्या संधी दिल्या पाहिजेत तरच प्रगती व्यवस्थित होऊ शकेल म्हणून स्त्री वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार करून त्यांच्यात स्वाभिमान निर्माण केला पाहिजे. असे विचार

त्यांनी मांडले. कुमारी काशीबाई जाधव या ढोर समाजातील मुलीने त्यांना पत्र लिहिले होते व आपण मॅट्रिक नापास असून पुढे शिकण्याची इच्छा आहे असेही लिहिले होते. त्या मुलीस त्यांनी नर्सिग कोर्स करण्यास सांगितले. मॅट्रिक नापास असल्याने तिला प्रवेश मिळत नव्हता परंतु त्यांनी स्पेशल केस म्हणून तिला प्रवेश मिळवून दिला. आणि मोफत वसतीगृहाची सोय करून दिली. कुमारी शांता दगडू शिंदे ही मराठी शाळेत शिकणारी एक मुलगी. एका किर्तनकाराबरोबर तिला लग्न करायचे होते. मुलीच्या वडिलांनी तिला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे आणले त्यावेळी तिने शिक्षिका व्हावे आणि समाजामध्ये स्त्री शिक्षणाचा प्रसार करावा असे तिला सुचविले. त्या मुलीने ऐकले नाही हा भाग वेगळा. परंतु मुलींच्या मध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा ही त्यांनी तळमळ यातून दिसून येते. अस्पृश्य समाजाला स्त्रीशिक्षणाची प्रेरणा मिळावी म्हणून महार समाजातील मॅट्रिकच्या परिक्षेत पास झालेली पहिली मुलगी कु. सुलोचना घटकांबळे हीचे त्यांनी वृत्तपत्रातून जाहिररीत्या अभिनंदन केले.[११]

११ सप्टेंबर १९२० च्या मूकनायकच्या अंकात त्यांनी स्त्रीशिक्षणासंबंधीचे विविध व्यक्तींचे विचार त्यांनी स्पष्ट केले आहेत.[१२]

रा.ल.ब. भोपटकर :- इतर देशातील स्त्रिया राजकारणांत प्रत्यक्ष भाग घेऊ लागल्या आहेत अशा वेळी हिंदुस्थानच्या लोकांनीच या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणे शक्य नाही.

महाराष्ट्र माहेश्वरी परिषिदेचे अध्यक्ष बाबू गोविंददास :- आपल्या स्त्रिया सुशिक्षित झाल्याशिवाय पूर्ववैभव प्राप्त होत नाही.

कृष्णदासजी :- शिक्षणाशिवाय कशानेही सुधारणा होणार नाही. योग्य असे शिक्षण आपल्या मुला-मुलींना द्या.

सौ.पंडिता मनोरमाबाई :- पुरुषांच्या पेक्षा स्त्रियांना शिक्षण देण्याची आवश्यकता आहे.

मूकनायकमध्ये असे म्हटले आहे की, आपल्या देशातील बहुजन समाजांत शिक्षणाचा प्रसार जास्त प्रमाणावर झाल्याविना, देशाची सामाजिक धार्मिक व राजकीय सुधारणा होणे शक्य नाही हे जाणूनच कै.ना.गोखले यांनी सक्तीच्या

शिक्षणाचे बिल कायदे कौन्सिलांत आणले होते, परंतु त्याला आमच्या स्वार्थी जहाल कंपूकडूनच खो मिळाल्यामुळे ते पास न होता तसेच भिजत पडले. परंतु सुदैवाने ना.पटेल यांनी ते काम पुन्हा हाती घेऊन १९१७ ला निदान म्युनिसिपालिटीच्या हद्दीत तरी सक्तीचे प्राथमिक शिक्षण मुलामुलींस एकदमच दिले जावे म्हणून प्रयत्न करून हा कायदा पास करून घेतला. पण अखेर तो तसाच कागदावर अद्याप कसर खात पडून राहिला. कारण त्यावर आमच्या स्वराज्य भोक्त्या जहालाग्रणींनी बरीच मल्लिनाथी करून ते काम कसे रेंगाळत ठेवले आहे हे सर्व श्रुतच आहे.[१३]

दिनांक १५ जुलै १९२७ च्या बहिष्कृत भारत च्या अंकामध्ये स्त्री शिक्षणाबद्दलचे महत्वाचे विचार मांडण्यात आलेले आहेत.[१४] ते पुढीलप्रमाणेः

हिंदू लोकांमध्ये स्त्री ही पुरुषाच्या चैनीची वस्तू आहे आणि पुरुषांच्या इच्छेनुसारच त्यांनी वागावे असा समज आहे. चैनीची वस्तू समजल्यामुळे तिच्या शरीराला वस्त्रप्रावर्णांनी आणि दागदागिण्यांनी शृंगारण्यात धनाचा व्यय होतो. तथापि, माणूस म्हणून तिला कोणत्याही प्रकारचे हक्क देण्यात आलेले नाहीत. ती संपत्तीची वारसदार तर नाहीच परंतु शिक्षण घेऊन मन सुसंस्कृत करण्याचा अधिकारही तिला नाही. स्त्रियांनी फक्त गृहलक्ष्मी व्हावे, प्रगती करू नये ही मर्यादा अनेक सुधारकांनी आपल्या पुढे ठेवल्याचे दिसून येते.

या अंकामध्ये पुढे असे म्हटले आहे की, अशा प्रकारचे संकुचित ध्येय स्त्री वर्गापुढे ठेवणे अनुदारपणाचे आहे. प्रत्येकाला पूर्णवस्थेत जाण्यास समाजाने अवसर दिला पाहिजे हे तत्व एकदा मान्य झाले की मग स्त्रियांच्या पुढे असे हलके ध्येय ठेवण्यात यावे याचे आश्चर्य वाटते. एका इंग्लिश तत्ववेत्याने असे सांगितले आहे की, ध्येय प्राप्त न होणे हा गुन्हा नाही. पण कमी प्रतीचे ध्येय डोळयापुढे ठेवणे हा मात्र गुन्हा आहे.

१७ जून १९२७ रोजी पुणे येथील हिंदी महिला विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाच्यावेळी सर शंकर नायर यांनी विद्यार्थ्यांना जो उपदेश केला तो महत्त्वाचा होता. ते म्हणाले होते की, हिंदी स्त्रियांनी देखील त्यांच्या अमेरिकन, चिनी, टर्की, रशियन वगैरे भगिनीं प्रमाणे स्वातंत्र्याविषयी चळवळ करून पुरुषांच्या बरोबरीचे हक्क मिळवावेत. तिकडे नोक-यामध्ये स्त्री-पुरुषांमध्ये जी

स्पर्धा चालू आहे तिचे अनिष्ठ परिणाम आहेत हे खरे. अशा प्रकारच्या चळवळी इकडे सुरू कराव्या असे नव्हे. वर्णाश्रमामुळे जी तफावत समाजात पडलेली आहे त्याला विरोध करण्यासाठी स्त्रियांचा एक स्वतंत्र लढा उभा राहिला पाहिजे. सर शंकर यांनी स्त्रीशिक्षणा संदर्भात दुसरा एक महत्वाचा मुद्दा उपस्थित केला तो ही बहिष्कृत भारत मध्ये सविस्तर देऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रीशिक्षणाला अत्यंत महत्त्व दिले होते याचा प्रत्यय येतो. सर शंकर असे म्हणतात की, युरोप, अमेरिका, रशिया, चीन इत्यादी देशांमध्ये स्त्रियांसाठी निराळी विद्यापिठे शाळा व कॉलेजेस कमी होऊ लागली आहेत. तेव्हा हिंदूस्थानातही स्त्री शिक्षणासाठी निराळया शाळा, निराळी कॉलेजेस नकोत. स्त्रीयांचे शिक्षण पुरुषांच्या बरोबर एकत्र असावे यास विरोध करताना पुराणमतवादी असे सांगतात, की स्त्रियांचा विनय आणि पुरुषांची नितिमत्ता शाबूत राखण्यासाठी वयाच्या सातव्या वर्षानंतर त्यांना वेगवेगळे शिक्षण देण्यात यावे. परंतु हा प्रकार विलक्षण वाटतो असे ते म्हणतात. या उलट स्त्रियांच्या सहवासात राहून जो पुरुष आपले मन ताब्यात ठेवू शकतो व पुरुषांच्या सहवासात राहून जी स्त्री आपले पाऊल वाकडे पडणार नाही अशी खबरदारी घेऊ शकते त्यांनाच नितीमान म्हणता येऊ शकते. पृथक ठेवल्याने अनितिचा अग्नी शांत न होता जास्त भडकणार आहे हे कोणीही विसरू नये. सर शंकर नायर यांनी हा जो उपदेश केलेला आहे तो स्त्रीशिक्षण आणि नितिमत्तेला पोषक आहे असे मत बहिष्कृत भारत ने व्यक्त केले.

बहिष्कृत भारताच्या ४ नोव्हेंबर १९२७ च्या अंकामध्ये खेड्यात मुलींच्या शाळांची जरुरी या मथळयाखाली कृष्णा नायकू सुतार, कळंबी यांचा एक लेख प्रसिद्ध करण्यात आलेलाआहे.[१५] या लेखामध्ये सुतार यांनी व्यक्त केलेली मतेही बहिष्कृत भारत ने मान्य केलेलीच मते आहेत त्यामुळे या लेखाचे महत्त्व व स्त्रीशिक्षणाच्या प्रचार व प्रसारासाठी प्रबोधन या दोन्ही गोष्टी साध्य झालेल्या आहेत. या लेखाची सुरुवातच अशी आहे की, देशाची उन्नती अगर अवनती तेथील स्त्री-पुरुष रहिवाशांच्या गुणा-अवगुणांवर एकत्रितच अवलंबून असते. इंग्लंड, जर्मनी, अमेरिका या देशातील स्त्रीवर्ग पुरुषांप्रमाणेच सुशिक्षित आहेत. म्हणूनच उपरोक्त देशउन्नत्तीच्या वैभवाग्री विराजमान आहेत. हिंदूस्थानात ब्राह्मणेतर

स्त्री समाजाकडे विशेषतः अस्पृश्य स्त्री समाजाकडे पाहिल्यास शिक्षणाचा गडद अंधःकार असल्याचे दिसून येते. शिक्षणाच्या अभावामुळे स्त्री समाज व्यवहारदक्ष नाही आणि आयुष्य दारिद्र्यावस्थेत संपते. संसाररूपी गाड्याची ही दोन्ही चाके सुशिक्षित व व्यवहारदक्ष असल्याविना तो गाडा चालणे शक्य नाही. या लेखात पुढे असे म्हटले आहे की, शहरामध्ये ब्राह्मणेत्तर लोक आपल्या मुली शाळेत पाठवण्याचे थोडेतरी धाडस करतात. मात्र खेड्यात याच्या उलट प्रकार असतो कारण विचारले तर 'मुलांमध्ये मुली बसवणे बरोबर नाही;' म्हणून आम्ही मुलांच्या शाळेत मुली पाठवत नाही असे उत्तर दिले जाते. त्यासाठी खेड्यांमध्येही मुलींच्या शाळा काढून स्त्रीसमाजात शिक्षणाचा प्रसार करणे अत्यंत जरुरीचे आहे.

### २.९ बहिष्कृत हितकारिणी सभा (२० जुलै १९२४ ) :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत हितकारिणी सभा नावाची समाजसेवी संस्था ९ मार्च १९२४ ला मुंबईच्या दामोदर हॉलमध्ये संध्याकाळी ४ वाजता समाजसेवकांची बैठक झाली. संस्थेला 'बहिष्कृत हितकारिणी सभा' हे नाव द्यावे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविले व ते मंजूर करण्यात आले. 'Educate Agitate and Organise' (शिकवा, चेतवा, संघटित करा) लोकांना सुशिक्षित करा, त्यांच्यात आपल्या हीन अवस्थेबद्दल चीड उत्पन्न करा आणि त्यांची संघटना निर्माण करा, असे सभेचे ब्रीदवाक्य त्यांनी ठरविले. त्यानंतर ही संस्था दिनांक २० जुलै १९२४ ला स्थापन झाली असे जाहीर केले या संस्थेचे पदाधिकारी पुढीलप्रमाणे होते :

**अधिपती-** डॉ. सर चिमणलाल हरीलाल सेटलवाड, ॲडव्होकेट पु.परांजपे, डॉ.वि.पा.चव्हाण, श्री.बी.जी.बाळासाहेब खेर. सॉलिसिटर.

संस्थापक मंडळ - अध्यक्ष - डॉ. भीमराव रामजी आंबेडकर बार ॲट-लॉ

**सेक्रेटरी-** सीताराम नामदेव शिवतरकर, खजिनदार - निवृत्ती तूळशीराम जाधव,

**सभासद-** म.आ.कांबळे, नि.लिं.गंगावणे, कृ.म.काळोखे, ग.वि.बारेघरकर, सं.तु.गायकवाड, रा.ना.वनमाळी, रे.द.डोळस, भ.स.पवार, गो.ना.परमार, धो.ना.गायकवाड, बाळाजी रामजी आंबेडकर, स.ना.काजरोळकर, के.सी.सकाटे, हि.का.आंबेडकर, सा.ना.मारवाडी, झो.म.राठोड. शं.कवडे इ.

**हिशोब तपासणीस-** बी.जी. फोंडेकर

**विश्वस्त (ट्रस्टीज)** - डॉ.भी.रा.आंबेडकर, सि.ना.शिवतरकर, ना.का.काजरोळकर, रां.ग.भातनकर, पां.र.घटकांबळे, नि.शं.ऐदाळे, वि.तु.जाधव, गणेशाचार्य, कों.दा.रणदिवे, शा.जाधव द.सं.पवार, रा.कृ.कदम, बा.अ.गायकवाड, रा.दारोळे, नानाजी मारवाडभ, के.र.वाघेला.

**२.९.१ बहिष्कृत हितकारिणी सभेचे ध्येय-उद्देश व नियम :**

या संस्थेचे हेड ऑफिस दामोदर हॉल परळ, मुंबई १२ येथे राहील

१. बहिष्कृत वर्गाच्या चालू परिस्थितीबद्दल माहिती गोळा करून, ती लोकनिदर्शनास आणून त्यावर लोकमत तयार करणे.

२. त्याचप्रमाणे सरकारकडून त्यांचे हक्क संरक्षण व्हावे व त्यांच्या उन्नतीस जरूर त्या सवलती मिळाव्यात म्हणून प्रयत्न करणे.

३. बहिष्कृत वर्गात जागृती निर्माण करणे व त्यासाठी प्रचारक नेमणे.

४. बहिष्कृत वर्गात त्यांच्या हक्काची जाणीव निर्माण करून ते त्यांना प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करणे.

५. शिक्षण प्रसार करणे, वाचनालये स्थापने, विद्यार्थी वसतीगृहे काढणे, लायक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देणे व समाज जागृतीसाठी कीर्तने किंवा मॅलिकलॅटर्न च्याद्वारे व्याख्याने वगैरेंची व्यवस्था करणे, आर्थिक उन्नतीच्या जरुर त्या योजना व सूचना तयार करून योग्य अधिका-यास सादर करणे.

६. इतर अन्य मार्गांनी त्यांची सर्वांगीण सुधारणा करण्याचा प्रयत्न करणे.

बहिष्कृत सभेचा कारभार श्री. शिवतरकरांच्या हातात होता. त्यात ना.स.काणसोळकर, स.ना.काजरोळकर, बाळकृष्ण देवरूखकर, शिरसेकर, चांदोरकर, काणसोळकर, वनमाळी, बाळू पालवणकर (क्रिकेटर), बोरघरकर इत्यादी सर्व चर्मकार समाजातील लोक या संस्थेत होते. ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कट्टर चाहते होते. मुंबईतील अस्पृश्यातील जातीभेद नष्ट करावा हाही त्यांचा हेतू होता.[१६]

**२.९.२ सायमन कमिशनसमोरील शिक्षणविषयक खलिता :**

भारतामध्ये स्वातंत्र्य चळवळीच्या काळात ३ फेब्रुवारी १९२८ रोजी सायमन कमिशन भारतात आले. एकही भारतीय सभासद नसल्यामुळे या कमिशनवर भारतीयांनी बहिष्कार घातला होता. या बहिष्कारात सामील होण्यापेक्षा या

कमिशनसमोर अस्पृश्यांच्या राजकीय हक्काच्या मागणी बरोबरच शिक्षणविषयक मागण्यांचा खलिता त्यांनी दाखल केला. हा खलिता बहिष्कृत हितकारिणी सभेमार्फत सादर करण्यात आला. २० पानांच्या या खलित्यामध्ये अस्पृश्यांच्या शिक्षणविषयक गरजांची तीव्रता त्यांनी स्पष्ट केली होती. चातुवर्ण्य व्यवस्थेतील चौथा वर्ण हा अस्पृश्यांचा वर्ग असल्यामुळे इतर हक्क त्यांना डावलले गेले. तसेच शिक्षणविषयक हक्कही नाकारण्यात आलेले होते. वर्षानुवर्षे या हक्कांपासून हा वर्ग वंचित होता. भारतावर ब्रिटिशांचे राज्य आले तरी अस्पृश्यांच्या बाबत शैक्षणिक सुधारणांमध्ये कोणतीही सकारात्मक गोष्ट घडली नाही. या खलित्यामध्ये ते म्हणतात, महात्मा फुले यांनी १९४८ ला शाळा सुरू करून आपले शिक्षणविषयक कार्य सुरू केले. मात्र ब्रिटिशांनी अस्पृश्यांच्या शिक्षणाबाबत आपले धोरण बदलले नाही. तसे तर १९५४ ला कोर्ट ऑफ डायरेक्टरर्सने बहुजन समाजाला शिक्षण दिले पाहिजे असे मत मांडले होते. हंटर आयोगापुढे महात्मा फुले यांनी आपल्या साक्षीमध्ये शिक्षणाची गरज मांडली. यामुळे अस्पृश्यांच्या शिक्षणाबद्दल पहिल्यांदाच भारतात विचार सुरू झाला. मात्र ब्रिटिश सरकार याबाबत उदासीनच राहिले. या खलित्यामध्ये धारवाड येथील मुलांचे उदाहरण देण्यात आले होते.[१७] हे उदाहरण असे होते, "The only case as yet brought before Government in which the question as to the admission of pupils of the lowest class to Government school has been raised was that of a Mahar boy, on whose behalf a petition was submitted in June 1856 complaining that thought to pay the usual schooling fee, he had been denied admission to the Government school Dharwad.'

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या खलित्यात हे स्पष्ट करून पुढे सरकारने अस्पृश्यांच्या बाबतीत हे धोरण बदलले, तरी त्यांचे शिक्षणातील प्रमाण कमी होते, हे १८८१-८२ ची आकडेवारी देऊन स्पष्ट केले होते.

| धर्म | प्रा. शाळा | इंग्रजी शाळा | महाविद्यालय |
|---|---|---|---|
| ख्रिश्चन | १५२१ | १४२९ | १४ |
| ब्राह्मण | ६३०७१ | ३६३९ | २४१ |
| इतर हिंदू | २,०२,३४५ | ६२४ | १०५ |
| मुसलमान | ३९२३१ | ६८६ | ०७ |
| पारशी | ३५१७ | १५२६ | १०८ |
| वन्य जाती | २७१३ | ६ | ० |
| अस्पृश्य | २८६२ | १७ | ० |
| ज्यू व इतर | ३७३ | १०३ | २ |

एकूण शिक्षणाचे प्रमाण कमी होते व त्यातही अस्पृश्यांचे शिक्षण किती कमी हे १९२३-२४ “Report of the Director of Public Instruction for Bombay’ च्या रिपोर्टनुसार त्यांनी सादर केले होते.[१७]

| | Primary Ed. (1000 ) of their Population) | Secondary Ed.(1 Lack of their Population) | College Ed. (2 Lack of their Population) |
|---|---|---|---|
| Advanced | 119 | 3000 | 1000 |
| Hindus | - | - | - |
| Mohamedans | 92 | 300 | 52 |
| Intermediate | 38 | 140 | 14 |
| Class | - | - | - |
| Backward Class | 18 | 14 | Nill for nearly one at call |

ही आकडेवारी पाहता, मागासवर्गीय शिक्षणापासून दुरावले होते, त्यांचे प्रमाण अत्यल्प होते हे लक्षात येते, याच वेळी डॉ. बाबासाहेबांनी ‘बहिष्कृत हितकारिणी’ सभेतर्फे पुढील मागण्या केल्या होत्या.[१८] ‘Unless the primary

education act is abolished and the transfer of primary Education to the school board is stopped the Sbaha fears that education of the Depressed Classes will receive a great set-back.

1. Unless compulsion in the matter of primary Education is made obligratrory and unless the admission to primary schools is strictly enforced, conditions essential for educational progress of the Backward Classes will not come into existence.

2. Unless the recommendations made by the Hunter Commission regarding the education of the Mohamedians are applied to the Depressed Classes their education progress will not be accomplished fact.

3. Unless entry in the public service is secured to the Depressed Classed their will be no inducement for them to take education.

अशा प्रकारे बहिष्कृत हितकारिणी सभेचे कार्य वाढतच गेले. वेळोवेळी सरकारला निवेदने देणे. शिक्षणसंस्था स्थापने, वसतीगृहे स्थापन करणे, शिक्षणाचा प्रसार व प्रचार करणे, अशा शैक्षणिक कार्यामध्ये सभेने सिंहाचा वाटा उचलला.

**२.१० समारोप :**

समग्र मानवी जीवनाची उन्नती साध्य करावयाची असेल तर शिक्षण हेच ध्येय असावे लागते. परंतु शिक्षण ही खूप मोठी व व्यापक संकल्पना व प्रक्रिया आहे. आत्मभान, समाजभान निर्माण करणारे व जाणिवा विस्तारीत करणारे शिक्षण हे मानवाच्या व्यक्ती विकासातील एक महत्वाचे कौशल्य आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील ही सर्वात महत्वपूर्ण गोष्ट म्हणजे शिक्षण आणि त्या आधारे त्यांनी आयुष्यभर केलेले कार्य होय. त्यांच्या आयुष्यला अर्थ मिळाला तो शिक्षणाने. कारण रूढी-परंपरा छेद देऊन भारतातच नव्हेतर संपूर्ण विश्वाला एक स्वतंत्र विचारसरणी देणारे व्यक्तिमत्व शिक्षणाने दिले. दलितांचे

कैवारी, बहुजनांचे नेते, संविधानकर्ते, शिक्षकतज्ञ ही त्यांची ओळख म्हणजे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू आहेत. आपल्या स्वतंत्र विचारसरणीने सखोल चिंतनाने त्यांनी दलित समाजाला आत्मसन्मानाची दिशा दिली. त्यांनी केलेल्या भाषणांमधून वृत्तपत्रातील लेखनामधून, पत्रव्यवहारामधून वेळोवेळी घेतलेल्या भूमिकेमधून आपले शैक्षणिक विचार मांडले. पारतंत्र्यात असलेला भारत आधुनिक जगापुढे सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक भारतामध्ये चातुर्वर्ण्य व्यवस्थेत दलितांना व्यक्ती म्हणून स्थान नव्हते. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक कोणतेही अधिकार नव्हते. अशा काळामध्ये शिक्षणाची ज्योत लावणे व तेवत ठेवणे अत्यंत कठीण काम होते. अस्पृश्यांच्या मागासलेपणाच्या संदर्भात ब्रिटिश सरकारने १८८१-८२ च्या शिक्षण आयोगाचा जो अहवाल सादर केला त्याचा विचार केला तर दलितांच्या परिस्थितीची जाणिव होते. तसे तर इ.स.पूर्व ३०० च्या सुमारास शिक्षण म्हणजे तत्त्वज्ञान व धर्मशास्त्र इतकाच अर्थ होता. राजांच्या दरबारी शिक्षित वर्गाचे स्थान होते. परंतु ब्राह्मणवर्ग हा समाजात उच्च स्थान बाळगून होता. कारण धर्मशास्त्राचे असलेले संस्कृत ग्रंथ फक्त ब्राह्मण समाज वाचू व लिहू शकत होता. याचे कारण म्हणजे त्यांनाच तो अधिकार होता. प्राचीन काळात नालंदा व तक्षशिला विद्यापिठाने अशा सर्व स्तरांवर तो समाज मागासलेला होता. इंग्रजी राजवटीने शिक्षण पद्धती जरुर आणली त्यातून सुशिक्षितांचा एक वर्गही उदयास आला. अनेक सुशिक्षितांनी शिक्षण क्षेत्रामध्ये महत्वपूर्ण कार्य केले. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या कार्याने ख-या अर्थाने बहुजनांच्या शैक्षणिक कार्याला सुरुवात झाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शैक्षणिक कालखंड १८९६ ते १९२४ असा होता. महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्याचा प्रवाह त्यांच्यावर होता. महात्मा फुले यांनी केलेल्या या शैक्षणिक क्रांतीची धग त्यांनी अधिक प्रज्वलित केली आणि नव्या विचाराचा माणूस घडवणारा एक नवा समाज घडवला. अनेक विद्यार्थी घडवले. मध्ययुगीन कालखंडात पर्शियन, अरबी, उर्दू या भाषांमधील साहित्याने स्थान निर्माण केले. ब्रिटिश राजवट आल्यानंतर संस्कृत व पर्शियन भाषेची पिछेहाट झाली आणि इंग्रजी भाषेचे महत्त्व वाढले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, प्राचीन काळापासूनच चौथ्या वर्णाला शैक्षणिक अधिकार नाकारल्यामुळे त्यांचे जीवन अंधःकारमय

राहिले. प्राचीन ग्रीस व रोम मध्ये गुलामांचा स्वतंत्र वर्ग होता. परंतु ते गुलाम असले तरी त्यांना विद्या संपादनाचा अधिकार होता. मात्र भारतामध्ये असे नव्हते. तीच परंपरा ब्रिटिश आल्यानंतर ही म्हणजेच भारतातील आधुनिक काळ सुरू झाल्यानंतरही कायम राहिली. जातीव्यवस्थेचे वर्चस्व राहिल्यामुळे अनेक शतके हा वर्ग वंचित राहिला.

हिंदू समाजात उच्चवर्णियांना शिक्षण दिल्यानंतर खालच्या स्तरापर्यंत झिरपून त्यांनाही शिक्षण मिळेल अशी शिक्षणाच्या झिरपण्याविषयीच्या सिद्धांताची लॉर्ड मेकॉले याची संकल्पना होती. परंतु असे घडलेच नाही. त्यानंतर लॉर्ड मेयो याने या सिद्धांतावर टिका करून वेगळी भूमिका मांडली. परंतु भारतीय समाजातील परंपरागत रुढी-चालीरिती, सामाजिक विचार यांचेच वर्चस्व राहिले. परिणामी १८ व्या शतकातही भारतात सर्व क्षेत्रामध्ये समाजात तफावत होती. महाराष्ट्रातही सर्वांना समानता मिळेल अशी शिक्षणपद्धती नव्हती. जनतेचे शिक्षण ही जबाबदारी सरकारची नव्हती. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला महाराष्ट्रातही ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य आले. यावेळी मुंबई प्रांताचा गव्हर्नर लॉर्ड एलफिन्सस्टन याने शिक्षणविषयक माहिती गोळा करून काय करता येईल याचा विचार सुरू केला. धार्मिक ग्रंथांच्या पाठांतरावर भर देण्यात येत असे. शिकवण्याच्या मोबदल्यात शिक्षकांना जमिन देण्यात येत असे. दानशूर व्यक्तीकडून शिक्षणकार्यात मदत घेण्यात येत असे. शाळांसाठी खास जागेची सोय नसे तर मंदिरे, खाजगी इमारती अथवा एखाद्या शेडमध्ये शाळा भरवल्या जात असत. शिक्षण, शिक्षक बहुतेक वेळा ब्राह्मण जातीतीलच असत. मागास जातीतील विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश नव्हता. शिक्षणाच्या बाबतीत मुलींची स्थितीसुद्धा समाधानकारक नव्हती असा उल्लेख एलफिनस्टनने जमवलेल्या माहितीमध्ये सापडतो. एलफिनस्टन प्रयत्नाने १८१५ मध्ये बॉम्बे एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली. हीच संस्था पुढे १९२७  मध्ये 'बॉम्बे नेटीव्ह एज्युकेशन सोसायटी' होय. लॉर्ड एलफिन्स्टन हा त्याचा अध्यक्ष होता.

ख्रिश्चन मिशन-यानी सुद्धा शैक्षणिक कार्य केले. कलकत्ता येथे रेव्ह.डफ यांनी १८३० मध्ये इंग्रजी शाळा सुरू केली होती. मुंबई प्रांतात मेजर कँडी यांनी शैक्षणिक प्रसार केला. त्यांच्या प्रयत्नानेच १८५० मध्ये पुन्हा कॉलेज स्थापन

झाले. पुढे हेच डेक्कन कॉलेज झाले. असे असूनही शिक्षण हे उच्चवर्णीया पर्यंतच सिमीत राहिले. दलितांच्या शिक्षणाविषयीची उदासीनता असे ब्रिटिशांचे धोरण असल्यामुळे त्यांच्या शिक्षणामध्ये हा अडसर ठरला. १८५०-५१ मध्ये मुंबई प्रांताच्या शिक्षणमंडळाने जो अहवाल प्रसिद्ध केला त्यातही उच्च वर्णियांसाठी शिक्षणाची व्यापकता वाढविण्यात आली.

१८५४ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी सरकारने वुड चे शिक्षणविषयक धोरण जाहीर केले. या धोरणानुसार भारतातील सामाजिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या उपेक्षित वर्गासाठी शैक्षणिक उपाययोजना करण्यात येणार असल्याचे घोषित केले. त्यामुळेच वुडच्या खलित्याने भारतात समूह शिक्षणाचा पाया घातला गेला. १८५५ मध्ये मुंबई प्रांतात मागास- वर्गीयांसाठी पहिली शाळा सुरू झाली. मात्र हे धोरण केवळ कागदावरच राहिल्याचे दिसून येते.

सर्व बाजूने दलितांच्या शिक्षणाबाबतची ही उदासीनता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लक्षात आली होती. वर्षानुवर्षे सामाजिक गुलामगिरीतून आपल्या बांधवांची सुटका करण्यासाठी शिक्षणाशिवाय उपाय नाही याची त्यांना जाणिव झाली. या अज्ञानाच्या अंधःकारातून बाहेर पडण्यासाठी त्यांनी मोठी शैक्षणिक चळवळ उभी केली. ज्या देशातील बहुजन समाज निरक्षर आहे त्या देशाचा टिकाव त्या देशाचा विकास होणार नाही. राष्ट्रीय प्रगतीच्या मार्गावरील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे शिक्षण आहे. अशा विचाराने त्यांनी प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत सार्वत्रिक शिक्षणाचा प्रसार केला, प्रबोधन केले आणि कृतीशील कार्यही केले. त्यांनी केलेल्या प्रबोधनामुळे दलित वर्गात शिक्षणाची जाणीव झाली. आज दलितवर्ग एवढ्या मोठ्या प्रमाणावर शिक्षण घेत आहे याचे कारण केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शैक्षणिक चळवळ होय.

''मी एकदा वाचावयास किंवा लिहावयास बसलो की,
माझ्या सा-या  शक्ती एकवटल्या जातात.
मी रात्रभर वाचत अथवा लिहित बसलो तरी
मला थोडा देखील थकवा यते नाही.
अविश्रांत वाचनामुळे माझी स्मरणशक्ती एवढी तल्लख

आणि प्रखर झाली आहे की, अमुक ग्रंथामधील
महत्वाचे लिखाण किंवा अमुक ग्रंथाच्या अमुक
पानावर अमक्या ओळीत हे वाक्य किंवा हा संदर्भ
आहे हे मी सहज आणि अचुक सांगू शकतो."

-डॉ.बाबासाहेब आंबेडकर ११ सप्टेंबर १९५२

-'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे दालितेत्तर सहकारी' या पुस्तकातून साभार.

## संदर्भ ग्रंथ :


१. बुशी.एस.एन.,डॉ.बाबासाहबे आंबेडकर यांची शैक्षणिक संस्था, संपा. प्रा.विलास खरात, डॉ.प्रताप चाटसे, पुणे-२०१४, पृष्ठ.क्र ३३

२. तत्रैव पृष्ठ.क्र ३५

३. जनता, १७ डिसेंबर १९५५

४. प्रा.निकुंभे. सी.एच., समाज प्रबोधनकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पृष्ठ.१७७७

५. तत्रैव, पृष्ठ.क्र. १७७

६. खैरमोडे. चां.भ., डॉ.भीमराव रामजी आंबेडकर चरित्र ग्रंथ, खंड-१० पृष्ठ.क्र.१३

७. नवयुग, १३ एप्रिल १९४७

८. कीर धनजंय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई २००६, पृष्ठ ३४

९. खैरमोडे चां.भ., डॉ. भीरामव रामजी आंबेडकर, पृष्ठ. क्र ६६

१०. गायकवाड प्रदीप, संपा- भारताचे संविधानः संपादकीय : पृष्ठ.क्र.१७४

११. प्रा.निकुंभे.सी.एच., समाज प्रबोधनकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन पुणे- २००५, पृष्ठ. क्र. १६५

१२. मूकनायक, ११ सप्टेंबर १९२०

१३. तत्रैव

१४. बहिष्कृत भारत, १५ जुलै १९२७

१५. बहिष्कृत भारत, ४ नोव्हेंबर १९२७ पृष्ठ.क्र.- ४

१६. खरात शंकरराव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार, प्रथमावृत्ती, २६ जाने २००९, पुणे, पृष्ठ. क्र. २५-३०
१७. Moon Vasant (Eòd) “Dr. Babasaheb Ambedkar writing and speeches Vol.2, Education Department of Maharashtra Bombay 1982, Page 418)
१८. तत्रैव, पृष्ठ.क्र.- ४१६ वरून

## प्रकरण पाचवे

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक चळवळी

## भाग- १

### ३.१ प्रस्तावना :

भारताला समृद्ध वैचारिक इतिहास आहे. विचारप्रवाहातील मानवतावादी विचारांनी संपूर्ण जगामध्ये भारतीय इतिहासातील तत्त्वज्ञान आकर्षक ठरले. भारतामध्ये वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था हा प्रश्न मात्र कायमच चर्चेचा, चिकित्सेचा, संशोधनाचा तसेच समर्थनाचा आणि विरोधाचा राहिलेला आहे. भारतामध्ये वर्ण व जातीव्यवस्था आणि धर्मश्रद्धांनी जातीसंघर्षांनाही बळकटी दिली. भगवान गौतम बुद्धांनी प्रथमतः बौद्ध धर्माच्या माध्यमातून सामाजिक क्रांतीचे रणशिंग फुंकले. काही काळ जातीव्यवस्थेच्या विरोधातील विचार स्थगित राहिले. परंतु पुन्हा मध्ययुगामध्ये समतेच्या पुरस्काराच्या चळवळी निर्माण झाल्या. त्यामध्ये महात्मा बसवेश्वर, विरशैव, महानुभाव पंथ, वारकरी संप्रदाय अशा सारख्या व्यक्ती व संप्रदायांनी वर्ण व जातीव्यवस्था, स्त्रीदास्य, अस्पृश्यता या गोष्टी नाकारल्या. आध्यात्माच्या आधारे सर्व जातींना एकत्र करून भक्तीचा अधिकार देऊनही अध्यात्मिक समता निर्माण करण्याचा प्रयत्नही संतांनी के ला. आधुनिक युगामध्ये ब्राह्मो समाजापासून या कार्याला सुरूवात झाली. महात्मा फु ले यांनी तर फार मोठी सामाजिक क्रांती के ली. भगवान बुद्धांपासून सुरू झालेली सामाजिक क्रांती महात्मा फुले यांच्यापर्यंत शिखरावर पोहोचली, आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ती पुढे नेली. तिला एक निश्चित स्वरूप व दिशा दिली. सामाजिक क्रांतीमध्ये भारतातील जातीव्यवस्था पुर्णपणे उद्धवस्त के ल्याशिवाय भारताची प्रगती होणार नाही. हे त्यांचे निदान अचूक तर होतेच, परंतु ती नष्ट के ल्याशिवाय भावनिक ऐक्यावर आधारलेल्या ख-याखु-या राष्ट्राची निर्मिती करता येणार नाही अशी त्यांची धारणा होती. अस्पृश्यता हे जातीव्यवस्थेचे सर्वात विकृत व विषारी अपत्य होय.[१]

### ३.२ सामाजिक चळवळ व्याख्या व स्वरूप :

वेगवेगळ्या देशात त्या त्या परिस्थितीप्रमाणे सामाजिक चळवळीचे स्वरूप असते. त्यांची ध्येय व उद्देश यानुसार या चळवळी उदयास येतात. त्यामुळे

त्यांची कार्यपद्धती व प्रकार भिन्न असतात. सामाजिक चळवळीच्या काही व्याख्या सांगितलेल्या आहेत.[२] टर्नर वकीलीयन यांच्या मते, 'एकत्रित आलेले अनेक लोक ज्या समुहाचे किंवा समाजाचे घटक असतात त्यात परिवर्तन घडवून आणण्यासाठी किंवा परिवर्तनाला विरोध करण्यासाठी जेव्हा काहीशा सातत्याने कार्येरत असतात तेव्हा त्यास सामाजिक चळवळ असे म्हणतात.' ड्रेसर्लर व विलिस यांच्या मते, अनेक लोक हेतूपर्वक आणि सामूहिकरीत्या परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करतात त्यास सामाजिक चळवळ असे म्हणतात.

सामाजिक चळवळीचा उद्देश हा विशिष्ट कार्य हाती घेऊन जाणिवपूर्वक केलेली कृती असते. ही चळवळ संघटित व सामूहिकच असावी लागते. भारतामध्ये जाती व वर्णव्यवस्थेमुळे दलित पिडित व दुर्बल घटकांसाठी अनेक व्यक्तीमत्वांनी आपले वैचारिक व कृतीशील योगदान दिले. पिडीत व वंचितांच्या उत्थानासाठी सामाजिक चळवळी केल्या. आधुनिक काळामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या सर्वांचा वैचारिक वारसा अतिशय बळकटपणे चालवण्यासाठी वंचितांच्या हक्कांच्या चळवळी उभ्या केल्या. सामाजिक, अर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय तसेच धार्मिक ही हक्कांपासून आणि सुविधांपासून वंचित असणारा वर्ग म्हणजे दलित वर्ग. या वर्गास अस्पृश्य असे संबोधले गेले. आधुनिक काळामध्ये यासाठी 'दलित' हा शब्द पुढे आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक चळवळीचे स्वरूप माणूस हा केंद्रबिंदू मानूनच तयार झालेले होते. त्यांनी विविध स्तरावर चळवळी के ल्या त्या हाच उद्देश समोर ठेऊन केल्या. त्यांची लढाई सन्मानाची लढाई होती. माणूसकीसाठीची लढाई होती. जातीअंताची लढाई होती. वर्णव्यवस्थेच्या विरोधातील लढाई होती. जातीसंस्थेबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की, जातीसंस्थेने सार्वजनिक हितबुद्धी नष्ट केली, मन संकुचित केले, समाजाला नीतिभ्रष्ट आणि दुबळे के ले. जात ही एक भावना आहे. ती मनाशी संबंधित आहे. मनाची अवस्था आहे, जात टाकण म्हणजे भावनात्मक बदल घडवून आणणे होय. परंतु असा बदल धर्म होऊ देत नाही.[३] कॅथलिन जी. ई. असे म्हणतात, 'भारतीय हिंदूमध्ये जात हा असा समुह आहे की ज्यामध्ये जन्माच्या आधारावर

उच्च अथवा निम्न दर्जा निर्धारीत होतो. आणि जो समुह सामान्यतः आंतरर्विवाही असतो त्याचा संबंध एका व्यवसाय संघटनेशी जोडलेला असतो.'[४] भारतामध्ये ब्रिटिश राजवटीच्या प्रभावाने शिक्षण या माध्यमातून समतेच्या विचाराला ब-याच प्रमाणात चालना मिळाली. भारतीय तरुणांनी आपल्या देशातील रुढी व परंपरा आणि धर्मश्रद्धांची चिकित्सा करावयास सुरूवात के ली. भारतीय जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, विषमता यांचे मूळ शोधण्याचा प्रयत्न करण्यास सुरुवात के ली. परमहंस सभा, प्रार्थना समाज, आर्य समाज, ब्राह्मो समाज अशा संस्थांनी धर्माच्या व सामाजिक संबंधाच्या क्षेत्रात नवी मूल्ये रुजविण्याचे प्रयत्न सुरू केले. आपापल्या पद्धतीने मानवी व्यक्तिमत्वाची अंगभूत प्रतिष्ठा, मानवी स्वातंत्र्याचे हक्क, समता इत्यादी उदारमतवादी मूल्यांचा प्रसार समाजात केला.[५]

सामाजिक विषमतेच्या मूळात जाण्यासाठी धर्मचिंतनास सुरूवात झाली. आत्मटिकेतून धर्मश्रद्धा तपासण्यास सुरूवात झाली. सनातनी धर्माला आव्हान देऊन नवे बदल घडवण्याचा प्रयत्न झाला. सर्व सुधारकांच्या वैचारीक अभिमुखता उतरंडीकडून समानतेकडून वळल्या होत्या. उच्च-निचता अन्याय श्रम-विभागणी, अस्पृश्यता, स्त्रियांवरील अन्याय इत्यादी सामाजिक दुरीतांवर त्यांनी हल्ले केले. गुणवत्तेनुसार प्रतिष्ठा व संधी यावर भर दिला. शिक्षण प्रसारावर त्यांची मुख्य भिस्त होती.[६]

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना डॉ.केतकर यांनी दिलेली जातीव्यवस्थेची व्याख्या अर्थपूर्ण वाटते. डॉ.केतकर यांच्या मते, जात ही एक सामाजिक संस्था असून तिची दोन वैशिष्ट्ये आहेत.

१. जातीचे सभासदत्व केवळ जातीत जन्माला येण्यापुरतेच मर्यादित असते आणि त्या जातीत जन्माला आलेल्या सर्वांचा तिच्यात समावेश होतो.

२. कठोर जात कायद्यान्वये जातीतील व्यक्तींना जातीबाहेर लग्न करण्यास मनाई करण्यात आलेली असते.[७]

जातीव्यवस्थेच्या सखोल अभ्यास व चिंतनातून ही एक शोषण व्यवस्था आहे हे वास्तव त्यांना स्वतःच्या अनुभवातून दिसले होते. त्यासाठी शोषित व वंचित वर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी माणूस म्हणून त्यांना उभे करण्यासाठी त्यांनी आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत अनेक सामाजिक चळवळी उभ्या

केल्या. त्यांना आधुनिकतेवर आधारीत भारतीय समाजाची समता या तत्त्वावर आधारीत असलेली पुर्नरचना करावयाची होती. लोकशाहीवर दृढ विश्वास ठेवून व्यापक भूमिकेतून त्यांनी या चळवळी उभ्या केलेल्या होत्या. त्याचा आढावा या प्रकरणात घेण्यात येत आहे.

**३.३ माणगाव परिषद (२१-२२ मार्च १९२०) :**

माणगाव हे गाव दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर संस्थानातील कागल जहागिरीतील आहे. या ठिकाणी झालेल्या दलित परिषदेच्या पहिल्या अधिवेशनामुळे माणगाव हे ठिकाण ऐतिहासिक ठरले. तसेच ही परिषद ऐतिहासिक ठरली. परंतु आणखी एक अत्यंत महत्त्वाचे कारण असे होते की, अस्पृश्यांना त्यांचे अधिकार मिळवून देण्याचे स्वप्न ज्यांनी पाहिले त्या शाहू महाराजांची ही या परिषदेत उपस्थिती होती. त्यांनी कायद्याने कोल्हापूर संस्थानात अस्पृश्यता नष्ट केली होती. परंतु तरीही सामाजिकतेचा विचार करता अस्पृश्यता निर्मूलन झालेले नव्हते. अस्पृश्यतेतूनच एखादा खंबीर नेता या लढ्यासाठी पुढे आल्याशिवाय या कार्याला गती येणार नव्हती असे त्यांना स्पष्टपणे दिसत होते. माणगाव परिषदेच्या माध्यमातून महाराजांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्त्वामध्ये अस्पृश्यांच्या नेत्याचा शोध लागला. याही दृष्टीने या परिषदेस महत्त्व आहे. डॉ. आंबेडकर यांनीही पुढे काही वर्षांनी असे म्हटले होते की, ‘माझ्या सार्वजनिक आयुष्याची सुरुवात शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या माणगाव परिषदेत झाली.’

२१ व २२ मार्च १९२० रोजी हे अधिवेशन भरले होते. या परिषदेत महार, पारधी, रामोशी, कोळी हा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. या परिषदेमध्ये शाहू महाराजांच्या प्रेरणेमुळे हा ब्राह्मणेतर समाज परिषदेच्या निमित्ताने संघटित झाला होता. ही परिषद म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या आयुष्यातील पहिला मोठा व जाहीर कार्यक्रम होता असे म्हणावयास हरकत नाही. याच परिषदेने त्यांना अस्पृश्यांचे नेते म्हणून मान्यता मिळाली. तसेच अस्पृश्यांच्या अधिकाराची, हक्कांची चर्चा करणारी तसेच भावी काळातील अस्पृश्यांची स्थिती दलित चळवळीची दिशा या विषयीही चर्चा करणारी ही इतिहासातील पहिलीच परिषद होती. अस्पृश्यांच्या आजवरच्या स्थितीचे अभ्यासपूर्ण विवेचन व चिकित्सा

प्रथमच त्यांनी इतक्या मोठ्या माध्यमातून लोकांसमोर केली होती. या परिषदेमध्ये दोन सामाजिक क्रांतीची स्वप्न उराशी बाळगून त्या गतीशीलता व कृतिशीलता प्राप्त करून देणारे नेते एकत्र आले होते.

या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, 'ज्या हिंदू धर्माचे आपण घटक आहोत त्या हिंदू धर्माच्या व्यवहारात मनुष्यमात्राचे संघटन दोन तत्त्वांना धरून झालेले आहे. १) जन्मसिद्ध योग्यायोग्यता व २) जन्मसिद्ध पवित्र अपवित्रता या दोन तत्त्वानुसार हिंदूची विभागणी केली तर त्याचे तीन वर्ग होतात. १) जन्माने श्रेष्ठ व पवित्र, ज्याला आपण ब्राह्मण म्हणतो. २) ज्यांची जन्मसिद्ध श्रेष्ठता व पवित्रता ब्राह्मणांपेक्षा कमी दर्जाची आहे असा ब्राह्मणेतर वर्ग. ३) जे जन्मसिद्ध कनिष्ठ व अपवित्र आहेत असा बहिष्कृत वर्ग'[८] या वर्गीकरणामुळे समाजातील विषमता पराकोटीस गेली. जाचक बंधने मात्र अस्पृश्यांवर लादली गेली.[९] आपल्या भाषणात ते पुढे असे म्हणतात, 'ब्राह्मणेतरांमध्ये जन्मसिद्धच अयोग्यता मानली जाते. परंतु त्यांच्याकडे विद्या नाही म्हणून ते आज मागे राहिले आहेत. विद्या आणि द्रव्य त्यांच्या जवळ नसली तरी त्यांना ती उद्या मिळेल. मात्र बहिष्कृत वर्गाची स्थिती जन्मसिद्ध अयोग्यता ही तर आहेच परंतु अपवित्रतेमुळे अतिशय शोचनिय झालेली आहे त्यामुळे आत्मबल व स्वाभिमान ही उन्नतीची मुळ कारणे ही लोप पावली आहेत. सामाजिकदृष्ट्याही त्यांना हक्क नाहीत. शाळेत जाता येत नाही. सार्वजनिक विहिरीवर पाणी मिळत नाही. रस्त्यावर चालता येत नाही. आर्थिकदृष्ट्याही तितकेच नुकसान झालेले आहे. व्यापार, नोकरी व शेती हे जे धनसंचयाचे तीन मार्ग आहेत तेही त्यांच्यासाठी खुले नाहीत.' असे सांगून ते पुढे म्हणतात, 'स्वाभिमान जागा होण्यासाठी अनिष्ठ रुढी, प्रथा तसेच सवयी सोडून दिल्या पाहिजेत.'[१०] या ऐतिहासिक  परिषदेत पुढील १५ ठराव मंजूर करण्यात आले.

१. महायुद्धात दोस्त राष्ट्र व ब्रिटिश सरकारला विजय मिळाल्याबद्दल ही परिषद आनंद व्यक्त करते.
२. राजे महाराजे व संस्थानिक बहिष्कृतांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करत आहेत. त्यांचे ही परिषद आभार मानते.
३. सार्वजनिक रस्ते, विहिरी, तलाव, शाळा, धर्मशाळा, भोजनगृहे, वाहने

इत्यादी सोयींचा उपभोग घेण्याचा अधिकार बहिष्कृ त वर्गास आहे. कारण हे मानवी हक्क आहेत असे परिषदेचे मत आहे.

४. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात यावे.

५. बहिष्कृत वर्गात शिक्षणाचा प्रसार ही आवश्यक बाब आहे. त्यांच्या उन्नतीसाठी अधिकारी वर्गात बहिष्कृत वर्गातील लोकांना वाव द्यावा.

६. बहिष्कृत वर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या मिळाव्या.

७. स्पृश्य व अस्पृश्यांच्या शाळा एकत्रित असाव्यात.

८. महार वतनदारांची हालाखीची स्थिती आहे कारण त्यांना गलिच्छ कामे करावी लागत असल्यामुळे त्यांच्या वतनदारीवर रकमीपणाची छटा उमटली आहे.

९. मेलेल्या जनावरांचे मांस कोणत्याही जातीच्या माणसाने खाणे हा कायद्याने गुन्हा मानला जावा.

१०. तलाठ्यांच्या जागांवर बहिष्कृत वर्गातील व्यक्तींच्या नेमणूका व्हाव्यात.

११. बहिष्कृतेतर संस्था किंवा व्यक्ती यांना या वर्गाबद्दल कळकळ आहे परंतु सामाजिक हिताच्या दृष्टीने त्यांनी सुचवलेले उपाय बहिष्कृत वर्गास सर्वस्वी मान्य होतील असे सरकारने समजू नये.

१२. भविष्यात कायदे कौन्सिलात बहिष्कृतांचे प्रतिनिधी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांच्या स्वतंत्र मतदार संघातून निवडावेत.

१३. ही परिषद भरविण्याच्या कामी ज्यांनी परिश्रम के ले त्यांचे व आप्पा दादागौडा पाटील यांचे आभार व्यक्त करते.

१४. छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राज्यात बहिष्कृतांना समानतेचे हक्क दिले. याबद्दल प्रत्येक बहिष्कृत व्यक्तीने त्यांचा वाढदिवस साजरा करावा.

१५. वरील सर्व ठराव त्या-त्या अधिका-यांकडे व संबंधित व्यक्तींकडे पाठवण्याचा अधिकार ही परिषद त्यांच्या अध्यक्षास देत आहे.

मार्च मध्ये ही परिषद संपन्न झाल्यानंतर २६ जून हा शाहू महाराजांचा वाढदिवस त्यांनी मूकनायक अंकाचा शाहूगौरव अंक काढला.[११] या परिषदेमध्ये शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल असे उदगार काढले, ‘तुम्ही तुमचा पुढारी शोधला याबद्दल तुमचे मनापासून मी अभिनंदन करतो. ते

तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत.' इतकेच नव्हे तर अशी एकवेळ येईल की ते संपूर्ण हिंदुस्थानचे पुढारी होतील.[१२]

### ३ .४ नागपूर परिषद (३० -३१ मे ते १ जून १९२० ) :

सामाजिक हक्कांची जाणिव करून देणारी माणगाव परिषद झाल्यानंतर नागपूर येथे ३०-३१ मे व जून १९२० रोजी बहिष्कृत परिषद भरविण्यात आली यामध्ये अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांची जाणिव करून देण्यात आली. अशा पद्धतीची ही राष्ट्रीय स्तरावरील पहिलीच परिषद असल्यामुळे ही सुद्धा ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचीच होती. या परिषदेस मुंबई, मद्रास, मध्यप्रांत, व-हाड येथून पाचशे प्रतिनिधि उपस्थित होते. तसेच ब्राह्मणेतर चळवळीतील प्रमुख कार्यकर्ते रणदिवे, यादव, कोठारी याबरोबरच बर्वे चिटणीस, डॉ. परांजपे इत्यादी उपस्थित होते.[१३] ही परिषद बोलावण्यामागे काही कारणे होती. १९१७ मध्ये तत्कालीन भारतमंत्री माँटेग्यू भारतात आले असताना अस्पृश्य समाजाच्या वतीने त्यांच्या राजकीय मागण्यांसाठी नारायणराव चंदावरकर व वि.रा.शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली एका शिष्टमंडळाने त्यांची भेट घेतली. यावेळी होमरूल चळवळ ही भारतात चालू होती. अस्पृश्यांची कैफियत अस्पृश्य प्रतिनिधींमार्फतच मांडली गेली पाहिजे असा डॉ. आंबेडकर यांचा विचार होता. शिंदे यांचे निवेदन अस्पृश्यांच्या हितास बाधक आहे तसेच अस्पृश्यांच्या राजकीय आकांक्षा काय आहेत हे जाहीर करण्यासाठी नागपूर येथे परिषद घेण्याचे ठरले. राजर्षी शाहू महाराज हे या परिषदेचे अध्यक्ष होते. मंचावर राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गंगाधर चिटणीस, बी.के .बोस, बाबुराव यादव, श्रीपतराव शिंदे, शिवराम कांबळे, दत्तोपंत दळवी, गोविंद कांबळे, ग.आ.गवई आदी मान्यवर उपस्थित होते. परिषदेतील आपल्या भाषणात शाहू महाराज म्हणाले होते, अस्पृश्य हा शब्द निंद्य आहे. तुम्ही अस्पृश्य नाही उलट अधिक बुद्धिमान, अधिक पराक्रमी, अधिक विचारी, अधिक स्वार्थत्यागी असे तुम्ही राष्ट्राचे घटक आहात. मी तुम्हाला अस्पृश्य समजत नाही. आपले हक्क समान आहेत. देशाची उन्नती लवकर किंवा उशीरा होणे हे येथील जातीभेद ज्या प्रमाणात नाहीसा होईल त्या प्रमाणात अवलंबून आहे.[१४]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या परिषदेत म्हणाले की, 'आपण येथे जमलेले सर्व प्रतिनिधी बहिष्कृत वर्गाची उन्नती कशी होईल या दृष्टीने विचार करण्याच्या हेतूने जमलो आहोत. म्हणून आपल्या लोकांच्या उन्नतीच्या आड येणारी व्यक्ती मग ती बहिष्कृत वर्गातील असो किंवा उच्चवर्णीय हिंदूतील असो, तसेच एखादी संस्था असो पण ती आपल्या हिताच्या विरुद्ध एखादे कृत्य करीत असेल किंवा तसे कृत्य तिने मागे केले असेल तर त्या गोष्टीचा आपण निषेध करावा किंवा नाही? तेव्हा सगळे प्रतिनिधी एक आवाजाने म्हणाले की अलबत, आमच्या प्रगतीच्या आड येणारी कोणतीही व्यक्ती असो किंवा संस्था असो तिचा आपण तीव्र निषेध केलाच पाहिजे.'[१५] मात्र या परिषदेतून बहिष्कृत वर्गात धार्मिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक अशा सर्व प्रकारच्या जाणिवा करून दिल्याने त्यांच्यात स्वाभिमान निर्माण झाला. अठरापगड जातीतील सहभोजनही या परिषदेतून घडवून आणल्यामुळे एकीची भावना निर्माण झाली.

### ३.५ समाज-समता संघ (४ सप्टेंबर १९२७) :

समाज-समता संघ हा त्यांच्या आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचा कार्यकाल होय. ही संस्था महाड सत्याग्रहाच्या कालखंडातच त्यांनी स्थापन केली. महाड सत्याग्रहाला सुरूवात झाल्यानंतर त्यांना जाती व वर्णव्यवस्थेची प्रखरता अधिकच चटके देऊ लागली होती. यासाठी सामाजिक समता निर्माण करण्याच्या उद्देशाने ४ सप्टेंबर १९२७ रोजी या संस्थेची त्यांनी स्थापना केली. समानता हा प्रत्येक नागरीकाचा पवित्र हक्क असून मानवी जीवनातील माणसूकी जपण्यासाठी आवश्यक आहे म्हणून समानतेच्या या पवित्र हक्कांमध्ये धर्म, जात, वंश आणि लिंगभेद केला जाणार नाही. उच्चनिचतेच्या कल्पनांना थारा असणार नाही असेच लोक या संस्थेचे सभासद होऊ शकतील असे त्यांनी जाहीर केले. या 'संस्थेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. परंतु इतर सर्व पदाधिकारी उच्चवर्णीय होते. सुधारणावादी स्पृश्यांना बरोबर घेतल्यास अनुकूल वातावरण तयार होण्यास मदत होईल, तसेच हिंदूधर्माच्या सनातनी चौकटीवर हल्ला करणे सोपे होईल म्हणून उच्चवर्णीयांचे सहकार्य घेतले असावे. व्यावहारिक दृष्ट्या सामाजिक, धार्मिक तसेच इतर सर्वच क्षेत्रात अस्पृश्यांना मानवी दर्जा मिळावा, हा या संघाच्या स्थापनेचा उद्देश होता. सामाजिक समतेच्या चळवळीचा

प्रसार करण्यासाठी समाज समता संघाचे मुखपत्र म्हणून 'समता' पाक्षिक सुरू करण्यात आले. त्याचा पहिला अंक २९ जून १९२८ रोजी प्रकाशित करण्यात आला.'[१६] या पाक्षिकाची वर्गणी दोन रुपये सहा आणे होती. लोकमान्य टिळकांचे पुत्र श्रीधरपंत टिळक यांच्या पुढाकाराने पुणे येथील गायकवाड वाड्यात समाज-समता संघाची शाखा स्थापन करण्यात आली आणि टिळकांच्या घरी बैठक झाली. यामध्ये पुढील गोष्टी ठरविण्यात आल्या.

१. धार्मिक संस्काराच्या बाबतीत समता असावी म्हणून अस्पृश्यांना जाणवे देण्यात यावे.
२. जातीजातीतील उच्चनीचता ही भावना नष्ट करण्यासाठी सहभोजनाचा उपक्रम हाती घेण्यात यावा.
३. वैदिक पद्धतीने विवाह करण्याचा अस्पृश्यांनाही हक्क आहे म्हणून हा उपक्रम हाती घेण्यात यावा.
४. आंतरजातीय विवाहाशिवाय अस्पृश्यता नष्ट होणार नाही. असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. म्हणून आंतरजातीय विवाहाचा उपक्रम हाती घेण्यात यावा.
५. सार्वजनिक गणेशत्सोवात बहिष्कृतांचाही समावेश असावा.

समाज-समता संघ म्हणजे जातीनिर्मूलनातील एक क्रांतीकारी वळण होते. हा लढा अतिशय निर्भयपणे व व्यापकपणे लढावा लागणार होता. त्यासाठी वरील सर्व तत्त्वे आवश्यक होती. या संघाचे कार्यकारी मंडळ पुढीलप्रमाणे होते.[१७]

समाज - समता संघाचे कार्यकारी मंडळ पुढीलप्रमाणे :
अध्यक्ष - डॉ. भीमराव रा. आंबेडकर
उपाध्यक्ष - डॉ.आर.एन. भाईंदरकर, श्री.दे.वि. नाईक
सेक्रेटरी - श्री.एस.एम. गुप्ते, श्री.बी.व्ही. प्रधान
खजिनदार - श्री.आर.डी. गवळी
कार्यकारी मंडळ - मि.एफ.डी. सिल्हाव्हा, व्ही.आर. चांदोरकर, डी.व्ही. प्रधान, पी.पी.ताम्हणे, आर.जी. प्रतापगिरी, जे.पी. मुळे, एन.व्ही. खांडके
ऑडिटर्स - श्री.डी.बी. सुभेदार, आर.एम. कर्णिक

१. The foundation of the league is the belief that all human brings are equal and that are entitled to equal opportunities for the realization of their personality and the richment of their life.

(सर्व मनुष्यप्राणी समान असून, स्वातंत्र्यातील मनुष्यत्वाच्या विकासासाठी कारणीभूत होणा-या प्रत्येक साधनांवर, व संधीवर त्यांचा प्रत्येकाचा समसमान व सारखा हक्क असतो, असा या समता समाज संघाचा विश्वास आहे.)

२. The league futher assest that this tight to equality is secred, inalienable and invoidable.

(समानतेचा हक्क हा पवित्र, अबाधित व अभेद्य आहे.)

३. The league behaves that this right to equality is the birth right of every human being irrespective of race, creed, caste and sex.

(हा हक्क वंश (वर्ण), पंथ, जात व स्त्री-पुरुष (लिंग) भेदातीत आहे.)

४. The league believes that without the established of social equality a harmonius social life is not possible.

(सामाजिक समता अस्तित्वात आल्याशिवाय समाजाचा सामुदायिक (समाजजीवन) जीवनक्रम सुरळीत चालणे अशक्य आहे.)

५. (समाजाच्या सुरळीत व सुसंघटित आयुष्यक्रमाला बाधक होणारे सर्व आचार विचार, (कार्ये) व संस्था ही सारी समाज-समता तत्त्वाच्या विरोधी आहेत, अशी या संघाची निषेधपूर्वक घोषणा आहे.)

६. The league aims at the realization of all the above principles by all possible means.

(शक्य त्या सर्व उपायांनी वरील तत्त्वांची अंमलबजावणी करण्याचा ह्या संघाचा संकल्प आहे.)

या समाज-समता संघाची तत्त्वे व उद्देश डॉ. आंबेडकर यांनी स्वतःच तयार केलेली होती. या समता संघाचा पाया अतिशय व्यापक होता. याला जागतिक विचारसरणीची प्रेरणा होती. फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता,

बंधुता या त्रयींची देणगी जगाला दिली. त्याचप्रमाणे समाज-समता संघाने ही व्यापक संकल्पना महत्त्वाची मानून त्यास व्यापक सामाजिकतेची जोड दिली.

**३.६ महार वतन विधेयक व खोती पद्धत :**

अर्थशास्त्रातील सर्वोच्च पदवी प्राप्त करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९२३ मध्ये भारतात परतले. तत्कालीन ब्रिटिश साम्राज्यातील मुंबई प्रांताच्या विधीमंडळाचे सदस्य म्हणून १९२६ मध्ये त्यांची नियुक्ती झाली. त्यावेळी ग्रामीण भागातील परिस्थितीचा अभ्यास करून येथील गरीब जनतेच्या अन्यायाला वाचा फोडली. महार वतने आणि खोती पद्धती या प्रश्नांवर या प्रकरणात चर्चा करण्यात येत आहे. ते म्हणतात, महार वतन म्हणजे २० व्या शतकातील गुलामगिरी होय. म्हणून महार वतन नष्ट करणारे बील त्यांनी मांडले होते. १९२७ पासूनच महार वतन नष्ट करून या समाजाची गुलामगिरी नष्ट करण्याची भूमिका त्यांनी घेतली होती. कित्येक शतके महार वतन या नावाखाली चालु असलेल्या गुलामगिरीमुळे या समाजाचा आत्मविश्वास मारण्यात येत होता. 'ज्या भिके च्या भाकरीवर व बलुत्यावर ते कसे तरी जगतात असे त्यांना वाटत असे. तीच भिके ची भाकरी व बलुते त्यांना नरदेह स्वाभिमान शुन्य बनवून तो देह जिवंत असूनही मृतपाय झालेला असे. त्याचप्रमाणे त्यांची महत्त्वाकांक्षाही नष्ट झालेली असल्यामुळे त्यांचे मन ही मरून गेले होते.'[१८] पूर्वी गावामध्ये बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार असत. इंग्रज सरकार आल्यानंतर पेशवाईमध्ये वाढलेल्या या वतनपद्धती कमी करून आलुतेदार व बलुतेदारांचे तीन वर्ग करण्यात आले.[१९] १) सरकार आवश्यक वतनी गावकामगार २) रयत आवश्यक वतनी गावकारभार ३) सरकार व रयत यास अनावश्यक असे वतनी गावकामगार 'वतन' याचा अर्थ १८७४ च्या 'वतन ॲक्ट'प्रमाणे असा आहे 'कोणतेही वतनी माल मिळकत असल्यास ती व वंशपरंपरेचा हुद्दा तसेच त्यासंबंधीचे हक्क म्हणजे वतन.'[२०] खरे तर महार सोडून इतर बलुतेदारांची कामे कमी व त्या-त्या वेळेपुरती मर्यादीतच होती. परंतु महार वतनदारास कामगार व गावचा बलुतेदार अशा दुहेरी चाकोरीत काम करावे लागत असे. महाराने कोणती कामे करावीत याची निश्चित नियमावली नव्हती. किंबहुना ती अनिश्चितच ठेवण्यात आलेली होती. १८७४ च्या वतन ॲक्टमध्ये महारांच्या कामाच्या कलमामध्ये बदल

करण्यात यावा अशी सूचना करण्यात आली होती. परंतु ती मान्य करण्यात आली नाही. अमानवी सर्व कामे त्यांनाच करावी लागत. ह्या अन्याय पद्धतीतून महार वतनासंबंधीचे बील मांडावे असा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मनात आला. हे बील प्रामुख्याने तत्कालीन मुंबई प्रांतातील दख्खनचे महार, गुजरातमधील वेठीया, कर्नाटकमधील रामोशी, जागले, व्होलिया यासंबंधी होते. १९/३/१९२८ ला हे बील मांडण्यात आले व १६/४/१९२८ च्या बॉम्बे गर्व्हमेंट गॅझेटमध्ये प्रसिद्ध करण्यात आले.[२१] महार वतन बील पास झाल्यानंतर होणारे फायदे कोणते? हे ही ते सांगतात.

१. वतनी जमिनी इतर कोणत्याही सावकारास कोणत्याही प्रकारे घेता येणार नाहीत.
२. ज्यांच्या वतनी जमिनी इतर जातीच्या लोकांनी घेतल्या असतील त्या महारांना कायद्याने परत मिळतील.
३. ज्या महारांना बलुते संदर्भात पगार हवा असेल त्यांना सरकारातून पगार मिळेल.
४. कामाचे तास निश्चित होतील.
५. करावयाच्या कामांची नियमावली ठरेल.
६. पुर्ण कुटूंबाला राबवण्यात येते त्या ऐवजी त्या कुटूंबातील किती जणांनी काम करावे हे ठरेल.
७. ज्या महारांना जनतेचे काम करण्याची इच्छा नसेल त्यांना वतन न बूडवता तसे करता येईल.
८. ज्या महारांना सरकारचे काम नको आहे त्यांना वतन न बुडवता तसे करता येईल.

थोडक्यात महार वतन ही जातीव्यवस्थेतील एक दास्यत्त्वाची व्यवस्था होती. त्यातून त्यांची सुटका करणे म्हणजेच 'महार वतन बिल' होय. जमीनीच्या छोट्या तुकड्यासाठी आणि शिळ्या अन्नासाठी वतनाचा लोभ ठेवणे यामुळे अनेक पिढ्या गुलामीच्या व दास्यत्वाच्या जोखडाखाली जीवन जगत आहेत याची जाणीव पहिल्यांदा या बिलामुळे झाली. सामाजिक चळवळीतील अत्यंत महत्वाचे पाऊल म्हणून याचा उल्लेख करता येईल. कुणीही त्यांचा वापर करून

घ्यावा आणि सांगेल ते काम त्यांनी करावेच असा धर्माचा आधार घेऊन जो नियम करण्यात आलेला होता त्या विरोधात ही मोठी क्रांती होती. रयतेची आणि सरकारची कामे करूनही त्यांना रयत देईल तेवढेच बलुते घ्यावे लागत असे. अशा व्यवस्थेमध्ये पिचूनसुद्धा महार वतनी लोक त्यास विरोध करू शकत नव्हते. हा एक समाजव्यवस्थेचाच भाग आहे व तो आपण बदलू शकत नाही अशा समजूतीतून महार हे सर्व सहन करत होते. जागतिक पातळीवर शोषणाच्या अनेक सामाजिक व्यवस्था आहेत. त्यातील सर्वात भयंकर अशी महार वतन ही व्यवस्था होती. यातून या समाजाला सोडवण्याचा निर्धार या बिलातून स्पष्ट होतो. महार वतन या विधेयकामुळे शोषण व दास्यत्वाचे जीवन जगासमोर आले. या प्रश्नावर अधिक वेगाने चर्चा सुरू झाली.

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात महार वतने खालसा केली होती. याबद्दल बहिष्कृत भारत मधील एका अंकामध्ये असे म्हटले आहे, 'शाहू छत्रपती महाराज यांच्यासारखा सखा स्पृश्यांना पूर्वी कधी लाभला नव्हता आणि पूढे लाभेल की नाही याबद्दल आम्हाला शंका आहे. तथापि, त्यांना कळून चुकले होते की, वतनामुळेच महारांची अधोगती झाली. आणि म्हणूनच त्यांनी कोल्हापूर संस्थानातील महार वतने जबरदस्तीने खालसा के ली. तेव्हा कोल्हापूर संस्थानातील महार प्रजेने त्यास विरोध के लाही होता. काहीही झाले तरी अज्ञ जनताही जुन्या परंपरेने आंधळी झालेली असते. हातचे मग ते कितीही अल्प असो सोडून पळत्याच्या पाठीमागे ते कितीही मोठे असो, लागणे हा धाडसी खेळ जनता कधी सहसा खेळत नाही.'[२२]

२६ व २७ नोव्हेंबर १९२७ रोजी सोलापूर जिल्हा वतनदार महार परिषदेचे दुसरे अधिवेशन सोलापूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. या परिषदेचे स्वागताध्यक्ष जीवाप्पा ऐदाळे हे होते. या परिषदेत असा ठराव करण्यात आला की, 'डॉ. आंबेडकर बाबासाहेब यांनी महार वतनात सुधारणा करण्याच्या दृष्टीने जे बिल आणले आहे त्या बिलासही वतनदार महार परिषद आपला पूर्ण पाठिंबा देते.' हा ठराव शेठ माणिकचंद शहा यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आलेल्या सभेत मांडण्यात आला. ठराव श्री हरीभाऊ तोरणे यांनी मांडला त्यास गो.गो.कांबळे यांनी अनुमोदन दिले. भिमातात्या

वेसकर आणि निवृत्ती बंदसोडे यांनी पुष्टी दिली. या परिषदेत काही ठराव पास करण्यात आले.[२३] ते जसेच्या तसे या ठिकाणी देणे आवश्यक वाटते.

१. सोलापूर जिल्ह्याकरीता एक संघ स्थापन करण्यात आला. या संघाचे चालकत्व पुढील लोकांच्यावर सोपवण्यात आले.

- सोलापूर तालुका : विश्वनाथ मेघाजी बंदसोडे
- पंढरपूर तालुका : बापू ऐलुनी सर्वगोड
- करमाळा तालुका : गोविंद गोपाळ कांबळे
- माळशिरस तालुका : तात्याबा पांडुरंग सावंत
- सांगोला तालुका : चोखा शिदु काटे
- माढा तालुका : पिराजी मरीबा सरवदे
- बार्शी तालुका : सखाराम म्हादु बोकेफोडे
- सोलापूर शहर : जीवाप्पा सुभानराव ऐदाळे
- सेक्रेटरी : हरीभाऊ तोरणे

२. ही परिषद हिंदू धर्माधिकारी वर्गास असे सूचवते की, त्यांनी प्रचलित चातुर्वर्ण्यांची कल्पना सोडून हिंदू समाजाचा एक वर्ण होईल अशा प्रकारची पुर्नघटना करण्याचे कार्य त्वरित हाती घ्यावे. या बाबतीत दिरंगाई अगर कसूर झाल्यास चातुर्वर्ण्याच्या चौकटीत सापडून चिरडून गेलेल्या अस्पृश्य वर्गास आपली सुटका करून घेण्यास धर्मांतर करावे की काय, याचा विचार करावा लागेल.

३. या परिषदेचे असे मत आहे की, श्रीक्षेत्र पंढरपूर येथील श्रीविठोबाच्या देवालयांत प्रवेश होईल अशी व्यवस्था अस्पृश्य वर्गांनी करावी व प्रसंग पडल्यास येथे सत्यागह ही करण्यात यावा.

४. सोलापूर पंढरपूर वगैरे म्युनिसिपालिटीच्या गावी आणि जिल्ह्यांतील रातंजन, कारी, देगांव वगैरे गावी महारांच्या मालकीच्या जागा गावठाणामध्ये सामील करण्यात आल्या आहेत त्यामुळे महारांचे अतिशय नुकसान झाले आहे. तरी जिल्ह्याच्या कलेक्टरांस या बाबतीत फेर चौकशी करण्याची ही सभा विनंती करते.

५. या जिल्ह्यांत ज्या गांवी महारांना वतनी इनाम जमिनी नाहीत अशा गावच्या महार लोकांना त्यांच्या गावी जर पडिक अगर फॉरेस्ट जमिनी असतील तर त्या जमिनी त्यांना वतन इनाम म्हणून देण्यात याव्या.

६. बेलापूर, माचणूर, राळेरास, पानगाव, चिखर्डे, कासेगांव, चाकु रे, शिखावी, मेडद, दहिंगांव, भांबुर्डी, रातंजन, सुरडी, गुरसाळे (ता. माळशिरस), लोणंद या गावात पाटील कुलकर्ण्यांच्या चिथावणीवरून रयत लोकांनी कट करून महारांना गावातून हाकू न देण्याचा घाट घातला आहे, तरी सदरहुन गांवात होत असलेल्या जुलमाची चौकशी सरकारने करून महारांचे संरक्षण करण्यास योग्य तो उपाय योजावा, अशी या संस्थेची आग्रहाची विनंती आहे.

७. या जिल्ह्यांत ज्या गांवी महारांना वतनी इनाम जमिनी नाहीत अशा गांवच्या महार लोकांना त्यांच्या गावी जर पडीक अगर फॉरेस्ट जमीनी असतील तर त्या जमिनी त्यांना वतन इनाम म्हणून देण्यात याव्या.

८. या सोलापूर जिल्हा वतनदार महार परिषदेचे असे मत आहे की, जिल्ह्या जिल्ह्यांतील महार लोकांनी आर्थिक गुलामगिरी नाहीशी करण्यासाठी व त्यांचा संसार अधिक सुखमय व्हावा म्हणून प्रत्येक जिल्हा वतनदार महार संघाने सहकारी मंडळे स्थापन करून सुत कातणे व कापड विणणे या कामांचा प्रसार करण्याची व सहकारी शेतकी वसाहती स्थापन करण्याची शक्य तितक्या लवकर व्यवस्था करावी.

९. या सभेची सरकारला अशी विनंती आहे की, फॉरेस्ट जमिनी इतर वर्गाच्या लोकांना देण्यापूर्वी अस्पृश्यांच्या अर्जाचा विचार प्रथम करण्यात यावा व जर ज्या अटींवर फॉरेस्ट जमिनी देण्याचे ठरले असेलत्या अटी अस्पृश्य वर्गातील माणसास कबूल असतील तर इतर जातींतील अर्जदारास न देता त्या अस्पृश्य वर्गातील अर्जदारासच देण्यात याव्या.

**खोती पद्धत :**

खोती पद्धती नष्ट करण्यासाठी त्यांनी एक विधेयक मांडले. हे ही त्यांच्या सामाजिक क्रांतीतील एक धाडसी व अत्यंत विचारी पाऊल होते. बहिष्कृत वर्ग, मग तो समाजाचा कोणताही घटक असो, त्यांचे आयुष्य सूकर करणे यासाठी ते प्रयत्नाची पराकाष्ठा करीत होते. असाच एक प्रश्न खोती पद्धतीचा

होता. मुंबई प्रांतात त्यातूनही ठाणे, कु लाबा आणि कोकणामधील काही भागात खोती ही पद्धत होती. खोती जमीनदारीचाच एक प्रकार होता. खोत हे अधिकारी असत. यांच्या अधिकारात काही जमीनी असत. या अधिकारातील जमीनी शेतकरी कसत असत आणि त्या बदल्यात या खोतांना महसुल देत असत. या महसुलातील काही हिस्सा खोत सरकारी तिजोरीत जमा करीत असत. या पद्धतीमध्ये जमीन महसूल खोत स्वतः गोळा करत असत. त्यामुळे कसणारा शेतकरी आणि सरकार यांचा प्रत्यक्ष संबंध कधीच येत नसे. हाच जमीनदारीचा प्रकार होता. सरकार व कसणारा शेतकरी यांच्यातील मध्यस्थ अशी खोतांची भूमिका असावयास हवी परंतु या खोतांनी हा जमीनदारीचाच प्रकार के ला आणि यातून पिळवणूक मात्र वाढत गेली. शेतसा-यांमधील ठरवून दिलेली रक्कम सरकारी तिजोरीमध्ये जमा झाल्यानंतर शेतक-यांशी त्यांचे वर्तन कसे असे याची ना सरकारला माहिती असे, ना जनतेला. मात्र यात शेतकरी भरडून निघत असे. खोतांना असलेल्या या स्वातंत्र्याचा त्यांनी खूप मोठ्या प्रमाणात दुरुपयोग केला होता. शेवटी परिणाम असा होत असे की, शेतक-यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची होत असे. या अन्यायाला वाचा फोडणे हे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. शेतक-यांची खोतांनी के लेली ही भीषण अवस्था इतकी पराकोटीला गेली की, हा अन्याय सहन न होऊन शेतक-यांनी तीन खोतांना ठार मारले. या पार्श्वभूमीवर शांततेचा भंग होण्याची भीती समाजामध्ये निर्माण झाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर अन्याय सहन करण्याच्या विरोधात जरुर होते परंतु हत्या करण्याच्या बाजूचे कधीही नव्हते. त्यांनी नेहमीच न्यायाची बाजू मांडून त्यास कायद्याचा आधार दिला. तसेच या खोती पद्धतीतही त्यांनी के ले. कोकणातील खोती नष्ट करण्यासाठी त्यांनी मुंबई विधी मंडळासमोर १७ सप्टेंबर १९३७ रोजी एक विधेयक मांडले. शेतजमीनी कसणा-या कु ळांची गुलामगिरी नष्ट करण्याच्या हेतूने प्रांतिक मंडळाच्या ह्या नव्या मनूत आंबेडकर हे अशा त-हेचे विधेयक मांडणारे विधिमंडळाचे पहिले सदस्य होते.[२४] खोती नष्ट होऊन कुळांना जमिनीचा अधिकार मिळावा हा विधेयकाचा हेतू होता. तसेच खोतांचे स्वामीत्व नष्ट झाल्यामुळे त्यांचे झालेले नुकसान योग्य ती रक्कम देऊन त्याची भरपाई करावी आणि कुळांच्या ताब्यात

असलेली जमीन त्यांच्याच मालकीची व्हावी असाही हेतू होता. ब्रिटिश शासनाने हा प्रश्न रेंगाळत ठेवला होता. या विधेयकाने महाराष्ट्रात खूप मोठी जागृती झाली. खोतांनी आंदोलन उभारले. बहिष्कृत वर्गास पाणी देण्यास नाकारणे, सामाजिक बहिष्कार टाकणे, त्यांच्यावर हल्ले करणे, असा ही दमन शक्तीचा वापर झाला. खोती पद्धतीच्या अंताचे विधेयक सादर करून शेतकर्यांच्या शोषणाला वाचा फोडण्याचा त्यांचा हा प्रयत्न असला तरी खोतांना सुद्धा वाजवी स्वरूपाची नुकसान भरपाई हे विधेयक पास झाल्यानंतर देण्यात यावी अशी ही तरतुद त्यांनी यामध्ये सुचवली होती. याचाच अर्थ समाज व्यवस्थेमध्ये होत असलेल्या दास्यत्व, गुलामगिरी यांची मुळ कारणे शोधून समाज व्यवस्थेवर आणि अनिष्ठ रुढींवर त्यांनी हल्ला के ला. परंतु यातही मानवतावाद हे तत्व जपले. हेच यातून दिसून येते. खोती अंताविषयी समाजात त्यांनी जाणिव निर्माण के ली. आणि आपला हक्क मिळेपर्यंत लढत राहिले पाहिजे ही जिद्दही निर्माण के ली. शेवटी ब्रिटिश शासनाला १९४१ मध्ये खोतीपद्धती नष्ट करावी लागली. स्वातंत्र्यानंतरसुद्धा जमीन सुधारणा कायदे जे स्वतंत्र भारत सरकारने के ले त्याचे बिज या विधेयकामध्ये आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

कारण भारतीय शेती प्रश्नांवर त्यांचा अभ्यास मूलगामी स्वरूपाचा होता. १९१८ मध्ये भारतीय शेतीसंबंधी त्यांनी एक लेख प्रकाशित केला होता. त्यामध्ये त्यांनी ही परिस्थिती सविस्तर घेतली होती. या लेखामध्ये शेतीविषयक काही मूलभूत प्रश्न त्यांनी उपस्थित के ले होते. त्यातूनच खोती अंताचे विधेयक त्यांनी मांडले होते. १९१८ मध्ये त्यांनी के लेला अभ्यास हा खोती अंताचे विधेयक, खोती निर्मूलन आणि स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जमीन सुधारणा कायदा यांची नांदी होती.

शेतक-यांच्या प्रश्नांवर देखील चिंतन करून त्यांच्यासाठी चळवळी उभ्या करण्यासाठी त्यांनी स्वतःला झोकून दिले होते कारण त्यांना भारतातील शेतक-यांच्या समस्या आणि शेतीचे प्रश्न संपवायचे होते. म्हणूनच त्यांनी शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक करणे गरजेची असून त्यावरील वाढत्या लोकसंख्येचा बोजा इतर क्षेत्राकडे वळविण्याचा आग्रह धरला होता. स्वातंत्र्योत्तर काळात शेती व शेतक-यांचे प्रश्न अधिकच वाढलेले दिसून येतात. वर्तमान अधिक भयंकर होत आहे.

यापुढे तरी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार शेती व शेतकरी यांचे प्रश्न सोडविण्यासाठी समजून घेण्याची गरज वाटली पाहिजे. सामान्य छोटे शेतकरी, शेतीवर राबणारे सालदार, शेतमजूर यांचे जीवन अजुनही कष्टप्रद आहे. खोट्या प्रतिष्ठेच्या भ्रमात वावरणारे आणि परिवर्तनाच्या चळवळीचा संबंध नसलेले राजकीय नेतृत्त्व असा विसंगत मेळ आज दिसून येत आहे. विविध योजना आल्या; परंतु शेतक-यांचे शोषण मात्र काही कमी झाले नाही. सत्ता व साधने ही सधनांच्या हाती गेली. शेवटी सामान्य शेतक-यांच्या प्रश्नांची गुंतवळ वाढली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शेतकरीविषयक विचारांची गरज वाटेल त्यादिवशी 'शेतक-यांचा आसुड' ते शेतक-यांच्या आत्महत्त्या होण्याचा हा प्रवास थांबेल.[२५]

**३.७ महाडचा सत्याग्रह (२० मार्च १९२७) :**

बहिष्कृत समाजाला नैसर्गिक मानवी अधिकार व हक्क प्राप्त करून देण्याच्या क्रांतिकारक लढ्यातील एक टप्पा म्हणजे महाडचा सत्याग्रह होय. या सत्याग्रहामुळे अस्पृश्यांमध्ये चैतन्य तर निर्माण झालेच परंतु सर्वात महत्त्वाचे म्हणजे संघर्षासाठी त्यांची तयारी झाली. कारण आता त्यांना हक्काची भाषा समजू लागली होती. जाती संघर्षाच्या लढाईमध्ये लोकशाहीच्याच मार्गाने संघर्ष कसा करावयाचा याची जाणीव झाली होती. मतपरिवर्तन व मनपरिवर्तन झाले होते. कारण महाड सत्याग्रह समतेच्या लढाईतला एक भाग होता. याबाबत जागृती झाली होती. शतकानुशतके लादलेल्या दास्यत्वातून मुक्त होण्यासाठी आपल्याला संघर्षच करावा लागणार आहे याची त्यांना आता खात्री वाटू लागली होती. त्यांच्या स्वाभिमानाचा सूर्य या सत्याग्रहामुळे अधिकच दैदिप्यमान झाला होता असे म्हणावयास हरकत नाही. कारण याच सत्याग्रहाने अधिक व्यापक स्वरूप चळवळीला प्राप्त झाले आणि न्युनगंडातून बाहेर पडून हा वर्ग प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणात हक्क व अधिकाराची भाषा जाणू लागला होता.

मागील प्रकरणात उल्लेख केल्याप्रमाणे १९२४ मधील 'बहिष्कृत हितकारिणी सभा' ही संघटना स्थापन करून बहिष्कृत समाजाच्या प्रगतीचा संघटनात्मक मार्ग त्यांनी पत्करला होता. महाडचा सत्याग्रह जो झाला त्यास कारणीभूत असलेली महत्त्वाची घटना म्हणजे सी.के .बोले यांनी ४ ऑगस्ट १९२३ रोजी

मुंबईतील कायदेमंडळात पाणवठे, धर्मशाळा, न्यायालये इत्यादी सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांना मुक्त संचार असावा असा ठराव मांडला व पास करून घेतला होता.[२६] या ठरावानुसार महाड नगरपालिकेने तेथील चवदार तळे अस्पृश्यांना खुले करण्याचा ठराव पास केला होता. जेव्हा अस्पृश्य त्या ठिकाणी पाणी भरण्यास गेले तेव्हा उच्चवर्णियांनी त्यांना विरोध केला. म्हणून त्या तलावावर सत्याग्रह करण्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ठरवले. म्हणूनच १९ व २० मार्च १९२७ रोजी त्यांच्याच अध्यक्षतेखाली होणा-या या महाड परिषदेला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

खरे तर कोणतेही पाणवठे, मंदिरे इत्यादींचा वापर करण्यास किंवा सार्वजनिक ठिकाणी प्रवेश असण्यास प्रत्येकाचा अधिकार असला पाहिजे. महाड येथील या तळ्यातील पाणी हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन जाती धर्माचे लोक त्याचबरोबर पशु-पक्षी, जनावरे यांनाही वापरण्याची मुभा होती. फक्त अस्पृश्यांना मनाई होती. भारतीय वर्णव्यवस्था व जातीव्यवस्थेतील हे अत्यंत कलंकीत पान होते. मानवाची प्रतिष्ठा राखण्यासाठी या ठिकाणी सर्वांना प्रवेश असणे आवश्यक आहे व मानव म्हणून सर्वांचाच अधिकार आहे. या विचाराने हा सत्याग्रह करण्यात आला. भारतीय सामाजिक क्रांतीतील रक्तविहीन क्रांती करण्याचा हा मोठा प्रयत्न होता. अनेक शतकापासून अनिष्ठ रुढी व परंपरांमध्ये पिचलेला अस्पृश्य समाज, गुलामगिरीत दबलेला अस्पृश्य समाज, माणूसकीची वाट शोधत होता ती या सत्याग्रहाने या समाजाला दिली.

कोकणातील बुद्धिवान आणि कडव्या निष्ठावान लोकांनी मानवी स्वातंत्र्याचे रणशिग फुंकले तर लढा पेटणार हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जाणून होते.[२७] कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेच्या आयुक्तांनी परिषद यशस्वी करण्यासाठी खेड्या-पाड्यातून प्रचार केला. अडीच हजार ते तीन हजार लोकांनी यात सहभाग घेतला होता. महाड येथील विरेश्वर थिएटरमध्ये ही परिषद भरली होती. परिषदेत सीताराम पंत, शिवतरकर, गंगाधर सहस्त्रबुद्धे, अनंतराव चित्रे, भा.कृ. गायकवाड, रामचंद्र मोरे इत्यादी मंडळी उपस्थित होती. स्वागताध्यक्ष म्हणून संभाजी तुकाराम गायकवाड तर अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे होते. डॉ.आंबेडकरांनी येथील भाषणात म्हटले होते, ‘आपल्याला दुस-यांच्या उष्ट्या

खरकट्यावर जगण्याची सवय झाली आहे ती सोडून द्या. सर्व गलिच्छ कामे सोडून द्या. इतरांसारखी शेती करा. तसेच पांढरपेशा पत्करा.'[२८] ते पुढे असे म्हणतात, 'आपण सुरू केलेल्या या संघर्षाला एक अर्थ आहे. सत्याग्रह कमिटीने आपणास महाडला बोलाविले आहे. ते महाडच्या चवदार तळ्याचे पाणी पिण्यासाठी नाही या तळ्याचे पाणी प्यायल्याने आम्ही अमर होऊ असे नव्हे; आजपर्यंत या तळ्याचे पाणी प्यायलो नाहीतर तुम्ही आम्ही मेलो नव्हतो. चवदार तळ्यावर जावयाचे ते केवळ पाणी पिण्यासाठी नाही. इतरांप्रमाणे आम्हीही माणसे आहोत हे सिद्ध करण्याकरता त्या तळ्यावर आपल्याला जायचे आहे म्हणजेच ही सभा समतेची मुहूर्त मेढ रोवण्यासाठी बोलावली आहे हे उघड आहे.'[२९] या भाषणात त्यांनी जो संदेश आपल्या बांधवांना दिला त्याचा सारांश पुढीलप्रमाणे सांगता येईल. आपण अस्पृश्य आहोत त्यामुळे आपली लोटीबंदी व भेटीबंदी गेली एवढेच पुरेसे आहे. वर्णव्यवस्थेशी आपला संबंध नाही. ती तशीच राहिली तरी आपली हरकत नाही असा समज आहे. तो चुकीचा आहे. मनुष्यमात्राच्या उद्धारासाठी प्रयत्नांची जरुरी असते. तशीच इच्छेचीही जरुरी असते. इच्छेशिवाय प्रयत्न सफल होत नाहीत. त्यामुळे जितका प्रयत्न मोठा तितकी इच्छाही मोठी असावी लागते. इच्छा पूर्ण होण्यासाठी यश मिळेल की नाही याचे भय वाटण्याचे कारण नाही. तसेच अपयश आले तरी लाज वाटण्याचे कारण नाही. अस्पृश्यता निवारणासाठी केवळ भेटीबंदी लोटीबंदीसारख्या लहान इच्छा ठेवून चालणार नाही तर वर्णव्यवस्थेवरच घाला घातला पाहिजे. असा अत्यंत मोलाचा संदेश त्यांनी दिला होता. या महाडच्या संघर्षास ते धर्मसंगर असे संबोधन देतात. अस्पृश्य हे स्पृश्यांच्या बरोबरचेच आहेत. त्यांना मानवतावादी दृष्टीकोनाने अधिकार दिले पाहिजेत. आजपर्यंत झालेले धर्मसंघर्ष हे दोन धर्मातील होते. परंतु हा संघर्ष एकाच धर्मातील दोन समूहामधील आहे. पाश्चिमात्य देशांमध्ये सामाजिक समता हे मूल्य प्रस्थापित झालेले आहे. मतदानाच्या हक्कामुळे राजकीय समताही स्थापन झालेली आहे. ही समानता भारतात ही सुरू करणे आवश्यक आहे.

दोन दिवस झालेल्या या परिषदेमध्ये पहिल्या दिवशी दिवसभर डॉ.बाबासाहेब आंबेडकर, संभाजी गायकवाड व इतर नेत्यांची भाषणे होऊन पहिल्या दिवसाचे

कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

दुस-या दिवशी म्हणजे २० मार्च १९२७ रोजी १० ठराव मांडण्यात आले. व मंजूर करण्यात आले.[३०] या परिषदेमध्ये पुढील ठराव पास करण्यात आले.

१. बहिष्कृत वर्गांनी चालवलेल्या आत्मोद्धाराच्या चळवळीमुळे सामाजिक तेढ उत्पन्न होऊ नये अशी वरिष्ठ वर्गातील हिंदूंची इच्छा असल्यास ही परिषद पुढील सूचना करीत आहे.

• सार्वजनिक स्थळे व पाणवठे यांचा उपयोग करून नागरीकत्वाचे हक्क बहिष्कृत वर्गातील लोक मिळवत असतील तर वरिष्ठ वर्गातील लोकांनी त्यांना सक्रिय सहकार्य करावे.

• वरिष्ठ वर्गातील लोकांनी बहिष्कृतास घरगुती नोकर म्हणून नोकरीस ठेवावे.

• मिश्र विवाह पद्धतीचा प्रघात सुरू करावा.

• बहिष्कृत वर्गातील गरीब विद्यार्थ्यांना आपल्या घरी वार लावून त्यांच्या जेवणाची सोय करावी.

२. सरकारने सार्वजनिक विहिरी व तलाव अस्पृश्यांना खुले करून देण्यासाठी त्या ठिकाणी पाट्या लावण्याची व्यवस्था करावी.

३. खेड्यातील अस्पृश्यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करावी.

४. बहिष्कृतांच्या आर्थिक उन्नतीसाठी फॉरेस्ट जमीनी लागवडीखाली द्याव्या.

५. अती मागास बहिष्कृत वर्गांचा आर्थिक दर्जा वाढवण्यासाठी पुढील उपाययोजना कराव्यात.

• अस्पृश्य वर्गातील लोकांनी शक्य असेल तर सरकारी नोक-या द्याव्या.

• लष्कर भरती करावी.

• आरमारी खात्यात भरती करावी.

• सेकंड इयर ट्रेंड मास्तरास शाळा खात्यात सुपरवायजरच्या जागा द्याव्यात.

• साक्षर असलेल्या अस्पृश्यास मुलकी पोलिस दलात भरती करून घेण्यात यावे.

• पोलीस खात्यात अस्पृश्यांची अधिकाधिक भरती करावी.

६. बहिष्कृत वर्गांनी मेलेले मांस खाण्याची चाल सरकारने कायद्याने बंद करावी.

७. शिक्षण व दारूबंदीची सक्ती करावी.

८. शिक्षणाच्या बाबतीत बहिष्कृत समाजाच्या उन्नतीसाठी पुढील गोष्टी आंमलात आणाव्यात.

• शैक्षणिक प्रगतीसाठी चौकशी समिती नेमावी.

• जिल्हा निहाय बोर्डींगे उघडावीत.

• शिष्यवृत्त्या द्याव्यात.

• ३० मुले असलेल्या गावी शाळा उघडावी.

• खाजगी संस्थांनी चालवलेल्या बोर्डिंगास एका मुलापाठी मागेदर महा १० रु. ग्रँट द्यावी.

९. ही परिषद बहिष्कृ त वर्गातील पंचांना व पाटलांना विनंती करते की, मुलांच्या लग्नप्रसंगी पुढील गोष्टी आंमलात आणाव्यात.

• २० वर्षाच्या आतील मुलांची व १५ आतील मुलींची लग्न करण्याची चाल बंद करण्यात यावी.

• शाळा असेल त्या ठिकाणी मुलामुलींना शिक्षणाची सक्ती करावी.

• पुर्नविवाह करण्यापूर्वी उभयता वधु-वरांची योग्य चौकशी केल्याशिवाय पुर्नविवाह लावू नये.

१०. अस्पृश्यांनी महारकी सारखे हलके धंदे सोडून द्यावे व शेतीसारखे स्वतंत्र धंदे सुरू करावेत.

११. शेतीस जरुर असलेल्या सहकारी पतपेढ्या काढाव्यात.

अशाप्रकारे अनेक ठराव या सभेत मांडून मंजूर करण्यात आले. काही महत्वाच्या ठरावांचा यात उल्लेख के ला आहे. यानंतर अध्यक्षीय समारोप झाल्यानंतर शिवराम गोपाळ जाधव यांनी आभार मानले. त्यास दुजोरा देण्यासाठी अनंत विनायक चित्रे यांनी अनुमोदन दिले. व त्यांनी असे सूचवले की, ‘आज जी एवढी मोठी महत्त्वाची परिषद भरली आहे, तिने काहीतरी महत्त्वाचे कार्य के ल्याखेरीज आपले अधिवेशन संपवू नये असे मला वाटते. या महाड शहरात अस्पृश्य लोकांची पाणी पिण्याची अत्यंत गैरसोय आहे. ही गैरसोय दूर व्हावी म्हणून येथील म्युनिसीपालिटीने येथील तळी सर्व जातीच्या लोकांस खुली आहेत

असे ठरावाने कधीच जाहीर करून टाकले आहे. परंतु त्या तळ्यावर पाणी भरण्याचा प्रघात अस्पृश्य लोकांकडून अजूनही सुरू करण्यात आला नाही. तो प्रघात जर आज या परिषदेने पाडून दिला तर या परिषदेने एक मोठी महत्त्वाची कामगिरी बजाविली असे म्हणता येईल. तरी आपण सर्वांनी अध्यक्षांसह महाड येथील चवदार तळ्यात प्रवेश करून पाणी घेऊ. त्यानंतर परिषदेतील सर्व लोक अध्यक्षांच्या मागोमाग सभामंडपातून बाहेर पडून त्या सर्वांची एक मोठी मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक महाड शहरातील पेठेतून अत्यंत शांतपणाने तळ्यावर गेली.'[३१] त्यादिवशी ५००० अस्पृश्य जमावाने समतेचा जयघोष करीत चवदार तळ्यावर जाऊन पाणी प्याले. त्यानंतर परिषदेची सांगता करण्यात आली. परिषद संपल्यानंतर सर्वजण सरकारी बंगल्यावर गेले काही लोक आपापल्या गावी गेले. काही वेळाने विरेश्वराच्या देवळातील गुरव अस्पृश्य लोक देवळात शिरणार आहते तरी देवळाचे रक्षण करण्यास चला अशी खोटी दंवडी गावात पेटवत सुटला. वरिष्ठ लोकांच्या हाती हे निमित्त मिळाले. चार पाचशे लोक विरेश्वराच्या देवळात काठ्या घेऊन जमा झाले. देवळात अस्पृश्य लोक शिरणार आहेत असा गोंगाट करू लागले. त्यावेळी शहर फौजदार डाक बंगल्यावर आले व त्यांनी डॉ.आंबेडकरांना विचारले, 'आपले लोक देवळात शिरणार आहेत त्यामुळे शहरातील लोकांनी गर्दी केली आहे तर आम्ही त्यांना काय सांगू...' यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर त्यांना म्हणाले, 'आम्हाला देवळात शिरण्याची इच्छा नाही व जरुरीही नाही. तुम्ही लोकांची याबाबत खातरजमा करून त्यास शांत करावे. त्यानंतर परिषदेत आलेले लोक आपापल्या गावी गेल्यानंतर देवळाजवळ जमलेल्या गावगुंडांनी घरोघरी जात असलेल्या अस्पृश्यांवर हल्ला केला. महाडचे मामलेदार यांनाही गर्दी आटोक्यात आणता येईना. शेवटी ते डाक बंगल्यावर आले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना म्हणाले 'आपण शांतता राखण्यास आमच्या बरोबर चला. तुमच्या लोकांस तुम्ही समजवा. आमच्या लोकास मी समजावतो.' खरे तर जमलेल्या अस्पृश्य लोकांच्या अफाट जनसमूहाची शांतता मोडली नव्हती तरीही डॉ.बाबासाहेब आंबेडकर त्यांच्याबरोबर गेले ज्या अस्पृश्य लोकांची समजूत घालण्याकरीता त्यांना नेण्यात आलेले होते त्यापैकी एकही अस्पृश्य तेथे नव्हता. डॉ. आंबेडकर डाक

बंगल्यावर परत आले त्यावेळी त्याठिकाणी सुमारे १०० अस्पृश्य लोक जमलेले होते. त्यात काही जखमी झालेले होते. तोपर्यंत दंगलीचा शेवट रक्तपातात झाला. याची कोणास कल्पनाही नव्हती. सर्वांना हॉस्पिटलमध्ये नेण्याची सोय करण्यात आली. व पोलिस चौकीवर फिर्याद करण्यात आली. पुरावा गोळा करणे अत्यंत कठीण होते. वरिष्ठ वर्गातील लोक कटाने वागत असल्यामुळे खरे सांगण्यास कोणी पुढे येत नव्हते. अस्पृश्य लोक भीतीने कुणाचीही नावे सांगण्यास पुढे येत नव्हती. यानंतर महाडचे तळे अस्पृश्यांनी बाटवले. तुमच्या विहिरी तरी सांभाळा अशा प्रकारचे लेखी संदेश वरिष्ठ वर्गातील लोक एकमेकांना पाठवू लागले. परंतु या महाड परिषदेचा शेवट हा अशा प्रकारच्या दंगलीनेच झाला.३२ बहिष्कृ त भारतच्या ६ मे १९२७ च्या अंकात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी इंग्रजांच्या जबाबदारीविषयी मत व्यक्त के ले आहे. ते असे म्हणतात, अस्पृश्य लोक तळ्यावर गेले त्यात त्यांनी कोणत्याच प्रकारचा अतिक्रम केला असे म्हणण्यास कायद्याचा आधार नाही. विरेश्वराच्या देवळात जरी ते गेले असते तरी ते बेकायदेशीर झाले नसते. उलट अपराध आहे तो स्पृश्य लोकांचा त्यांना कोणताच कायदेशीर हक्क नसताना त्यांनी अस्पृश्य लोकांना विरोध के ला. हाच बेकायदेशीरपणा आहे. म्हणून बेकायदेशीर कृत्य करणा-या लोकांच्या त्रासापासून त्यांचे रक्षण करण्याचे व मदत करण्याचे सरकारचे आद्यकर्तव्य आहे. जर सर्व शक्तीमान अशी संस्था सरकार कर्तव्य परड्.मुख झाली तर समाजाच्या अस्तित्त्वास धोका पोहोचल्याशिवाय राहणार नाही. दंगे मोडण्याचे योग्य उपाय म्हणजे हक्कांसंबंधी निःपक्षपातीपणाने न्याय करणे, न्याय देण्याचे कामी समता व निःपक्षपातीपणा तसेच अंमलबजावणीच्या कामी निग्रह व कडकपणा सरकारच्या अंगी असला पाहिजे. दंगा होऊन शिक्षा होण्यापेक्षा दंगा होऊन देणे महत्त्वाचे आहे.[३३]

### ३.८ मनुस्मृतीचे दहन (२५ डिसेंबर १९२७) :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्त्वाखाली झालेल्या, महाडच्या पहिल्या परिषदेतील सत्याग्रहामध्ये अस्पृश्यांनी सामुदायीकरीत्या चवदार तळ्यात प्रवेश करून आपला मानवी हक्क प्रस्थापित के ला होता. परंतु स्पृश्य सनातनी लोकांनी त्या तळ्याचे शुद्धीकरण करून बहिष्कृत वर्गावर अपवित्रतेचा शिक्का

मारला.[३४] म्हणून दुसरी सत्याग्रह परिषद महाड येथेच २५, २६ व २७ डिसेंबर १९२७ रोजी घेण्याचे ठरविण्यात आले. यानिमित्ताने त्यांनी एक पत्रक काढले होते. त्यात म्हटले आहे. ‘सर्व अस्पृश्य ज्ञाती बंधुस कळविण्यात येते की, तारीख २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड मुक्कामी एक सभा भरविण्याचे ठरले आहे. या सभेस हजर राहण्यास कोणासही वचक वाटण्याचे कारण नाही. तसेच कोणाही सनातन माणसाचा स्वार्थमूलक उपदेश ऐकण्याचे कारण नाही. कारण हा प्रश्न सर्वांच्या माणूसकीचा आहे. इतर स्पृश्य लोकांकडून आपण जन्मतः अपवित्र आहोत. असा जो आपल्यावर कलंक लावण्यात आलेला आहे, तो धुवून टाकायचा आहे.’ यावरून त्यांना आपल्या बांधवांना आपल्यावर लादलेल्या अपवित्रतेचा कलंक धुवून टाकण्यासाठी किती प्रयत्न करावा लागणार आहे याची पुरेपूर कल्पना होती असे दिसून येणार आहे.

या परिषदेमध्ये वर्ण व जातीव्यवस्थेचे समर्थन करणारे स्मृती, पुराणे यामुळे शोषणावर आधारलेली व्यवस्था टिकून आहे. त्याविरोधात कृतीशील कार्यक्रम हाती घेण्याचे ठरले. २५ डिसेंबरच्या रात्री ९ वाजता मनुस्मृती जाळण्याचा ठराव पास करण्यात आला. त्यापूर्वी रस्ते, विहिरी, तलाव इत्यादी ठिकाणी पाणी भरण्यास अस्पृश्यांनाही हक्क असावा. मंदिरे सर्वांसाठी खुली करण्यात यावी अशा आशयाचे अनेक ठराव पास करण्यात आले होते. २५ डिसेंबर मनुस्मृतीच्या दहनाच्या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी परिषदेच्या मंडपासमोर एक खड्डा खणण्यात आला. एका संन्यासाच्या हस्ते मनुस्मृती जाळण्यात आली. उपस्थितांनी टाळ्यांचा गजर केला. घोषणा दिल्या. त्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, ‘चवदार तळ्याचे पाणी आम्हास प्यावयास मिळाले म्हणजे आम्ही अमर झालो असे नाही. आमच्या स्पर्शाने तलावाचे पाणी वाफ होऊन जाते असेही नाही, मुळातच वरीष्ठ वर्गाच्या बरोबरीने आम्ही पाणी पिण्यास सुरूवात करणार हा विचार उच्च वर्णियांना सलत आहे. सामाजिक समता प्रस्थापित होण्याची त्यांना भीती वाटत आहे. गंगाधर निळकंठ सहस्त्रबुद्धे यांनी मनुस्मृतीतील भेद सुचक उतारे वाचून दाखवले. हिंदू धर्मीयांच्या हिंदू धर्माची मदार ही हिंदू पुराणांवर व मंदिरांवर आधारलेली आहे. अस्पृश्यांच्या गुलामगिरीची पकड ज्यामुळे आहे त्या मनुस्मृतीची होळी करावी लागली.[३५]

## संदर्भ ग्रंथ :


१. मुणगेकर भालचंद्र, डॉ.आंबेडकरांनी केलेली सांस्कृतिक क्रांती, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, संपादक, प्रा.डॉ. नाईकवाडे अशोक, विद्याभारती प्रकाशन, लातूर २०१२ , पृष्ठ-४०

२. प्रा. राऊत उत्तमराव किशोर, डॉ.बाबसाहेब आंबेडकरांच्या चळवळी, संपादक. दाभोळे.ज.रा, ॲड .पंडितराव सडोलीकर गौरव समिती कोल्हापूर, २०१६ , पृष्ठ-५८ -५९

३. कीर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७७ , पृष्ठ-११७

4. Gough E. Kathleen. 1960 Caste in Tanjore Village, in Leach E.R. (edited) 1960 Reprinted 1971, Aspects of caste in south India, Ceylon and North-West Pakistan The syndics of the Cambridge university Press, New York, Page-11

५. वैद्य प्रभाकर, महात्मा फुले आणि त्यांची परंपरा, लोकवाड्.मयगृह, मुंबई २०१६ ,पृष्ठ-५

६. भोळे भास्कर लक्ष्मण, विसावे शतक आणि भारतातील समता विचार, सुगावा प्रकाशन, पुणे, २०१४ , पृष्ठ १२

७. अनुवादक, गांजरे मा.फ.,डॉ. आंबेडकर भि.रा., भारतातील जाती- त्यांची घडण उत्पत्ती व प्रसार, पृष्ठ-१४

८. सुरवाडे विजय, संपादक, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची निवडक भाषणे, लोकवाड्.मयगृह, मुंबई, २०१२, पृष्ठ-६

९. नरके हरी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, द्वितीय आवृत्ती, पृष्ठ-३७६

१०. संपादक- सुरवाडे विजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची निवडक भाषणे, लोकवाड्.मयगृह, मुंबई २०१२ , पृष्ठ-७

११. संपादक- सुरवाडे विजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची निवडक भाषणे,

लोकवाङ्.मयगृह, मुंबई, २०१२, पृष्ठ-६-११
१२. कीर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७७, पृष्ठ-४६
१३. कोसारे.एच.एल., विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास, पृष्ठ-४४
१४. नरके हरी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, द्वितीय आवृत्ती, पृष्ठ-३८२
१५. मून वसंत, नरके हरी, (संपा)- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग-१, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२, पृष्ठ-९
१६. प्रा. निकुंभे.सी.एच., समाज प्रबोधनकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे २००५, पृष्ठ-७१
१७. खरात शंकरराव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे २००९ , पृष्ठ-५५-५६
१८. कांबळे बी.सी., समग्र आंबेडकर चरित्र, लेखक, प्रकाशक, बी.सी.कांबळे, मुंबई, खंड-६ , पृष्ठ-४६
१९. तत्रैव, पृष्ठ -४७
२०. डाहाट धनराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे आणि विचार, संकेत प्रकाशन, नागपूर, खंड-४, पृष्ठ-५०
२१. खैरमोडे चांगदेव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, खंड-२, सुगावा प्रकाशन, पुणे २०१७, पृष्ठ — १२३
२२. नरके हरी, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू (संपा.), बहिष्कृत भारत आणि मूकनायक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, २००८, पृष्ठ-१६७
२३. नरके हरी, बहिष्कृत भारत आणि मूकनायक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, २००८, पृष्ठ -१५२-५३

२४. कीर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००६, पृष्ठ -३२८
२५. लुलेकर प्रल्हाद, अनंत पैलूंचा सामाजिक यौद्धा, सायन पब्लिकेशन्स्, पुणे २०११ , पृष्ठ-३८
२६. कद्रेकर भास्कर रघुनाथ, संपादक, जनता खासअंक, मुंबई १९३३, पृष्ठ-३७
२७. कीर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, १९६६ , पृष्ठ-१६३
२८. खैरमोडे चां.भ.,डॉ.भीमराव रामजी आंबेडकर, खंड-३ , सुगावा प्रकाशन, पुणे १९९० ,पृष्ठ-१८
२९. सुरवाडे विजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची निवडक भाषणे, लोकवाड्.मयगृह, मुंबई, २००३, पृष्ठ-५३
३०. खैरमोडे.चां.ग. भीमराव रामजी आंबेडकर, खंड-३, पृष्ठ-२७
३१. बहिष्कृत भारत, ३ एप्रिल १९२७
३२. बहिष्कृ त भारत, ३ एप्रिल१९२७
३३. बहिष्कृ त भारत, ६ मे १९२७
३४. बहिष्कृ त भारत, १  जुलै १९२७
३५. सहस्त्रबुद्धे जी.एस., संपादक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सुवर्ण महोत्सव, जनता खास अंक, मुंबई, १४ एप्रिल १९४२, पृष्ठ-२४

# प्रकरण सहावे

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक चळवळी

# भाग- २

## ६.१ अंबादेवी मंदिर सत्याग्रह (२७ जुलै १९२७) :

व-हाड प्रांतातील अमरावती येथे श्री अंबादेवीचे पुरातन मंदिर आहे. या मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून तेथील स्थानिक अस्पृश्य लोकांनी १९२५ पासून तेथील पंचकमिटीस विनंती अर्ज केले होते. परंतु पंचकमिटीने त्यांच्या या अर्जावर असा ठराव पास केला की, श्री अंबादेवी संस्थान व एकविरादेवी संस्थान फार प्राचीन असून आजपर्यंत अस्पृश्य दर्शनास आले नाहीत. त्यांना येऊ देण्याने समाजामध्ये प्रक्षोभ उत्पन्न होण्याचा संभव आहे. वर्णाश्रम धर्माप्रमाणे सर्व सनातन समाज चालत आहे. व अस्पृश्यांनीही आपापली देवळे निराळी ठेवली आहेत. व इतर जातींच्या धार्मिक भावना दुखावण्याचा प्रयत्न केला नाही. काशी, पंढरपूर वगैरे मोठमोठ्या क्षेत्रातही अस्पृश्यांना देवळात प्रवेश नाही. पूर्वापार अनेक वर्षे चालत आलेली ही प्रथा मोडून टाकता येत नाही. याबद्दल सभेस दिलगिरी वाटते.[१] २७/०७/१९२७ रोजी अस्पृश्यांनी मंदिरात प्रवेश मिळण्यासाठी पुन्हा मागणी केली. परंतु त्या मागणीसही विरोध करण्यात आला. अमरावती येथील मातंग समाजाचे लोक या सत्याग्रहात भाग घेणार नव्हते. त्यासंबंधीचे पत्रक अमरावती येथे प्रसिद्ध झालेल्या 'उदय' या पत्रामध्ये प्रसिद्ध केले होते. वाड-वडिलांपासून चालत आलेल्या धर्माप्रमाणे आम्ही वागण्यास तयार आहोत अशी इच्छा त्यांनी यात प्रकट केली होती.[२] मातंग समाजाचा या सत्याग्रहास पाठिंबा नसल्यामुळे सत्याग्रहाच्या शक्ती व संख्या बळावर निश्चितच परिणाम झाला. अमरावतीच्या एका सभेत मंदिर प्रवेशाची आपली भूमिका मांडताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. तसे तर उपासनेचे अनेक प्रकार आहेत पण अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश यासाठी पाहिजे की, त्यांना असे सिद्ध करता येईल की, त्यांच्या प्रवेशाने मंदिर भ्रष्ट होत नाही. किंवा स्पर्शाने मूर्ती अपवित्र होत नाही. हिंदूत्वही जितकी स्पृश्यांची मालमत्ता तितकीच अस्पृश्यांची आहे. या हिंदुत्वाची प्राण प्रतिष्ठा जितकी वसिष्ठांसारख्या ब्राह्मणांनी,

कृष्णासारख्या क्षत्रियांनी, हर्षासारख्या वैश्यांनी, तुकारामासारख्यांनी केली तितकीच वाल्मिकी, चोखामेळा व रोहिदास इत्यादी अस्पृश्यांनी केलेली आहे. या हिंदुत्वाचे रक्षण करण्यासाठी हजारो अस्पृश्यांनी आपली माणुसकी खर्ची घातली आहे. हिंदुत्वाच्या नावाखाली उभारलेली मंदिरे जितकी स्पृश्यांची तितकीच अस्पृश्यांचीही आहेत, त्यावर जितका स्पृश्यांचा तितकाच अस्पृश्यांचा वारसा आहे.[३] समताधिष्ठित हिंदू समाज उभा करण्याच्या त्यांच्या आंबादेवी मंदिर प्रवेशाचा प्रयोग योग्य प्रतिसादाच्या अभावी यशस्वी झाला नाही. मात्र बहिष्कृत वर्गास आपल्या हक्काची जाणिव मात्र झाली.

**६.२ पर्वती मंदिर सत्याग्रह (१३ ऑक्टोबर १९२९) :**

महाडच्या सत्याग्रहाची प्रेरणा घेऊन संपूर्ण देशभर अस्पृश्य समाज जागा झाला. समताधिष्ठित समाजाची स्वप्न पाहणा-या व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसारख्या उगवत्या नेतृत्त्वाकडे लक्ष देऊन एक आशेचा किरण त्यांना सापडला होता. १९२९ मध्ये देशात दोन सत्याग्रह झाले. त्यातील एक सत्याग्रह बंगालमधील खुलना येथील कपिल मुनीच्या काली मंदिरात अस्पृश्यांनी प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. त्यात दोन सत्याग्रहींना अटक झाली. दुसरा सत्याग्रह पुणे येथील पर्वतीच्या मंदिरासमोर झाला. पर्वती मंदिर हे अस्पृश्यांच्या प्रवेशास बंद होते. मंदिर कमिटीच्या लोकांचे असे म्हणणे होते की, नानासाहेब पेशवे यांनी स्वतःच्या खाजगी खर्चाने हे मंदिर बांधले आहे. आजपर्यंत सदर देवस्थानात ब्राह्मण नोकर व ब्राह्मण पंच नेमून त्या संस्थांची व्यवस्था आहे. अस्पृश्य लोकांना त्यांना आखून दिलेल्या मर्यादेपलीकडे जाऊन मंदिर भ्रष्ट करण्याची मुभा ठेवलेली नाही. या स्पष्टोक्ती नंतर १३/१०/१९२९ रोजी दुस-या दिवशी सत्याग्रह करण्याचे ठरले. या मंदिरात प्रवेशासाठी अस्पृश्यांचा सत्याग्रह सुरू होणार म्हणून सकाळी सात वाजल्यापासूनच लोकांची गर्दी सुरू झाली. सत्याग्रही लोकांना धमक्या देण्या-या गर्जना निघू लागल्या. आम्ही देवळात घुसू देणार नाही. असे धमकीचे उद्‌गार निघू लागले. चवताळलेले सनातनी सत्याग्रह्यांना लाथाबुक्क्यांनी मारू लागले. अत्यंत बिकट परिस्थिती निर्माण झाली. परंतु सत्याग्रहींनी चिकाटी सोडली नाही. दंग्याचे स्वरूप निर्माण झाले.

मात्र रक्तपात झाला नाही. पर्वती सत्याग्रहास अनेक संघटनांनी पाठिंबा सुद्धा दिला. पंचांनी मंदिराचे दरवाजे बंदच करून ठेवले होते. १३ ऑक्टोबर १९२९ ला सुरू झालेला हा सत्याग्रह २० जानेवारी १९३० ला तहकूब करण्यात आला. तो पुन्हा सुरू झाला नाही.[४] या मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहामुळे अस्पृश्यता निवारण होणार ही तर शक्यता नव्हतीच. परंतु अस्पृश्यता निवारण्या टप्प्यामध्ये एक पाऊल पुढे पडले हे नक्की. या सत्याग्रहाप्रमाणेच नरसोबाची वाडी हे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मंदिर तेथेही ब्राह्मणेतरांनी चळवळ चालवली होती. खटले व मारामारी सुद्धा झाली. परंतु येथे एक गोष्ट सत्कारात्मक अशी घडली. ब्राह्मणांचा पुजेचा हक्क काढून घेण्यात आला. सर्वांना दर्शनाचा अधिकार मिळाला. हा पर्वतीच्या सत्याग्रहाचा प्रभाव होता.

### ६.३ काळाराम मंदिर सत्याग्रह (२ मार्च १९३०) :

नाशिक येथील काळाराम मंदिर हे एक महाराष्ट्रातील प्रसिद्ध मंदिर आहे. १७८२ ला सरदार रंगराव ओढेकर यांनी सुमारे २३ लाख रुपये खर्च करून हे देऊळ बांधले. वनवासात श्रीराम ज्या ठिकाणी राहिले त्या जागी हे देऊळ बांधले असल्याची भाविकांची समजुत आहे. देवळात सुवर्णालंकारांनी मढवलेली रामाची मूर्ती आहे. दरवर्षी निघणा-या रथयात्रेत किमान पाऊण लाख लोक तेथे जमतात. माधवराव पेशवा यांच्या मातोश्री गोपिकाबाई यांनी या देवस्थानास दोन रथ दिले. देवळाच्या भोवती १७ फूट उंचीची भिंत व ३० फूट उंचीवर नगारखाना आहे. उत्तर, दक्षिण, पूर्व व पश्चिम असे चार दरवाजे मंदिरात प्रवेश करण्यासाठी वापरले जातात. त्यापैकी पूर्वेकडचा दरवाजा हे मुख्य प्रवेशद्वार मानले जात असे.[५] या मंदिरातसुद्धा अस्पृश्यांना प्रवेश नव्हता. म्हणून याठिकाणी सत्याग्रह करण्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ठरवले. या सत्याग्रहास काळाराम मंदिर सत्याग्रह असे म्हटले जाते. २ मार्च १९३० रोजी सत्याग्रहास सुरूवात झाली. रामाच्या मंदिरात सत्याग्रह केल्याने इतर मंदिरांच्या प्रवेशाचा प्रश्न सुटेल असे त्यांना वाटले. तसेच पंढरपूर प्रमाणे नाशिक ही दक्षिण भारताची काशी मानली जाते. काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळाला पाहिजे म्हणून आम्ही सत्याग्रह करणार आहोत. अशी नोटीस त्यांनी मंदिराच्या व्यवस्थापकांना दिली होती. २ मार्च १९३० रोजी नाशिक येथील त्यांच्या

अध्यक्षतेखाली सत्याग्रह परिषद भरविण्यात आली. गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक येथून हजारो दलित कार्येकर्ते सहभागी होण्यासाठी आले होते. १५ हजार सत्याग्रहींची जवळपास १ मैल लांबीची मिरवणूक शिस्तबद्ध रीतीने मंदिराच्या दिशेने निघाली. परंतु त्या आधीच मंदिराची संपूर्ण दारे बंद करून पोलिस पहारे सुद्धा सुरू झाले होते. पोलिसांनी मिरवणूक अडवली. म्हणून ही मिरवणूक गोदावरी नदीच्या घाटावर आली. तेथे जाहीर सभा घेण्यात आली. ३ मार्च रोजी सत्याग्रह्यांची पहिली तुकडी ज्यात १२५ पुरुष व २५ महिला होत्या. दरवाजे बंद असले तरी सत्याग्रहींनी धरणे धरलेच. ७ एप्रिलला रामनवमी होती. तोपर्यंत सत्याग्रह चालू होता आणि देऊळ बंद होते.

शेवटी रामनवमी रोजी स्पृश्य व अस्पृश्य दोघांनी मिळून रामाचा रथ ओढण्याचे ठरले. पण अस्पृश्य लोक येण्याआधीच स्पृश्यांनी रथ पळवून नेला. अस्पृश्यांवर दगडफेक झाली. त्यावेळी डॉ.आंबेडकर स्वतः तेथे होते. काही काळ हा सत्याग्रह स्थगित ठेवला आणि पुन्हा सुरू केला. १९३५ पर्यंत हे आंदोलन चालू राहिले. परंतु तरीही हे मंदिर अस्पृश्यांसाठी खुले झाले नाही.[६] काळाराम मंदिर सत्याग्रहाबाबतचे वृत्त देताना ८०० शिख यात्रेकरू सत्याग्रहात सामील झाल्याचे टाईम्स ऑफ इंडियाने म्हटले आहे. त्यांना २०० बिल्ले देण्यात आले होते. त्यांनी १५ रुपये सत्याग्रह निधीला दिले होते.[७] परंतु पुढच्याच अंकात आपल्या वार्ताहाराच्या या अंकाचा इन्कार टाईम्सने केला. सच्च्या शिखाला हिंदू मंदिरात जाण्याचे काहीच कारण नसते असे यात म्हटले आहे.[८] कोहिनूर या वृत्तपत्राच्या अंकामध्ये एक उल्लेख देण्यात आलेला आहे. तो महत्त्वाचा आहे. त्यामध्ये लिहिले आहे की, दि.७ एप्रिल १९३० रोजी अनेक अस्पृश्य मंदिरात गेले. या दिवशी रामनवमी होती. मंदिरात राम जन्माच्या वेळी सहा अस्पृश्य तरुण आत बसले असताना त्यापैकी दोन इसमांना जात विचारताच त्यांनी महार म्हणून उत्तर दिले. त्यांना पोलिसांच्या स्वाधीन करण्यात येऊन त्यांची नावे लिहून घेतले. सत्याग्रही सखाराम तात्याबा जाधव व रामचंद्र गवळे ही त्यांची नावे आहेत. त्यांना सोडून देण्यात आले. एका अस्पृश्य मुलीस पुजा-याने मागे लोटताच तिने पुजा-याच्या थोबाडीत मारली.[९] ७ एप्रिल रोजी आपल्या दोनशे बांधवांना घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुजा-याच्या घराजवळून गेले.

९ एप्रिलला रथयात्रेच्या वेळी अस्पृश्यांना धडा शिकवायचा असा निर्धार मंदिर प्रवेश प्रतिबंधक समितीने के ला. आत्मसंरक्षणासाठी आपल्याला प्रतिउत्तर देण्याचा हक्क आहे अशी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका होती. स्पृश्यांनी रथ अस्पृश्यांना न घेता पुढे नेला म्हणूनच रणपादुकांजवळ तो रथ अस्पृश्यांनी अडविला. पर्यावसन मारामारीतच झाले. परंतु याचा उपयोग झाला नाही. ९ एप्रिलच्या या दंगलीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जखमी झाल्याचे वृत्त टाईम्स ऑफ इंडियाने दिले.[१०] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबईस जावून गृहमंत्र्यांची भेट घेतली. अरनेस्ट हॉस्टन हे गृहमंत्री होते. हॉटसन यांनी आपल्या डायरीमध्ये अशी नोंद के ली आहे. जिल्हाधिकार्यांच्या हुकमानुसार निदान काही दिवस आपण सत्याग्रह लांबणीवर टाकू असे शुक्रवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले. सत्याग्रह मागेही घेतील किंवा चालूही ठेवू शकतील.[११]

६ वर्षे काळाराम मंदिर सत्याग्रह त्यांनी चालू ठेवला होता. या काळात कायदा, न्यायसंस्था, पोलिस यंत्रणाही प्रस्थापितांच्याच बाजूने असते याची जाणीव त्यांना या काळात झाली. पुढील चळवळीतील त्यांची वाटचाल विविध स्तरावर जी झाली त्यास या सहा वर्षाचा अनुभव कारणीभूत होता. अस्पृश्यांना मंदिर खुले झाले नाही. रामकुंडातील पाणी काढून तेथे स्नान करण्याचा अधिकार सुद्धा मिळाला नाही. तसेच रथ ओढण्याचा अधिकारसुद्धा काही वर्षे नाकारला गेला. या सगळ्या नकारात्मक बाजू असल्यातरी अस्पृश्यांमध्ये आपल्या हक्कांसाठी जागृती निर्माण करणे आणि त्यासाठी संघर्ष करणे हे शिकण्याचा त्यांचा हेतू मात्र साध्य झाला. या काळात दलित नेत्यांना तुरुंगवास भोगावा लागला. स्त्रियाही तुरुंगात गेल्या. दलित मुक्ती आंदोलनामध्ये हे प्रथमच घडत होते. त्यामुळे दलितांचा आत्मविश्वास नक्कीच वाढला. यानंतर १३ ऑक्टोबर १९३५ रोजी नाशिक जिल्ह्यातील येवला येथे भरलेल्या मुंबई इलाखा दलित परिषदेत त्यांनी एक ऐतिहासिक घोषणा केली, ‘मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही.’ या ऐतिहासिक घोषणेला काळाराम मंदिर या सत्याग्रहाची पार्श्वभूमी होती.

‘अस्पृश्यांना माणूस म्हणून मान्यता द्या व या सत्यांना समानता, बंधुता, स्वातंत्र्य व न्याय देण्यास स्पृश्य हिंदू तयार नव्हते. अस्पृश्य वर्गामध्ये जागृती

झाल्याने तेही हिंदुंचे गुलाम म्हणून राबावयास तयार नव्हते. मंदिर प्रवेश सत्याग्रहांतून धर्मांतराची विचारस्फूर्ती निर्माण झाली आणि त्या दिशेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराला गती मिळाली.'[१२]

### ६.४ येवले परिषद (१३ ऑक्टोबर १९३५) :

काळाराम मंदिर सत्याग्रहाच्या पार्श्वभूमीवर १३ ऑक्टोबर १९३५ रोजी नाशिक जिल्ह्यातील येवला या ठिकाणी एक हजार प्रतिनिधिंच्या उपस्थितीत दलित वर्गीयांची परिषद भरली. ही परिषद अस्पृश्यांसाठी एक मैलाचा दगड ठरली. परिषदेच्या स्वागत समितीचे अध्यक्ष श्री.रणखांबे हे होते. -हासाला चाललेल्या हिंदू धर्माला 'ब्राह्मण धर्म' म्हटले जाते. या हिंदूधर्मात जी अस्पृश्यता पाळली जाते याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. याच परिषदेत अध्यक्षीय भाषणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, 'हिंदू धर्मात अस्पृश्य म्हणून जन्मलो ही एक दुर्दैवी घटना आहे. तिला अडथळा करणे किंवा तिला टाळणे हे हातातले नव्हते पण हिंदू म्हणून मरणार नाही असे गंभीरपणे खात्रीपूर्वक सांगतो. कोणत्या जातीत जन्म घ्यावा हे माणसाच्या हातात नाही. परंतु कोणत्या धर्मात मरावे हे त्याच्या हातात आहे अशी त्यांची कणखर भूमिका होती.' या परिषदेमध्ये असा ठराव करण्यात आला की, 'हिंदूंची मनधरणी करण्याच्या प्रयत्नाचा काहीही उपयोग होत नाही. अस्पृश्य वर्गाने आता आपले सामर्थ्य विनाकारण खर्च करू नये. व सत्याग्रहाची मोहिम यापुढे बंद करावी आणि स्पृश्य मानलेल्या वर्गापासून आपला समाज स्वतंत्र करावा व हिंदुस्थानातील अन्य समाजामध्ये आपल्या समाजाला मानाचे व समतेचे स्थान मिळवण्यासाठी अस्पृश्य वर्गाने एकनिष्ठेने प्रयत्न करावा असे या परिषदेचे मत आहे.'[१३] ते म्हणतात, धर्मामध्ये मानवाला मानवासारखी वागणूक मिळत नाही, पंक्तीत बसवण्याची मुभा नाही, धर्मांमध्ये समानता नाही, जो धर्म मानवनिर्मित नाही,त्या धर्मात आपल्याला समानतेची वागणूक मिळण्याची आपेक्षा करणे कठीण आहे. जगातील इतर सर्वधर्म मानवनिर्मित आहेत. मानवाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ज्याचा उपयोग होतो तो खरा धर्म होय. इतर कोणत्याही धर्मांमध्ये जातीभेद नाहीत. मग हिंदू धर्मांमध्ये जातीभेद का? हा त्यांचा प्रश्न आहे. येवला येथील परिषदेमध्ये त्यांना धार्मिक व सामाजिक क्रांती घडवून आणण्याची अधिक निकड वाटत होती.[१४]

हिंदूंच्या देव-देवता व मंदिराविषयी काहीच कर्तव्य नाही व हिंदुच्या कोणत्याही समारंभात भाग घेऊ नये. असा ठराव येवले परिषदेत एक मताने मान्य करण्यात आला. कारण आता अस्पृश्य समाजाने मानाचे स्थान मिळवण्यासाठी प्रयत्न करावे असे या परिषदेचे मत होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेली ही धर्मांतराची घोषणा, म्हणजे क्रांतीकारी पाऊल होते. ही घोषणा वा-यासारखी सर्वत्र पसरली. उच्चवर्णीयांवर त्यांच्या या घोषणेचा परिणाम झाला नाही. मात्र सर्वजण आश्‍चर्य चकित झाले. त्यांनी अनेक निर्णय घेतले, घोषणा केल्या, सत्याग्रह केले मात्र या घोषणेस जगभरातून प्रसिद्धी तर मिळालीच परंतु वंचित बहिष्कृत, पददलित आणि न्यायासाठी लढणा-या लोकांनी आपल्या हक्काच्या लढाईत उचललेले हे निर्णायक पाऊल म्हणून जगाने याचे स्वागत केले. एखाद्या घटकाला जो बहुसंख्येने आहे त्यास दास्यत्त्व व गुलामगिरीमध्ये सदोदीतपणे रहाव्या लागणा-या या धर्मासच नाकारणे ही एक भीम गर्जनाच होती. असे म्हणावयास हरकत नाही.

ज्या काळात जागतिक पातळीवर परिवर्तन होत होते. सामाजिक बदल स्विकारले जात होते, त्यासाठी क्रांती होत होती. त्याच काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक सामाजिक तसेच आर्थिक बदल सुचवले. परंतु राजकीय चळवळीच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनाच्या तत्त्वांकडे दुर्लक्ष करण्यात आले. उलट स्वातंत्र्य चळवळीतील तो अडथळा मानला गेला. त्यास अव्यवहार्य ठरवण्यात आले. म्हणून येवला परिषदेमध्ये त्यांनी धर्मांतराचे सुतोवाच के ले. १९३५ मध्ये के लेली ही घोषणा होती. २० वर्षे त्यांनी परिवर्तनाची व स्पृश्यांच्या मनपरिवर्तनाची वाट पाहिली. परंतु त्याचा उपयोग झाला नाही. म्हणूनच धर्मांतराच्या दृष्टीने येवला परिषद महत्त्वाची मानली जाते.

**६.५ स्वतंत्र मजूर पक्ष (१५ ऑगस्ट १९३६ ) :**

१५ ऑगस्ट १९३६ स्वतंत्र मजूर पक्ष या नावाचा एक राजकीय पक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केला. सहा वर्षे हा पक्ष चालविल्यानंतर १९ जुलै १९४२ रोजी नागपूर येथे शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची त्यांनी स्थापना केली. केवळ सहा वर्षाच्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या कार्यकाळात अनेक घडामोडी घडल्या आणि पक्षाने कार्यही तेवढेच के ले. मुंबई विधानसभेत एक विरोधी पक्ष

म्हणून, मध्य व-हाड प्रांतात स्वतंत्र कार्य, प्रांतिक विधानमंडळाच्या निवडणूकीतील कार्य, पक्षाच्या माध्यमातून केलेल्या चळवळी, या सर्व गोष्टी यामध्ये येतात. बहिष्कृत हितकारिणी सभा अस्तित्वात असताना त्यांनी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला, याचे महत्त्वाचे कारण म्हणजे १९३५ ला ब्रिटिशांनी भारत सरकार कायदा पास केला आणि या कायद्यानूसार ज्या प्रांतिक विधानमंडळाच्या निवडणूका होणार होत्या. त्यामध्ये सहभाग घेऊन निवडणूकीच्या आखाड्यात उतरणे हा त्यांचा उद्देश होता.

याबाबत ते जनता या आपल्या मुखपत्रात असे म्हणतात, 'प्रथमतः त्यांचा उद्देश फक्त अस्पृश्य वर्गासाठीच स्वतंत्र पक्ष स्थापन करावा असा होता व त्या पक्षापूरताच व्यवहार्य असा मर्यादित कार्यक्रम त्यांनी ठरविला होता. पण हा मूळचा बेत बदलून या पक्षाला आता बहुसामान्य स्वरूपाचे नाव दिले आहे व त्याचा कार्यक्रमही त्या पक्षाला अनुरूप असा सर्वसाधारण स्वरूपाचा ठेविला आहे. या पक्षाला असे सर्वसामान्य स्वरूप देण्याचे कारण डॉक्टरसाहेबांनी असे सांगितले की, अस्पृश्यतेत्तर वर्गातील त्यांच्या ब-याच स्नेह्यांनी त्यांच्या कार्यक्रमाला पूर्ण अनुमती दिली असून त्याप्रमाणे त्यांच्या पक्षातर्फे निवडणुकीला उभे राहण्याचे कित्येकांनी ठरविले आहे. अस्पृश्य व अस्पृश्येत्तर यांच्यामध्ये राजकीय बाबीत तरी सहकार्य घडून येण्यास हा पक्ष उपकारक होईल हे उघड आहे. कारण ज्या मतदारसंघात अस्पृश्य वर्गाला राखीव जागा नाहीत अशा पुष्कळ मतदारसंघात अस्पृश्य वर्गाचे मतदान भरपूर आहे आणि आपल्या मताधिकाराचा उपयोग या नवीन पक्षातर्फे उभे राहणा-या कोणत्याही वर्गाच्या उमेदवाराला करून घेता येईल.'[१५] या पक्षाच्या जाहीरनाम्यात पुढील गोष्टींचे उल्लेख आहेत.

१. सामान्य माणसांच्या हितासाठी आवश्यक असेल तर उत्पादनाच्या साधनांची मालकी व व्यवस्थापन राज्याकडे असावे हे स्पष्ट केले.
२. शेतकरा-यांच्या हितासाठी लॅनु मॉरगेज बँका, कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकारी सोसायट्या स्थापन करणे.
३. शेतीचे छोटे-छोटे तुकडे होणार नाहीत याकडे लक्ष देणे.
४. खोती आणि तालुकादारी शेती पद्धतीतील कुळांना संरक्षण देणे.
५. वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात जडउद्योगांची पुर्नरचना करणे.

६. ग्रामीण भागातील जनतेमध्ये आधुनिक दृष्टिकोन निर्माण करणे.
७. प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणे.
८. प्रौढ शिक्षणाचा प्रसार करणे.
९. शिक्षणव्यवस्थेची पुर्नरचना करणे.
१०.ज्या वतनदारी पद्धतीमुळे अस्पृश्यवर्गापैकी महार वर्गास कनिष्ठ दर्जा प्राप्त झाला ती वतनदारी पद्धत नष्ट करून तिचे रूपांतर पगारदार नोकरीत करणे.

अशाप्रकारे अत्यंत मुलभूत प्रश्नांना हात घालणारा त्यांचा जाहीरनामा होता. यापक्षाने १५ पैकी १४ राखीव जागांवर आपले उमेदवार उभे केले. ४ स्पृश्य उमेदवार साधारण जागांवर उभे के ले व १० अन्य स्पृश्यवर्गीय उमेदवारांना पाठिंबा दिला.

स्वतंत्र मजूर पक्षाने १० राखीव जागा जिंकल्या. व ३ जागा सर्वसाधारण मतदार संघातून निवडून आणल्या. या पक्षाने आपल्या उद्दिष्टाप्रमाणे शोषणाविरुद्धच्या लढ्यातील आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी या पक्षाच्या माध्यमातून कष्टकरी, शेतकरी, दलित यांचे प्रश्न उभे केले. खरे म्हटले तर, भारतीय राजकारण जातीय व धर्मीय पातळीवरून वर्गीय पातळीवर नेण्याचा पहिला प्रयत्न त्यांनी केला. असे रावसाहेब कसबे यांनी म्हटले आहे. हा समतेचा लढा बाहय स्वरूपात जातीय वाटत असला तरी त्याचे मूळ अस्पृश्यांच्या आर्थिक व सामाजिक गुलामगिरीत आहे याची पूर्ण कल्पना त्यांना होती. त्यामुळेच निवडणूक लढविण्यासाठी उमेदवारांची निवड करताना त्यांना अनेक अडचणी आल्या. या काळात उपरोक्त उल्लेख केल्याप्रमाणे येवला परिषदेमध्ये धर्मांतराबाबत त्यांनी सुतोवाच के लेले होते. महार परिषदेमध्ये धर्मांतराच्या ठरावावर शिक्कामोर्तब झालेला असला तरी चांभार, मातंग, ढोर अशा बहुसंख्य लोकांनी धर्मांतरास विरोध के ला होता. त्यामुळे अस्पृश्यांसाठी राखीव असलेल्या १५ जागांसाठी उमेदवार निवडताना त्यांना धर्मांतरास पाठिंबा देणा-या उमेदवाराची निवड करावयाची होती. त्यामुळे काही जातीतील लोकांना या तत्त्वासाठी त्यांनी उमेदवारी देण्यासाठी नकार दिला होता. अशा अतिशय अडचणीच्या मार्गातून त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षामार्फत आपले कार्य पुढे चालू ठेवले व पुढे ते सहा

वर्षापर्यंत चालले. म्हणूनच तिकीट वाटपामध्ये नाकारल्यामुळे अनेकांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची साथ सोडली आणि काँग्रेसमध्येही दाखल झाले. व राष्ट्रीय हरिजनांचे मेळावे भरवू लागले.[१६]

यावेळी दुःखी होऊन ७ सप्टेंबर १९३६ रोजी पुण्यामध्ये भाषण करताना ते म्हणाले होते, 'मी ज्या माणसाची उमेदवार म्हणून निवड केली त्यात माझे कोणीही नातेवाईक नाहीत. माझ्या तीन कसोट्या आहेत. १. इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान असणे २. उमेदवार वयाने तरुण असला पाहिजे. ३. त्याने पक्षाच्या शिस्तीखाली राहिले पाहिजे व निस्वार्थ बुद्धीने काम करणारा असला पाहिजे.' १९३६ ते १९४२ या सहा वर्षाच्या काळात त्यांनी सुरू केलेल्या शोषित-पिडीत, उपेक्षित-वंचित यांच्या उद्धारासाठी केलेल्या कार्यामध्ये कामगार व शेतकरी, कष्टकरी हा केंद्रबिंदू होता. या काळात मुंबई, मध्य प्रांतांच्या कायदेमंडळात छत्तीसगड, इंदौर, सिंध अशा प्रदेशात या पक्षाने दिलेले लढे कायम चळवळीस प्रेरणादायी ठरणार आहेत. द्रारिद्र नष्ट करण्यासाठी आर्थिक स्वावलंबनाची आवश्यकता आहे. व त्यासाठी राजकीय पक्ष असला पाहिजे आणि तो स्वतंत्र मजूरपक्ष असेल याची खात्री त्यांनी जनतेला दिली होती. या पक्षाच्या माध्यमातून त्यांनी मुंबईमध्ये अनेक परिषदांचे आयोजन केले. औरंगाबाद जिल्ह्यातील मक्रनपूर येथील दलित परिषद, तडवळे (कस्बे) येथील महार परिषद, मांग परिषद, मनमाड येथील अस्पृश्य रेल्वे कामगार परिषद, महाराष्ट्र अस्पृश्य महिला परिषद,अस्पृश्य दलित तरुणांची परिषद इत्यादी अनेक परिषदा त्यांनी घेतल्या. उद्देश हाच की या बहिष्कृत वर्गाने जागृत व्हावे.

### ६.६ मजूरमंत्री : (९ जुले १९४२)

ब्रिटिश सरकारने ९ जुलै १९४१ मध्ये भारताच्या संरक्षण सल्लागार समितीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची नियुक्ती केली आणि ९ जुलै १९४२ ला मध्यवर्ती मंडळात मजूरमंत्री व बांधकाममंत्री ही पदे देण्यात आली. दोन्ही खात्यांवर त्यांनी आपले कर्तृत्त्व गाजवले. यावेळी दुसरे महायुद्ध चालू होते. आणि जागतिक पातळीवरील या महायुद्धामध्ये भारतावर ज्यांचे सरकार होते ते ब्रिटिश लोकशाहीच्या बाजूने लढत होते. या पार्श्वभूमीवर जागतिक पातळीवर लोकशाही टिकविण्यासाठी ब्रिटिश सरकारला सहकार्य करण्याचे त्यांनी ठरवले.

मजूरमंत्री म्हणून त्यांनी आपल्या काळात काहीयोजना सुचवल्या व राबवल्या होत्या.[१७]

१. मध्यवर्ती व राज्यसरकारच्या विविध खात्यातून काही जागा अस्पृश्यांसाठी राखून ठेवण्याचे त्यांनी मान्य करून घेतले.
२. अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक व वैज्ञानिक शिक्षणास शिष्यवृत्त्या देण्यासाठी दरवर्षी ठराविक रक्कम मंजूर करून घेतली.
३. त्यांच्या सल्ल्यावरून केंद्रसरकारने काही अस्पृश्य विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणासाठी विलायतेस पाठवले. परदेशातून शिक्षण पूर्ण करून आल्यानंतर त्यांना राजपत्रित जागांवर नेमण्यात आले. अशा प्रकारचा प्रयोग प्रथमच करण्यात आलेला होता.
४. महार सैनिकांची एक कायमची पलटण सुरू करण्यास त्यांनी लष्करी खात्यास भाग पाडले. त्यानुसार महार मशिनगन बटालियन सुरू करण्यात आली.
५. भारतातील श्रीमंत व्यक्तिंकडून व सरकारकडून देणग्या घेऊन १९४५ ला पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. यामार्फत अनेक शैक्षणिक संस्था निर्माण केल्या. याचा उल्लेख मागील प्रकरणात आलेला आहे.
६. उद्योगपतींनी कामगार हित लक्षात घेऊन त्यांच्यासाठी काही रक्कम बाजूला ठेवली पाहिजे जनतेमधून त्यांचे प्रतिनिधी कार्यकारी मंडळावर घेतले पाहिजेत. मालक व मजूरांमधील संबंध सुधारले पाहिजेत. असे त्यांचे मत होते.

मजूरमंत्री असताना १३ नोव्हेंबर १९४२ ला मुंबई आकाशवाणीवर भारतीय मजूर आणि महायुद्ध या विषयांवरील भाषणात ते म्हणाले होते, ‘हे युद्ध केवळ पृथ्वीवरील प्रदेश वाटून घेण्यासाठी सुरू झालेले नाही, तर ते माणसामाणसांत नि राष्ट्राराष्ट्रांत सहजीवनाचे कसे नाते असावे या विषयी मूलभूत फरक घडवून आणण्यासाठी घडत आहे. सहजीवनाच्या अटींच्या फेरतपासणीची मागणी करणारी ही क्रांती आहे. सामाजिक पुनर्रचनेची ही मागणी आहे. म्हणून नाझीवादाचा जय झाला तर नाझी समाजरचनेखाली स्वातंत्र्याची गळचेपी होईल. समता नाकारण्यात येईल आणि एक अनिष्ट मत म्हणून बंधुता समूळ उखडून टाकण्यात येईल. स्वातंत्र्य नि नवीन समाजरचना

ही फळे लोकशाहीच्या विजयामुळे लाभतील. तथापि, निव्वळ स्वातंत्र्य मिळून पुरेसे कार्य होत नाही. स्वातंत्र्याचे मूल्य तुम्ही कोणत्या त-हेची समाजरचना नि राज्यघटना उभारू पाहता यांवर अवलंबून आहे. म्हणून कामगारांनी आपली सर्वशक्ती एकवटून 'छोडोभारत' ही मागणी करण्यापेक्षा नवीन भारताची मागणी करावी. हिंसेच्या शक्तीला शरण जाऊन मिळविलेली शांतता ही खरी शांतता नव्हे. ती आत्महत्या होय; तसे करणे म्हणजे सुखी, सुंदर अन, स्वास्थ्यपूर्ण जीवन जगण्यासाठी जे काही उदात्त नि आवश्यक असते त्याची होळी करून रानटीपणाला आणि अनाचारीपणाला शरण जाण्यासारखे आहे. हल्ला झाला असता केवळ लढण्याचे नाकारून युद्धाचा नायनाट होणार नाही. युद्धाचा नायनाट करावयाचा असेल, तर युद्ध जिंकून न्यायाने तह प्रस्थापित केला पाहिजे.'[१८] मुंबई प्रांतिक कौन्सिलमध्ये १५ सप्टेंबर १९३५ ला ट्रेड डिप्युट या बिलावर त्यांनी तीन तासांचे भाषण केले होते. परळच्या कामगार मैदानावर १६ ऑक्टोबर १९३८ ला ५० हजार कामगारांसमोर भाषण केले होते. ६ नोव्हेंबर १९३८ ला एक लाख कामगारांसमोर भाषण केले होते. ७ नोव्हेंबर १९३८ ला दीड लाख कामगारांसमोर भाषण केले होते. या सर्व भाषणांमध्ये त्यांची मजूरमंत्री म्हणून असलेली भूमिका, कामगार विषयीचे धोरण याचे त्यांनी विवेचन केले होते. राजकीय सत्ता, कामगार, शेतकरी व जनतेच्या ख-या प्रतिनिधींकडे असण्याची गरज त्यांनी स्पष्टपणे प्रतिपादित केली होती. ट्रेड डिसप्युट बिलास विरोध करण्यासाठी एकजूट करणे त्यांना आवश्यक वाटत होते सरकारच्या कामगार विषयक धोरणावर हल्ला चढवून मालकांच्या बाजूने असलेल्या या विधेयकाला त्यांनी विरोध केला. त्यांच्या अशाच प्रकारच्या विचारातून व मागण्यांमधून कामगारांच्या कामाचे तास निश्चित झाले. किमान वेतन निश्चित झाले. समान वेतन ही निश्चित झाले. व कामाचे दिवस निश्चित झाले. जात व धर्माच्या भेदाभेदात त्यांची कामगार चळवळ कधीच अडकली नाही. आर्थिक शोषण हा लढण्याचा मुद्दा असावा तसेच कामगार व मालक यांच्यातील दरी कमी होऊन राजकीय व सामाजिक हक्कांची नेमकी जाणीव झाली पाहिजे. राजकीय सत्तेमध्ये कामगारांचा सहभाग असला पाहिजे. कामगार प्रश्नांच्या अभ्यासासाठी स्वतंत्र अभ्यास मंडळे असली पाहिजेत. अशी भूमिका

त्यांनी १९३८ च्या ‘मनमाड’ येथील रेल्वे कामगार परिषदेत मांडली. मजूर मंत्री पदाच्या चार वर्षाच्या काळामध्ये चार त्रिपक्ष परिषदा घेण्यात आल्या. यामध्ये किमान वेतन कायदा, कामाचे तास, उपहारगृह, महागाई भत्ता, रास्तभाव धान्य केंद्र, अधिक श्रम करणा-या कामगारांना जास्त शीधापत्रे, प्रॉव्हिडंड फंडाची नियमावली, कामगारांच्या मुलांना शिक्षण अशा रोजच्या जीवनातील व भविष्यकालीन तरतूदींसाठी चर्चा सातत्याने करण्यात आली.

कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करणा-या नव्या कायद्याची निर्मिती तसेच मूळ कायद्यामध्ये त्यांनी सुधारणा के ली. त्यामध्ये खालील अटी लागू के ल्या.

१. कामगारांना नुकसान भरपाई म्हणून विमा संरक्षण लागू करण्यात आले.
२. कायम कामगारांना ४८ तास ही कामाची मर्यादा निश्चित करण्यात आली.
३. हंगामी कामगारांना ५४ तास ही कामाची मर्यादा निश्चित करण्यात आली.
४. महागाई निर्देशांकानुसार महागाई भत्त्यात वाढ करण्याचे धोरण ठरविण्यात आले.
५. कामगारांच्या मुलांना शिक्षणाची सोय करण्यात आली.
६. स्त्री-पुरुष समानता ही वेतनात आणण्यात आली.
७. स्त्री कामगारांसंबंधीचे धोरण ठरविण्यात आले.
८. १२ तासावरून ४ तास काम करण्यात आले.
९. प्रसूती रजा पगारी करण्यात आली.
१०.कामगाराचा मृत्यू झाल्यास आर्थिक नुकसान भरपाई देण्यात यावी.

मजूर मंत्री म्हणून त्यांनी २६ जुलै १९४५ रोजी भारतीय बॉयलर संशोधन बिल मांडून बॉयलर निरीक्षकाला फोड पाईपचे नियमित निरीक्षण करून प्रमाणपत्र देण्याची सोय केली. श्रमिकांना सुरक्षिततेची हमी मिळाली. खाण कामगार महिलांना प्रसुती काळातील लाभ देण्याकडे कायद्याचे लक्ष वेधले. या संशोधन बिलामुळे महिलांना चार आठवड्याची पूर्ण वेतन प्रसुती रजा मिळाली. खाणी जेव्हा बंद असत तेव्हा या खाण कामगारांना वेतन मिळत नसे. ते मिळण्याची हमी या कायद्यानुसार मिळाली. मजूरमंत्री म्हणून त्यांनी कोळसा खाण, श्रमिक कल्याण आध्यादेश १९४४ मध्ये लागू केला. श्रमिक कल्याण कोष स्थापन केला. महिला श्रमिकांना खाणित काम करण्यावरील प्रतिबंध दूर

करण्यात आला. अशाच प्रकारे कोळसा खाण सुरक्षा भंडार संशोधक विधेयक सुद्धा त्यांनी मांडले. यानुसार नुकसान भरपाईसाठी कोळसा उत्पादन कर आकारण्यात आले. डिसेंबर १९४५ रोजी दिल्ली येथे स्थायी श्रमसमितीची बैठक घेऊन त्या बैठकीत औद्योगिक कामगारांसाठी घर बांधणे यावर भर देण्यात आला. एप्रिल १९४६ मध्ये अभ्रकखाण श्रमिक कल्याण विधेयक त्यांनी मांडले. यानुसार अभ्रक निर्यातीवरील कर अभ्रक खाणीत काम करणा-या श्रमिकांच्या कल्याणकोषात जमा करावा. त्यांना स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची सोय, आजारपणाची रजा, विमा, प्रसुती रजा, आरोग्याच्या सुविधा इत्यादी तरतूदी करण्यात आल्या. वर्धा येथील नगरपालिकेच्या सफाई कामगारांनी आपल्या मागण्यांसाठी १९४४ साली संप केला होता. सरकार या मागण्या मान्य करत नव्हते. संप मागे घेण्याचा आग्रह करत होते. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संपास पाठिंबा दिला. व पगारवाढ, गणवेश व भत्ता मान्य करून घेतला.[१९]

रोजगार विनिमय केंद्र ही संकल्पना त्यांनी प्रत्यक्ष आमंलात आणली. कुशल व अकुशल कामगारांच्या भर्तीसाठी ही कार्यालये सुरू करण्यात आली. या केंद्रामध्ये लष्करातील निवृत्ती सैनिकांच्या पुनर्वसनाची सोय करण्यात आली. तांत्रिक शिक्षण, व्यवसायिक शिक्षण, कुटिरद्योग शिक्षण, व्यापारविषयक शिक्षण, सेवा विषयक भरतीची सोय या रोजगार विनिमय केंद्रात करण्यात आले. आजही ही योजना चालू आहे.

मुंबईच्या टाटा इन्स्टिस्टयुट ऑफ सोशल सायन्स येथील विद्यार्थ्यांपुढे १९४५ मध्ये त्यांचे भाषण झाले. त्यावेळी ते म्हणाले होते, सक्तीची तडजोड किंवा लवाद हे कामगारांना अत्यंत हितावह आहे. मी हे तत्व कामगारांच्या न्याय पद्धतीत कायमस्वरूपाचे करीन अशी मला आशा आहे. ज्या तांत्रिक शिक्षणाच्या शाळा हिंदी सरकारने शिक्षणाच्या कार्यक्रमापैकी एक भाग म्हणून सुरू केल्या आहेत त्या चालू राहतील. तसेच औद्योगिक क्षेत्रातील कामगारांसाठी घरे बांधण्यासंबंधीची मालकांवरील जबाबदारी आणि भरपगारी रजा यावरही भर देणे आवश्यक वाटते.[२०]

अशाप्रकारे मजूरमंत्री म्हणून काम करत असताना भारतातील मजूरांच्या परिस्थितीचा सखोल अभ्यास करून मनात जातीपातीचे कोणतेही विचार न ठेवता प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी मजूरांच्या परिस्थितीवर चिरंतन उपाय शोधले. मे १९४६ ला कार्यकारी मंडळ विसर्जित झाले तोपर्यंत मजूरमंत्री म्हणून त्यांनी अत्यंत प्रभावीपणे आपली जबाबदारी पार पाडली.

### ६.७ हिंदू कोड बील : (१९४९)

मानवजातीच्या इतिहासामध्ये स्त्रियांच्या अत्याचाराचा इतिहासही अतिशय जुना आहे. माणूस प्रगतशील जस-जसा होत गेला तसी स्त्रियांवरील बंधने वाढत गेली. कालांतराने स्त्रियांवरील बंधनांना धर्मांचा आधार देण्यात आला. नीतिमत्ता, चारित्र या नावावर तिच्यावर अत्यंत कठोर बंधने लादण्यात आली. त्यातून तिचे परावलंबित्त्व वाढत केले. अनिष्ठ रुढी परंपरांचा उदय झाला. सतीप्रथा, केशवपन यासारख्या अनिष्ठ प्रथांचे उदात्तीकरण करण्यात आले. धर्मांची बंधने लादताना मनुःस्मृतीचा आधार घेऊन तिला भोगवस्तू ठरविण्यात आले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय धर्मशास्त्राचा अभ्यास करताना स्मृतिपुराणे यावरील सविस्तर विवेचन केले त्यातीलच एक भाग म्हणजे त्यांचा 'हिंदू स्त्रियांची उन्नती व अवनती... त्याला जबाबदार कोण?' हा त्यांचा प्रदीर्घ लेख होय. यामध्ये त्यांनी मनुस्मृतीमधील काही ओळींचा उल्लेख के ला आहे. त्यामध्ये पुरुषांना आकर्षित करून भ्रष्ट करणे हे स्त्रियांचे वैशिष्ट्ये आहे, स्त्रिया के वळ मुर्खांनाच वाममार्गाने नेतात असे नसून ज्ञानी पुरुषांना सुद्धा काम आणि क्रोध यांचे गुलाम बनवतात. स्त्रिया पुरुषांच्या सौंदर्याकडे किंवा वयाकडे बघत नाहीत. तो पुरुष आहे ऐवढेच मनात आणून त्यांच्या स्वाधीन होतात. स्त्रिया चंचल असून त्या पतीचाही विश्वासघात करतात. पुरुषाने स्त्रीला ताब्यात ठेवण्यासाठी पराकाष्ठेचे प्रयत्न करावेत. मनूने स्त्रियांना कामवासनेची इच्छा, शृंगार, अपवित्र वासना, क्रोध, अप्रामाणिकपणा, मत्सर व दुर्वर्तन बहाल के ले. मनूच्या दृष्टीने स्त्री किती नीच होती हे यावरून दिसते.[२१] मनूप्रणित स्त्रीबद्दलची ही मिमांसा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जेव्हा अभ्यासली तेव्हा भारतीय स्त्रीच्या संदर्भात अधिक वेगाने सुधारणा करण्याची गरज त्यांच्या लक्षात आली होती. म्हणून त्यांनी 'हिंदू कोड बिलाच्या' माध्यमातून भारतीय स्त्रीला तिचे

नैसर्गिक हक्क व सन्मान दिला. यामध्ये सुद्धा कोणत्याही जातीधर्माचा विचार त्यांनी केला नव्हता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष आणि स्वतंत्र्य भारताचे पहिले कायदामंत्री ही होते. घटना समितीमध्ये काम करत असताना त्यांनी हिंदू कोडबिलाचा विचार केला होता. जुने हिंदूसंहिता विधेयक कायदा मंत्रालयाच्या अभिलेख खोल्यांमधून काढून त्यास नवा आकार देऊन त्यांनी हिंदू कोड बिल तयार के ले. घटना समितीपुढे सादर केले. ब्रिटिश सरकारने भारतीय स्त्रियांसाठी काही कायदे केलेले होते. १८५६ चा हिंदू विधवा पुर्नविवाह कायदा, १८७२ चा घटस्फोटाची तरतूदी असलेला विशेष विवाह कायदा, १९२९ चा शारदा कायदा हे ते कायदे होत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदूसंहिता विधेयक ११ एप्रिल १९४७ रोजी मांडले. ९ एप्रिल १९४८ पर्यंत याकडे लक्षच देण्यात आलेले नाही. त्यानंतर हे बिल सिलेक्ट कमिटीकडे पाठवण्यात आले. त्यानंतर फे ब्रुवारी १९४९ मध्ये चार दिवस, मार्च मध्ये एकदिवस एप्रिल मध्ये दोन दिवस अशी एकू ण सात दिवस यावर चर्चा करण्यात आली. परंतु कोणताही निर्णय झाला नाही. देशातील सर्व स्त्रियांच्या हक्कांचे हे बिल होते. या बिलावर २४ फेब्रुवारी १९४९ च्या संविधान सभेमध्ये त्यांनी आपली भूमिका सविस्तर मांडली. त्यामध्ये ते म्हणतात, कोणत्याही देशाचे समतोल विकासाचे मापदंड स्त्रियांच्या विकासावर अवलंबून असते. म्हणून हिंदू कोड बिल ही एक महत्त्वपूर्ण घटना आहे. हिंदू समाजातील उच्चनीच भेद व लिंगभेद तसेच कायम ठेवून के लेले कोणतेही निव्वळ आर्थिक परिस्थिती सुधारण्याचे कायदे म्हणजे घाण न काढता त्यावरच उभारलेले पत्त्याचे बंगले होत. ही तर घटनेची थट्टा आहे. या बिलाचे महत्त्व पंडित नेहरू यांनाही मान्य होते. परंतु त्यांनीही त्याचे कायद्यात रूपांतर होऊ दिले नाही.[२२] हिंदू कोड बिलामध्ये पुढील तरतूदी होत्या :

- वैवाहिक हक्क :
  १. पतीच्या संपत्तीमध्ये पत्नीचा हक्क.
  २. मिळालेल्या स्त्रीधनावर पत्नीचा हक्क.
  ३. विधवा झाल्यानंतर संपत्तीचा वारसा हक्क.
- घटस्फोट :

१. पतीपासून घटस्फोट मागण्याचा हक्क.

२. नव-याने घटस्फोट दिल्यास पोटगीची तरतूद.

• माता म्हणून हक्क :

१. स्त्रीला दत्तक निवडण्याचा हक्क

२. दत्तक घेण्याचा हक्क.

३. पारंपारिक दत्तक विधान पद्धती रद्द.

४. आपला मुलगा दत्तक देण्यास मातेस हक्क.

• पालक म्हणून मातेचे हक्क :

१. अल्पवयीन मुलाचे पालकत्व, वडील हयात नसल्यास आईकडे देण्याची तरतूद केली.

२. निसर्गदत्त पालकाने धर्मत्याग केल्यास अगर संसार त्याग केल्यास निसर्गदत्तक पालकाकडे राहील.

• संपत्तीत हक्क :

१. दत्तक मूल असेल तर दत्तकास संपत्तीचा अर्धाहिस्सा व आईस अर्धा  हिस्सा.

२. संपत्तीचा अर्धा हिस्सा तिच्याच ताब्यात राहिल.

३. दत्तक आपल्या मातेस संपत्तीच्या हक्कांपासून वंचित करणार नाही.

४. वडीलांच्या मिळकतीत मुलीला हिस्सा देणे.

५. स्त्रीला स्वतःचा वारसा ठरवण्याचा अधिकार देणे.

• पत्नीचे हक्क :

१. एकपत्नित्त्वाची तरतूद.

२. म्हणजे द्विभा-या प्रतिबंध होय.

• विवाह विषयक हक्कः

१. पारंपारिक पद्धतीने विवाह करावयाचा असेल तर तिला मोकळीक आहे.

२. वर्ण, जात व पोटजात या बाहेरील व्यक्तीशी विवाह केला तर तो कायदेशीर करावा.

या सर्व तरतूदींमुळे स्त्रीला तिच्या संपत्तीमध्ये हक्क मिळाला. गुलाम म्हणून तिची  दुय्यम भूमिका यामुळे संपणार होती. माणूस म्हणून ख-या अर्थाने तिचे मूल्य होणार होते. या हिंदू कोड बिलातून देशाच्या आर्थिक सामाजिक उन्नतीचा मार्ग निघू शके ल असा त्यांना विश्वास होता. कारण या तरतूदींमधून पुरुषसत्ताक पद्धतीतून स्त्रियांची मुक्तता होणार होती. स्त्रिया शिक्षणात मागासलेल्या असल्यामुळे त्यांच्या शिक्षणाची ही जबाबदारी, शिक्षणासाठी राहण्याची  जबाबदारी, शासनानेघ्यावी व स्त्रियांबद्दलचा पारंपारिक दृष्टिकोन बदलून सामाजिक वास्तव स्विकारावे अशी त्यांची भूमिका होती. या विधेयकामध्ये त्यांनी सर्वप्रथम वारशाचा प्रश्न घेतला होता. मुलीला वडीलांच्या मालमत्तेत अर्धा हिस्सा देणे. ही अत्यंत क्रांतिकारी मागणी त्यांनी के ली होती. त्यांनी वडीलांच्या आधी आईलाच उत्तराधिकारी मानले होते. स्त्रीधनाचे अनेक प्रकार काढून टाकून सर्व स्त्रीधन एकच असून त्याला वारशाचा नियमसुद्धा एकच आहे असे ते म्हणतात. खरेतर मुलगा व मुलगी यांच्यात कौटुंबिक व सामाजिक दर्जामध्ये समानता राखण्याचा त्यांचा हा प्रयत्न होता. परंतु ते तत्कालीन उच्चवर्णियांना पचले नाही. या सर्व परिस्थिती मध्ये या बिलातील फक्त चार कलमे मंजूर झाली. त्यामुळे अत्यंत निराश होऊन २७ सप्टेंबर १९५१ रोजी त्यांनी आपल्या कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. स्त्रीयांच्या हक्कांसाठी कायमचा स्मरणात राहील असा त्याग आहे. पुढे स्वतंत्र भारत सरकारने १९५२  नंतर चार स्वतंत्र कायदे बनवले. १. दि हिंदू मॅरेज ॲक्ट, २. दि हिंदू सक्सेशन ॲक्ट १९५६, ३. दि हिंदू मायनॉरिटी ॲण्ड गार्डयनशिप १९५६, ४. दि हिंदू ॲडॉप्शन ॲक्ट ॲण्ड मॅन्टेंनन्स् ॲक्ट १९५६. याची नांदी मात्र हिंदू कोड बिलच होते. या बिलाच्या माध्यमातून भारतातील संपूर्ण स्त्रियांच्या विकासाचा व उन्नतीचा प्रवाह प्रवाहित होणार होता. स्त्री ही पुरुषाप्रमाणेच एक मानवच आहे. हे त्यांना प्रस्थापित करावयाचे होते. व यासाठी स्त्रीच्या  ख-या शक्तीला कायद्याचे बळ दिले तरच समाजाची उन्नती होईल असा त्यांचा विश्वास होता. स्त्रियांना अन्यायी वागणूक देणारी समाजभूमी बदलण्याचे स्वप्न पाहणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू कोड बिलातून प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी विरोध झाला तरी

समाजाला त्यांची ही दूरदृष्टी मान्य करावीच लागली. हे त्यांच्या विचारांचे यश आहे.

**३.८ समारोप :**

'डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताच्या शिल्पकारांपैकी एक आहेत.' हे प्रा. हरी नरके यांचे वाक्य तंतोततं खरे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार व सामाजिक उन्नतीसाठी त्यांनी केलेले सर्वांगीण परिपूर्ण कार्य ही आधुनिक भारताच्या इतिहासाला दिलेली देणगी आहे. आज सर्वात मोठा लोकशाही देश असलेल्या भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये ज्या सामाजिक चळवळी झाल्या त्याची पार्श्वभूमी खूप मोठी होती.पारंपारिक सामाजिक जीवन, अनिष्ठ प्रथा यांच्या विरोधात सामाजिक संघर्ष हे एक मोठे अव्हान होते. त्यांच्या संपूर्ण सामाजिक चळवळीमध्ये जातीअंताची लढाई लढण्यासाठी बहिष्कृत हितकारिणी सभा, समतासंघ, स्वतंत्र मजूरपक्ष, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन या विविध परिषदांमधून त्यांनी व्यक्त केलेले विचार तसेच सामाजिक चळवळी अंतर्गत झालेला महाडचा सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन, अंबादेवी मंदिर प्रवेश, काळाराम मंदिरप्रवेश, मजूरमंत्री म्हणून कामगार मजूर यांच्यासाठी केलेले मोलाचे कार्य, शेतक-यासाठीची तळमळ व त्यातून त्यांच्या हातून झालेले कार्य या सर्व गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. व त्याचा उहापोह या प्रकरणात झालेला आहे. स्त्रीदास्य यावर विचार व त्यांच्या मुक्तीसाठीचे प्रयत्न हा त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. प्रकृती साथ देत नसताना ही हिंदू कोड बिल तयार करून स्त्रीमुक्तीसाठी ते शेवटपर्यंत लढत राहिले. या हिंदू कोड बिलातील सामाजिक उन्नतीचे मुलभूत प्रश्न व त्यावरील उपाय त्यांनी नमूद केलेले आहे. ते अत्यंत महत्वाचे आहेत. या सर्वांचा उहापोह झाल्यानंतर असे लक्षात येते की, भारतीय सामाजिक चळवळीचा व संघर्षाचा इतिहास हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षाच्या इतिहासाशिवाय पूर्ण होऊच शकत नाही.

## संदर्भ ग्रंथ :


१. बहिष्कृत भारत, २ सप्टेंबर १९२७

२. नरके हरी, (संपा.) बहिष्कृ त भारत आणि मूकनायक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा ज्योतिराव फु ले, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन २००८, पृष्ठ-१०४

३. त्रतैव, पृष्ठ-१२९

४. खैरमोडे, चां, भ, डॉ.भीमराव रामजी आंबेडकर, खंड-३, सुगावा प्रकाशन पुणे, चौथी आवृत्ती २०१७, पृष्ठ-३०० -३०६

५. फडके य.दि.आंबेडकरी चळवळी, श्रीविद्या प्रकाशन, १९८९, पृष्ठ-६

६. मेंणसे कृष्णा, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय चळवळी, पृष्ठ-१९

७. टाईम्स ऑफ इंडिया, २० मार्च १९३०

८. टाईम्स ऑफ इंडिया, ३१ मार्च १९३०

९. कोहिनूर, १० एप्रिल १९३०

१०. टाईम्स ऑफ इंडिया, १० एप्रिल १९३०

११. फडके य.दि.आंबेडकरी चळवळी, श्रीविद्या प्रकाशन,१९८९, पृष्ठ-१८

१२. खरात शंकरराव, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, पृष्ठ-५८

१३. जाधव नरेंद्र, बोल महामानवाचे, खंड-२, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २०१२, पृष्ठ -४१३

१४. कसबे रावसाहबे, आंबेडकर व मार्क्स, पृष्ठ-१७६

१५. जनता, २२ ऑगस्ट १९३६

१६. फडके य.दि., आंबेडकरी चळवळी, श्रीविद्या प्रकाशन, मुंबई, १९८९ पृष्ठ-९१

१७. खैरमोडे, चां.भ.,डॉ.भीमराव रामजी आंबेडकर, अस्पृश्यांचा उद्धारक, पृष्ठ-३३ -३४

१८. कीर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६६, पृष्ठ-३९३

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक चळवळीतील दलितेत्तर सहकारी यांचे दुर्मिळ छायाचित्र**



नारायण मल्हार जोशी



शांताराम शंकर रेगे



प्राचार्य मनोहर भिकाजी चिटणीस



केशवराव जेधे



माधवराव बागल



बॅ. मनोहर बाळकृष्ण समर्थ



दिनकरराव जवळकर



राजर्षी शाहु महाराज



सयाजीराव गायकवाड



डॉ. पंजाबराव देशमुख



डॉ. सविता आंबेडकर



भास्कर रघुनाथ कद्रेकर

# लेखकाचा परिचय



नाव -प्रा.डॉ.दशरथ किसन रसाळ

इतिहास विभाग प्रमुख, रयत शिक्षण संस्थेचे, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर

जन्म -२ मार्च १९७३, मु.भोसा पो .तांदुळजा ता.जि.लातूर

शिक्षण - एम.ए. नेट, पीएच.डी (इतिहास)

अनुभव -२० वर्ष

**संशोधन कार्य -**

पीएच.डी. विषय-'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक चळवळीचा दलितेत्तर समाजावर पडलेला प्रभाव-(१९००-२०००)'

संशोधन पेपर- भारतीय महामानव व वंचित घटकावर अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदेत ४० पेपरचे वाचन व सहभाग घेऊन संशोधन पेपर प्रकाशित करण्यात आले.

सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्य-गेली २० पासून शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून मी आजपर्यंत अनेक महापुरूष्यांच्या जीवनावर व्याख्याने देऊन समाजप्रबोधनात्मक कार्य केले आहे.

**पुरस्कार-**

१) उत्कृष्ट वाचक पुरस्कार -२०१६-१७

२) उत्कृष्ट वाचक पुरस्कार -२०१८-१९ लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महीला महाविद्यालय.

३) राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार-(NGO) कोल्हापूर- २०१९

४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय प्रेरणा पुरस्कार- सोलापूर- २०२१

५) राष्ट्रीय समाजरत्न आणि समता रत्न राष्ट्रीय पुरस्कार- नाशिक -२०२१

६) ज्ञानज्योती क्रांतीज्योती राष्ट्रीय पुरस्कार- नाशिक- २०२१

७) साहित्यरत्न अण्णाभाऊ साठी राज्यस्तरीय पुरस्कार- सोलापूर- २०२१

८) अण्णाभाऊ साठे राज्यस्तरीय शिक्षक रत्न पुरस्कार- माजलगाव -२०२१

९) डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार- नागपूर- २०२२

१०) विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन पुरस्कार- मुंबई- २०२२

११) राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार -कोल्हापूर- २०२२

१२) केरू रामचंद्र जाधव स्मृती पुरस्कार- सोलापूर- २०२२